


# महाभारत

## खंड २६ : द्रोणपर्व १

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड सव्वीसावा
## द्रोण पर्व भाग पहिला

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मार्च २०२०**

## अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सव्वीविसावा खंड, द्रोण पर्व भाग पहिला, आपण आता वाचणार अहात, द्रोणाभिषेक पर्व, संसप्तक बंध पर्व, अभिमन्यू वध पर्व, प्रतिज्ञा पर्व, जयद्रथ वध पर्व, घटोत्कच वध पर्व, द्रोण वध पर्व, नारायण अस्त्र प्रयोग पर्व आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध

व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे

जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# द्रोणाभिषेक पर्व (सुरू)

## भाग पहिला

नारायण आणि नर ह्यांना लवून नमस्कार करून तसें सरस्वतीला स्मरुन जय असे उद्गारून राजा जनमेजय ऋषी वैशंपायनांना विचारतो, "मला सांगा, ऋषीवर्य, जेव्हां धृतराष्ट्राला समजते कीं देवव्रत जे महाबली आणि शक्तीमान होते ते राहिले नाहीत, त्यांच्या डोळयाना अश्रूच्या धारा लागल्या होत्या. ते काय बोलले"?

वैशंपायन सांगतात, ते ऐकल्यावर तो आंधळा राजा जास्तच चिंता करू लागला. त्याला दुःख अनावर झाले होते. त्यावेळी गवळीपुत्र संजय तेथे आला, त्याला आलेला पाहून धृतराष्ट्र संजयाला बोलतो, मला रडू आवरत नाही, मला सांग ते दुःख सागरात बुडलेले कौरव त्यांच्या नशीबाने मार खाल्लेले असें त्यानंतर काय करावयाचे ठरवतात"? त्याच वेळी पांडव जे तिनही जगाचे स्वामी होणार हे स्पष्ट झाले ते काय करतात. मला सगळे सांग. तेथे जमलेले राजे काय बोलतात ते मला ऐकावयाचे आहे. संजय बोलतो, ऐका राजे, तुमचे मुलगे देवव्रताच्या मृत्यूनंतर काय करतात. तुमचे योद्धे व पांडवांचे सुद्धा, क्षत्रियांच्या कर्तव्यानुसार त्या घटनेमुळें अतिशय आनंदीत झालेले दिसत होते. परंतु, ते त्या महात्म्याला वंदन करतच असतात. युद्धात मृत्यू येणे हे क्षत्रियांसाठी महद्भाग्याचे समजले जात होते त्यामुळें भिष्माच्या मृत्यूने सगळे फार खूष झालेले दिसत होते. त्या भिष्मासाठी जिश्नुने बाणांची उशी तयार केली ते सगळे पाहून ते योद्धे फार संतुष्ट दिसत होते. मृत्यू हा अपरिहार्य समजला जातो मुद्दा असतो कसा मृत्यू आला. क्षत्रियांसाठी रणभूमीवर मृत्यू येणे चांगले समजले जात होते. ज्या क्षत्रियाला रणभूमीवर मृत्यू येतो तो पुण्यवान समजला जातो. भिष्माच्या समाधीस्थळाची व्यवस्था योग्यप्रकारे केल्यानंतर ते एकमेकांशी गप्पा मारत होते. ते भिष्माच्या समाधीला प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर पुन्हा ते दोनही बाजूचे क्षत्रिय एकमेकांवर रागावल्यासारखे पाहू लागतात व त्यानंतर पुन्हा एकमेकांना आव्हानं देऊ लागतात. त्यानंतर पुन्हा तुताऱ्या वाजू लागतात. पुन्हा युद्धाचे आवाहन होते. नगारे, शंखनाद, झांजा वाजू लागतात. सगळे योद्धे त्या समाधी पासून बाहेर येतात व आपापल्या पलटणीकडे जातात. त्यात मोठी धावपळ होतांना दिसत होती. त्यातच त्या अकराव्या दिवसाचा महत्वाचा भाग संपलेला असतो. तरी कौरव त्यांची शस्त्रं घेऊन युद्धासाठी निघालेले दिसत होते. तुझ्या मुलाच्या मूर्खपणामुळे व तुझ्या पुत्रप्रेमांमुळें सगळे कौरव मृत्यूच्या दाढीत जात आहेत असे वाटत होते. भिष्म पहिले त्यांच्यातील जे बळी गेले होते. कौरवांची परिस्थिती अशी होती कीं, गुरं धनगराशिवाय रानात पळत असावीत. त्यांना कोणी सांगणारा राहिला नव्हता. लढावयाचे

तर सरसेनापती नेमलेला नव्हता त्यांमुळे लढावयाचे तर ते कसे त्यांचे मार्गदर्शन नव्हते. सरसेनापती नसल्याने त्या लष्कराला लढण्याची दिशा मिळत नव्हती. सगळे विस्कळीत झाले होते. त्याचा गैरफायदा पांडव घेत नव्हते कारण पांडव युद्ध नितीनुसार करत होते. नाहीतर ते कौरवांच्या सैन्याचा फडशा पाडू शकले असते. खरोखरच कौरवांच्या सैन्याची अवस्था दयनीय झाली होती. त्यांना काय करावे ते समजत नव्हते. त्यामुळें घाबरलेल्या अवस्थेत ते दिसत होते. अनिश्चितता स्पष्ट जाणवत होती. लढण्याच्या कोणत्याही निश्चित सुचना मिळत नव्हत्या. त्यावेळी कांहीं राजे व त्यांचे सैनिक कर्ण, कर्ण म्हणून ओरडून त्याला सरसेनापती करावे असे सुचवत होते. तो आमचा मित्र आहे त्याला सरसेनापती करा अशी मागणी होऊ लागली. त्याचे कारण कर्णाचे सोबती त्या दहा दिवसात लढत नव्हते. ते ताजे तवाने होते व लढण्यासाठी उत्सुक सुद्धा होते. ते शक्तीमान योद्धे जे अर्धरथ प्रकारचे योद्धे होते, कांहीं महारथ होते, जे खरेतर रथी व अतिरथी होते. भिष्म त्याना खालच्या वर्गातील दाखवत होते व हिणवत होते त्याचा त्यांना राग होता. कर्ण सगळयांना बोलला होता कीं तो यम, कुबेर, वरुण आणि इंद्र ह्यांना हरवू शकतो. तो भिष्माला बोलला होता कीं, जोवर तो आहे तोवर कर्ण युद्धात येणार नाही. तो पुन्हा बोलतो कीं, जर भिष्म पांडवांना मारू शकले तर तो संन्यास घेऊन तीर्थयात्रेला जाईल तो कधीच परत येणार नाही. शस्त्रं सोडून देईल. परंतु, जर पांडव भिष्माला ठार मारतात तर मी एकटा सगळया पंडवांना मारून टाकीन. अशा वल्गना तो करत होता. तशी वल्गना केल्यानंतर तुझ्या मुलांनी त्याला युद्धापासून दूर रहाण्याची परवानगी दिली, अशी ती कथा आहे. म्हणून तो व त्याचे दोस्त गेले दहा दिवस लढत नव्हते. संजय सांगत होता. भिष्माने फार मोठ्या प्रमाणात पांडवांचे सैनिक मारले. आता तो मारला गेला आहे तेव्हां कोण सरसेनापती होणार त्यासाठी कर्णाचा प्रस्ताव मांडत होते त्याचे मित्र. ते कर्णाला सांगतात कीं, ही वेळ आहे त्याला त्याची हिम्मत दाखवण्याची. ते पुन्हा पुन्हा कर्णाच्या नांवांचा घोष करत असतात. त्याने भार्गवाकडून शस्त्र विद्या संपादन केली आहे, त्याला सरसेनापती करावे. तो आम्हाला यश मिळवून देईल.

वैशंपायन पुढे सांगतात, संजयाचे ते ऐकून धृतराष्ट्र म्हणतो, "म्हणजे एकंदर असे आहे कीं, तुम्ही विकर्तनाच्या मुलाला निवडले आहे. मला आशा आहे कीं तो त्यांच्या अपेक्षेप्रमाणे काम करील. पुढे ते शंका घेतात कीं, काय कर्ण पांडवांना हरवू शकेल कां? कर्ण पांडवांना घाबरवू शकेल कां? काय हा सूत कौरवांचे संरक्षण पंडुच्या मुलांपासून करू शकेल कां"?

द्रोणाभिषेक पर्व भाग पहिला संपला.

## द्रोणाभिषेक पर्व

## भाग दुसरा

संजय पुढे सांगतो, भिष्म गेले त्यानंतर तुझ्या मदतीला हा सुताचा पुत्र पुढे होतो. बुडत्या नावेला आधार मिळावा तसे ते होते. त्यानंतर कर्ण युद्धभूमीवर आला. त्याला कौरवांना मदत करण्याची प्रामाणिक इच्छा होती. कर्णाच्या गुणांची तारिफ होत होती. त्याचा दानशूरपणा, प्रामाणिकपणा, बुद्धीमत्ता, शौर्य, युद्ध कौशल्य, सज्जनपणा, दयाळूपणा, स्वर्गीय शस्त्रातील नैपुण्य, सत्यवादीपणा, संयम, शब्दाचा पक्केपणा असें बरेच गुण होते कर्णामध्ये. ब्राह्मणांना संरक्षण देणारा म्हणून त्याची ख्याती होती. जर मरण प्रत्येकाला येणारच आहे मग कशासाठी लढावयाचे, काय मिळणार त्यांने असें निराशावादी विचार मनात येत होते. भिष्माने पराक्रम केले त्याचे काय झाले? शेवटी तो मेला व वसूत जाऊन बसला. पृथ्वीवर त्याचे काय राहिले नाही. म्हणून आपल्या मुलाबाळां व्यतिरीक्त दुसऱ्या कशाचा विचार करू नये. संजय पुढे बोलत असतो, कर्ण भिष्माच्या मृत्यूने दुःखी झाला होता तरी तो धृतराष्ट्राचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करत होता. ते पाहून सगळे तुझे लष्कर शोकमय झाले होते. कोणालाही लढण्यात रस नव्हता. त्यांचा दुःखमय आक्रोश आकाशा पर्यंत गेला होता. तरी शेवटी लढाई करावीच लागणार होती. त्याच्या तयारीला ते लागतात.

कौरवांचे सैन्य पुन्हा एकदा युद्ध गर्जना करू लागले होते. कर्ण त्या सैन्याला उद्देशून बोलतो, त्यामुळें सैनिकांत जोर येतो. संजय बोलतो कीं, त्यावेळी त्याला जाणीव होते कीं, सगळे क्षणभुगूर आहे. तो त्याच्या सैन्याला विचारतो, "जर तुम्ही सगळे येथे होता तरी भिष्म कसे रथातून खाली फेकले गेले? तुम्ही धनंजयापुढे टिकाव धरू शकत नाही असें कां? वादळापुढे झाडं कोसळतात तसे तुम्ही पांडवांपुढे कोसळत होता. आपले अनेक योद्धे पांडवांनी आधीच ठार मारले आहेत. तशा परिस्थितीत मला आनंद कसा वाटेल"? आता आपले सैन्य आघाडीवर जाणार आहे. ते पांडवांना यमाच्या घरी पाठवणार आहेत. मी माझ्या बाणांने ते साध्य करणार आहे. प्रसिद्धीसाठी मी त्या एकेकांना ठार मारणार आहे. एक तर मी त्यांना मारीन अथवा ते मला मारतील. युधिष्ठीर धृढ स्वभावाचा आहे, त्याच्यात अनेक उत्तम गुण आहेत, वृकोदर हजार हत्तीचे बळ असलेला आहे. अर्जुन इंद्राचा मुलगा आहे, त्यामुळें त्या पांडवांना हरवणे देवांनासुद्धा शक्य नाही असें समजले जाते. त्यांच्यात नकुल व सहदेव आहेत जे साक्षात यम आहेत. ज्या सैन्यात सत्यकी आहे, देवकीचा पुत्र आहे, ते सैन्य साक्षात मृत्यूचा जबडा आहे असे समजले पाहिजे. त्यांना आव्हान देणारा कधी सलामत रहाणार नाही. वैराग्याला वैराग्यानेच मुकाबला करावयाचा असतो. तसेंच सैन्याला

सैन्यानेच तोंड द्यावयाचे असते. मी माझ्या बाजूचे संरक्षण करण्यास बांधलेला आहे. अहो रथी, आज मी आपल्या शत्रूला आवरण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यांना पराभूत करणार आहे. मला हे घरातील वादळ अजिबात आवडत नाही. जे माझ्या बरोबर येतील ते आमचे दोस्त असतील. मी चांगल्या प्रकारे ते करणार आहे. युद्ध हा क्षत्रियांचा धर्म (कर्तव्य) आहे. ते करत असतांना मी माझा देह भिष्माप्रमाणे धारातीर्थी सोडणार आहे. मी माझ्या शत्रूना मारणार अथवा त्यांच्या कडून मारला जाणार ह्यापैकी एक होणार आहे. ते होत असतांना मला माहित आहे जे मेले त्यांची बाया बापडे मुलं रडत असतील. ह्या भयंकर युद्धात माझे जीवित धोक्यात असणार आहे. तरी मी कौरवांचे संरक्षण पांडवांना मारून करणार आहे. तसे करून मी दुर्योधनाला सार्वभौम सत्ता मिळवून देणार आहे. असें बोलून तो त्याचे शिरस्त्राण व इतर पोषाख घालतो. जे लढण्यासाठी जरुरीचे होते. माझी सगळी शस्त्रं सज्ज करा. त्यात विविध प्रकारचे बाण, भाले, गदा, शर, धनुष्य, माझे शंखू असें सगळे असले पाहिजेत. माझ्या रथावर ध्वजस्तंभ उभारा. त्यावर हत्तीचे चिन्ह असेल. त्याला हार चढवा. सारथ्याने माझे तांबूस रंगाचे घोडे तयार ठेवावेत. अशा कार्यासाठी जे शुभ पदार्थ लागतात ते आणा. दह्याने भरलेले हंडे आणून पुजा करा. त्यांनी माझे शुभचिंतन करा. ज्यामुळे मला यश मिळेल. रणवाद्ये वाजवायला सुरूवात करा. सारथ्यानो, शोधा अर्जुन कोठे लपला आहे त्याची माहीती मला द्या. कोठे वृकोदर बसला आहे व कोठे युधिष्ठीर आहे ते शोधून काढा. मी त्यांचा समाचार घेणार आहे. पांडवांशी लढताना मी त्याना मारणार आहे किंवा ते मला मारतील कांहींहीं झाले तरी चालेल. मी भिष्माच्या दिशेने निघून जाईन जर मी मेलो. श्रींजय, वासुदेव, सत्यकी, हे साधारण राजांना मारता येणारे नाहीत. जरी यमाने किर्तीनला वाचवण्याचा प्रयत्न केला तरी मी त्याला मारणार आहे. नाहीतर मी यमाकडे जाईन कांहीं एक झाले तरी चालेल. माझे मित्र राजे आहेत ज्यांना यादवी आवडत नाही ते युद्ध करतील माझ्याबरोबर पांडवांशी.

संजय पुढे सांगत असतो, कर्ण एका उत्तम रथावर चढतो. त्याचे घोडे उत्तम होते व सजावट सुद्धा चांगली होती. तयारीने तो लढण्यासाठी युद्ध भूमीकडे निघतो. सगळे कौरव त्याच्या मागून लढण्यासाठी सज्ज होतात. आता नव्याने नवीन सरसेनापतीच्या अधिकारात युद्ध सुरू होणार असते. कर्ण त्या वेषात सुंदर दिसत होता. त्याचे तेज जाणवत होते. देवांसारखा तो वाटत होता.

द्रोणाभिषेक पर्व भाग दोन संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग तिसरा

संजय पुढे सांगतो, तुझी मुलं त्यांच्या आजोबांच्या मृतवत देहाकडे पहात होती, तो महान क्षत्रिय ज्याच्या उत्तम गुणांची तारिफ किती करावी? ज्याला सव्यसाचीने रथातून खाली पाडले होते, तो आता शरपंजरी निवांतपणे झोपलेले दिसत होते. कदाचित ते समाधीत गेले असावेत असे वाटत होते. सगळे शांत झाले होते त्यांच्या भोवती, ते अथांग सागरासारखे वाटत होते. ते पाहून तुझ्या मुलांची युद्ध लढण्याची उमेद संपल्यासारखी झाली होती. ते त्यांचा एकमेव आधारस्तंभ होते. लांब यमुनेच्या पाण्याच्या खळखळाटाने वातावरण जास्तच गंभीर झालेले होते. कौरवांची मनं अस्वस्थ झाली होती. भिष्म स्वतः मनैक पर्वतासारखे धीरोदात्त होते. वृत्राने इंद्राचा पराभव केल्यानंतर तो जसा पडलेला दिसत होता त्या प्राचीन काळी तसे आता भिष्म निवांतपणे पडलेले दिसत होते. ते भिष्म कर्ण एकटक पहात होता. त्याला भिष्माच्या अंगात रुतलेले अर्जुनाचे बाण विशेष जाणवत होते. अर्जुनाने केलेली शर उशी त्याला बोचत होती. सावकाशपणे कर्ण त्याच्या वैभवसंपन्न रथातून उतरत होता. सगळे शांतपणे ते पहात होते. लांब कोठेतरी पांडवांचे सैनिक जोराजोराने युद्धाच्या तयारीच्या घोषणा करत असल्याचे ऐकू येत होते. आकाशात सूर्य उतरणीला लागलेला दिसत होता. कर्ण रथातून उतरल्यावर पायी चालत सावकाशपणे समाधीस्थानी जात असतो. त्याच्या चेहऱ्यावर दुःखाच्या छटा स्पष्टपणे जाणवत होत्या. कर्ण समाधीकडे गेल्यावर त्या निजलेल्या योद्ध्याला लवून वंदन करतो व त्याला उद्देशून बोलतो, "मी कर्ण, मला तुमच्या आशिर्वादाची गरज आहे. डोळे उघडून माझ्याकडे पहा पितामह, माझ्याशी बोला कृपया, पवित्र व शुभ असे बोलून माझी ताकद वाढवा. हे स्पष्ट होते कीं, तुम्ही कितीही चांगले जगा, तुमच्यात कितीही उत्तम गुण असले तरी शेवटी ह्या जगात असेंच मरावे लागते हे मी समजत आहे तुमच्याकडे पाहून. तुमच्या इतक्या गुणवंताची ही अवस्था झाली आहे त्यातून मला कांही अर्थबोध घ्यावा असें वाटते. तुम्ही असंख्य वीरांना त्यांच्या पितरांच्याकडे पाठवले आहे. आता तुम्ही स्वतः त्याच मार्गाने जात अहात. पांडव त्यांच्या त्वेषाने कौरवांचा नाश करणार आहेत हे मी समजू शकतो. कौरवांना माहीत आहे गांडीवाची महती. इंद्र सव्यसाची बनून आला आहे. अर्जुनाच्या गांडीवाच्या आवाजाची भिती कौरवांच्या मनात भिनलेली आहे. किर्तीनचे बाण कौरवांचा नाश करणार आहेत. वनात वणवा जसा सगळे प्राणी, वनस्पती जाळून टाकतो तसे अर्जुनाचे बाण धृतराष्ट्राच्या मुलांना ठार मारणार आहेत. कृष्ण त्या वणव्याला मदत करणारा वारा आहे. पांचजन्याचा शंखनाद व गांडीवाचे टणत्कार सगळया धृतराष्ट्राच्या मुलांना आज भिववत आहेत. अर्जुनाचे सामर्थ्य अमानवी आहे असे सगळे सूज्ञ लोक सांगत असतात. तो साक्षात

महादेवाशी लढला आहे. त्याच्या कडून त्यांनी वर मिळवले आहेत. जे कोणालाही मिळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे तो महादेवांने सुरक्षित केला आहे असें सगळे समजतात. जरी तुम्ही भार्गवाला हरवले तरी धनंजयापुढे तुमचे कांही चालले नाही. ह्याचे मला आश्र्चर्य वाटते. तरीसुद्धा आपल्या आशिर्वादाने मी ते आव्हान घेऊ इच्छित आहे. आपल्या परवानगीने मी त्याचा नाश करणार आहे. तरी मला तसा वर आपण द्यावा.

द्रोणाभिषेक पर्व भाग तिसरा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग चौथा

संजय पुढे बोलतो, कर्णाचे ते ऐकून पितामह त्याला हसत हसत त्याचा उत्साह वाढवण्यासाठी बोलतात, "अरे सुता, तू तुझ्या लोकांसाठी लढलं पाहिजेस, जसे देव इंद्रावर विसंबून रहातात तसे जे तुझ्यावर अवलंबून आहेत त्यांना तू संरक्षण दे. धृतराष्ट्राचे मुलगे तुझ्यावर विसंबून आहेत त्याना तू आधार आहेस. तू कौरवांसाठी विष्णू आहेस, तू त्यांच्यासाठी कंबोजांना हरवलेस, तेथून राजपुराला गेलास व तेथे अनेक राजांना दुर्योधनाचे मांडलिक केलेस, नंतर नग्नजिताचा पराभव केलास, तेथून गिरीव्रज व नंतर अम्वस्थ त्यानंतर विदर्भ, गंधर्व, असें तू मारत गेला होतास तुझ्या लोकांसाठी तसा पुढे हिमालयात रहाणाऱ्या शूरवीर किरीटांचा पराभव केलास, त्या सगळयांना दुर्योधनाच्या पायाशी आणलेस. त्यानंतर उत्पल, मेकल, पौंड्र, कलिंग, आंध्र, निशाध, त्रिगर्त, वल्हीक असे एका मागोमाग एक हरवत गेला आहेस तसेंच तू आतासुद्धा ह्यापुढे तुझ्या लोकांसाठी लढत जा. तू कौरवांचा आधारस्तंभ हो. मी तुला आज्ञा करतो कीं, तू तुझ्या शत्रूवर खऱ्या क्षत्रियाप्रमाणे लढत रहा. त्यासाठी कौरवांच्या सैन्याचा प्रमुख हो. दुर्योधनाला विजय मिळवून दे. नियमानुसार आपण सगळे कुरु आहोत, जसे एकाच उदरातून आलो  आहोत. त्यात तू सुद्धा आहेस. एक कौरव म्हणून लढण्यास तयार हो".

पितामहांचे ते प्रोत्साहन देणारे बोलणे ऐकल्यावर कर्णाचा उत्साह वाढतो. तो नम्रपणे त्यांना हात जोडून पुन्हा एकदा प्रणाम करतो. त्यांचा प्रेमपूर्वक निरोप घेतो. तेथून तो निघतो व जेथे कौरव थांबलेले होते त्या जागी जातो. तो कौरवांचा भव्य तळ पाहून त्याचा उत्साह आणखीनच वाढतो. दुर्योधन त्याचे स्वागत करतो इतर त्याच्या सहोदरांबरोबर. वातावरण चांगले झाले होते. त्याचा उत्साह पाहून कौरवांचा जोर आणखीन वाढतो. तो मोठ्याने ओरडून त्याचे स्वागत करतात. रणभूमीकडे जाण्याच्या तयारीत ते असतात. पितामहाने त्याला आज्ञा केल्याचे तो त्या सगळया कौरवांपुढे सांगतो. ते ऐकून सगळे दंड थोपटू लागतात.

द्रोणाभिषेक पर्व भाग चार संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग पांचवा

संजय पुढे सांगत असतो, त्या नरकेसरीला पाहून दुर्योधन बोलतो, "आता आपल्याला चांगला नेता मिळाला आहे. परंतु, ते रितसर ठरले पाहिजे". कर्ण ते ऐकून बोलतो, "तुम्हीच ते ठरवाल. कारण तुम्हीच राजे अहात. तुमचे निर्णय सर्वमान्य होणार. सगळे राजे तुमचा निर्णय ऐकण्यासाठी उत्सूक आहेत. मला खात्री आहे कीं, कोणताही गैर निर्णय घेतला जाणार नाही". ते ऐकल्यावर दुर्योधन बोलतो, "भिष्म आपले सरसेनापती होते. त्यांना सगळे मानत होते. अरे कर्णा, ते उच्च दर्जाचे कर्तृत्व दाखवत होते. त्यांने असंख्य दुष्मनांचा खत्मा केला माझ्यासाठी. गेल्या दहा दिवसात त्यांनी कमाल केली होती. परंतु, आता ते आपल्यात राहिले नाहीत".

त्यावर कर्ण बोलतो, "चांगल्या नेत्याशिवाय सैन्य चालवणे अशक्य आहे. जसे जहाज चालवण्यासाठी चांगला तांडेल लागतो. नेता नसलेले सैन्य सुकाणू नसलेल्या नावे सारखे असते. येथे असलेल्या योद्ध्यांतून आपल्याला सरसेनापती निवडावयाचा आहे. ज्याचे नेतृत्व सगळे मान्य करतील. जो स्वतः मोठा योद्धा आहे, जो ज्येष्ठ आहे, जो अनुभवाने श्रेष्ठ आहे. ज्याच्या निर्णय क्षमतेला सगळे मन्यता देतील. तसा कोण आहे आपल्यात त्याला भिष्माच्या जागी नेमावयाचे आहे. तो वेद जाणणारा असला पाहिजे. तो सूज्ञ असला पाहिजे, जो सर्वमान्य आहे. सगळे उत्तम योद्धे सरसेनापती होण्यासाठी योग्य नसतात. उत्तम योद्धा होणे व उत्तम सेनानी होणे ह्यात फरक असतो. स्वतः लढणं व इतरांना लढण्यात दिशा देणे ह्यात फरक असतो. सारख्या अनेकांतून एकाची निवड केली तर त्यामुळें इतर नाराज होणार. तसे करणे योग्य ठरणार नाही. एक आहेत जे आपले गुरू आहेत म्हणून आपल्याला आदरणीय आहेत. ज्यांच्या हाताखाली आपण सगळे शस्त्रविद्या शिकलो ते द्रोण माझ्यामते भिष्मानंतर योग्य आहेत. ते ब्राह्मण सुद्धा आहेत. ते शुक्रासारखे आहेत आपल्यासाठी. म्हणून ह्यापुढे सगळे राजे व त्यांचे सैन्य द्रोणांकडून आज्ञा घेतील. ते भिष्मानंतर सर्वोत्तम आहेत आपल्यामध्ये. ते आपले गुरू आहेत हे विशेष आहे. ते असतांना इतर कोणाला सरसेनापती पद देणे श्रेयस्कर ठरणार नाही. म्हणून दुर्योधनाने द्रोणाचार्यांना तुझ्या सैन्याचे सरसेनापती म्हणून जाहिर करावे, जसे देवांनी कार्तिकेयाला निवडले होते असुरांना हरवण्यासाठी".

द्रोणाभिषेक पर्व भाग पांचवा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग सहावा

संजय पुढे सांगतो, कर्माचे ते विचार ऐकल्यावर दुर्योधन द्रोणांकडे पहात बोलतो, जे सैन्यात उभे होते. जन्माच्या श्रेष्ठतेने, उच्च कुलीन असण्यामुळे, आपल्या ज्ञानामुळे, आपल्या ज्येष्ठतेमुळे, आपल्या अनेक वर्षाच्या तपस्येमुळे, आपल्या बुद्धीमुळे, आपल्या युद्धकौशल्यामुळे, आपल्या व्यवहारज्ञानामुळे, तपस्या, धैर्य, शहाणपणा, धोरणीपणा अशामुळें आपल्याला मी सरसेनापती नेमत आहे. आपल्या इतका उत्तम नेता आमच्यात दुसरा नाही. आपण आमच्या फौजेला मार्गदर्शन करावे. जसे इंद्र देवांना देतो. अशी आमची इच्छा आहे. जसे कपिल रुद्रात आहेत, वसुमध्ये पावक आहे, यक्षात कुबेर आहे, मरुतात वसव आहे, वशिष्ठ ब्राह्मणांत आहेत, तेजात सूर्य आहे, यम पितरांत आहे,. जलचरात वरुण आहे, ताऱ्यांमध्ये चंद्र आहे, उसन दितीच्या मुलात आहेत, तसे आपण आमच्यात असावेत. आमचे अकरा अक्षौहिणी सैन्य आपल्या आज्ञांचे पालन करतील. त्यांच्या मदतीने आमच्या शत्रूचे निर्दालन करावे. जसे इंद्राने दानवांचे केले. आमच्या पुढे असा व आम्हाला मार्गदर्शन करा. जसे कार्तिकेय देवांचे करत होता. जसे धनगरामागे त्याची गुरं जातात तसे आम्ही आपल्या आज्ञेत राहून युद्ध करू. युधिष्ठीराचे सैन्य बरबाद करू.

संजय पुढे सांगतो, दुर्योधनाने ते बोलल्यानंतर कौरवांच्या सगळया सैनिकांने द्रोणांचे स्वागत केले मोठ्या मोठ्यानो ओरडून. सगळे योद्धे समाधानी झाले कीं त्यांना कोणी योग्यतेचा सरसेनापती मिळाला भिष्मांनंतर. त्या सैन्याचा उत्साह पाहून तुमचा मुलगा समाधानी झाला. त्यानंतर तो द्रोणांचा गौरव करून लागला. ते स्तुतीचे ऐकून द्रोण तुझ्या मुलाला सांगतात.

द्रोणाभिषेक पर्व भाग सहा संपला.

## द्रोणाभिषेक पर्व

## भाग सातवा

द्रोण बोलतात, "मला वेदांचे पूर्ण ज्ञान आहे. त्याच्या सहाही शाखांचा माझा अभ्यास आहे. मला मनुष्य विज्ञान चांगले समजते, मी शैव शस्त्रांमध्ये निपूण आहे. त्याशिवाय इतर शस्त्रं व अस्त्रं मी चांगल्या प्रकारे जाणतो. मी तुझ्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयास करणार आहे. मी तुझ्यासाठी पांडवांच्या फौजांशी लढीन परंतु, मी कोणाही पंडुपुत्रावर वार करणार नाही. त्याना मी अभय दिले आहे त्यामुळे ते सोडून इतर सगळे माझ्या आवाक्यात मी घेणार आहे. मी प्रिशताच्या (द्रुपदाच्या) मुलाला मारणार नाही कारण त्याची उत्पत्ती मला ठार मारण्यासाठी विधात्याने केली आहे, त्याप्रमाणे होणार आहे. पांडव सुद्धा माझ्याशी लढणार नाहीत हेसुद्धा तू जाणत आहेसच".

संजय पुढे सांगत असतो, दुर्योधन त्या अटी मान्य करतो व द्रोणाचार्यांना सरसेनापती घोषित करतो. त्यासाठी ज्या विधी करावयाच्या त्या सुरू होतात. त्या प्रमाणे दुर्यौधन व इतर कौरव द्रोणाचार्यांची पुजा करतात. जशी स्कंदाची नेमणूक देवांचा सरसेनापती म्हणून झाली होती तशी द्रोणाचार्यांची कौरवांचे सरसेनापति म्हणून अधिकृत झाली. एकदाची सरसेनापतीची नेमणूक झाली त्यानंतर रणवाद्ये वाजू लागली. कौरवांचे सैन्य आनंदात जल्लोष करू लागते. तो सणाचा दिवस असावा असे वातावरण झाले होते. ब्राह्मण सर्व विधी यथासांग पार पाडतात. जय हो, जय हो, असे घोष केले जातात. शंखनाद होतो. त्यानंतर नर्तक नाच करतात, गायक गाऊन जमलेल्या सैनिकांचे मनोंजन करतात. अशारितीने रितसरपणे द्रोणांची नेमणूक होते. कौरव समजतात कीं, पांडवांचा पराभव आता निश्चित होणार.

संजय पुढे सांगतो, अधिकार मिळाल्यानंतर तो भारद्वजाचा मुलगा सैन्याची नव्याने जमवाजमव करू लागतो. त्यात त्याला संबंधित राजे मदत करत असतात. सगळी तयारी झाल्यावर दुर्योधनाला बरोबर घेऊन तो लढण्यासाठी सज्ज होतो. सिंधचा राजा जयद्रथ, कलिंगचा राजा, विकर्ण, शकूनी, शस्त्रसज्ज असे द्रोणाचार्यांच्या उजव्या बाजूस उभे रहातात. त्यांच्या सेना त्यांच्या बरोबर असतात. गांधार लोकांच्या फौजा पुढे असतात. कृप, कृतवर्मन, चित्रसेन, विविंसती, दुःशासन व त्यांच्या फौजा डाव्या बाजूने सज्ज असतात. कंबोज, सुदक्षिणा, शक, यवन त्यांच्या घोडदलाने सज्ज असतात. मद्र देश, त्रिगर्त, अमवस्थ, पश्चिमेकडील, उत्तरेकडील, मालव, सुरसेनी, सुद्र, मलदी, सौवीर, कैतवी, पूर्वेकडील, दक्षिणेकडील, दुर्योधनाच्या पाठून जात असतात. कर्ण त्याच्या फौजेसह सैन्याच्या मागील आघाडीत होता. तो

धनुर्धार्यांच्या पलटणीचा मुख्य नेमला गेला होता. कर्णाचा झेंडा हत्तीचे चिन्ह घेऊन होता. त्याचा रुबाब निराळा होता. कर्णाला पाहून भिष्माच्या जाण्याचा विसर त्या लोकांना होऊ लागतो. सगळे भिष्माच्या जाण्याचे दुःख करण्याचे आता सोडून पुढील कारवाई वर लक्ष केंद्रीत करतात. कौरवांचे सैनिक एकमेकांना सांगत असतात कीं, कर्णाला आघाडीवर पाहून पांडव घाबरतील. भिष्माना पांडवांना मारता आले नाही कारण, ते तसे करू इच्छित नव्हते. पण आता कर्ण पांडवांचा खत्मा करण्यासाठीच आला आहे आपल्यामध्ये असे ते बोलत होते. त्या बोलण्याने त्यांना आनंद मिळत होता. कौरवांच्या फौजा पुढे सकरत होत्या. राधासुताच्या नांवाने घोषणा केल्या जात होत्या. द्रोण शकट नावाचा व्युह रचतो. त्यावेळी पांडवांनी क्रौंच रचना केलेली असते. युधिष्ठीर फार मजेत दिसत होते. पांडवांच्या व्युहात विष्णू व धनंजय आधाडीला होते. त्यांचे झेंडे फडकत होते. त्यावर कपीमुद्रा तळपत होती त्या भोवती मायावी प्राणी घोंगावत होते. जणू तेंसुद्धा लढत आहेत. ती पताका हवेत तरंगत असल्यासारखे वाटत होते. सगळे आकाश त्याच्या प्रकाशांने उजळून निघाले होते. त्याच्या तेजाने सगळे जग नष्ट होते कीं, काय असे वाटत होते. सर्व धनुर्धाऱ्यांमध्ये अर्जुन श्रेष्ठ, सर्व धनुष्यात गांडीव श्रेष्ठ, सर्व प्राण्यात वासुदेव श्रेष्ठ, सर्व चक्री आयुधांत सुदर्शन चक्र श्रेष्ठ असते. ते सगळे त्या एका रथात सामावलेले होते. त्याला पांढरे घोडे खेचत होते. ते त्या रणभूमीत त्यांची जागा घेतात. ते शत्रूंच्या नेमके समोर असतात. कर्ण कौरवांच्या सैन्याच्या पुढे असतो व धनंजय पांडवांच्या. दोघे एकमेकांना मारण्याचे ठरवून सज्ज असतात. जेव्हां भारद्वाजाच्या मुलाचा रथ युद्ध भूमीत येतो, तेव्हां पृथ्वी थकथरू लागते. त्यातून पुढे मरणाऱ्यांच्या व त्यांच्या कुटूंबियांच्या रडण्याचा आवाज ऐकू येत होता. आकाशात धुळ उडाली होती. त्यामुळें पुढचे नीटपणे दिसत नव्हते. सूर्याचे बिंब झाकले गेले होते. आकाश निरभ्र होते व त्यातून मांसांचा व रक्ताचा पाऊस पडत होता. त्यात माणसांच्या अस्थी होत्या. ते अशुभ लक्षण होते. गिधाडं, ससाणे, घारी असें पक्षी आकाशात उडत होते. त्यात कांहीं भयंकर दिसणारे पक्षीसुद्धा होते. ते सगळे कौरवांच्या बाजूच्या रणभूमीवर होत होते. जमिनीवर कोल्हे, तरस, लांडगे त्यांचे विचित्र आवाज काढत तुझ्या सैन्याच्या डाव्या बाजूस फिरत होते. त्यांना मरणाऱ्या सैनिकांते, घोड्यांचे व हत्तींचे मांस खावयाचे होते असे दिसत होते. आकाशातून अशनि पडू लागले होते. त्यांचा प्रकाश अधून मधून पडत होता. सूर्य बिंबातून वेगळा प्रकाश निघत होता जसें कर्ण त्याची फौज घेऊन पुढे सरकत होता वेगांने. हि आणि अशी बरीच अशुभ लक्षणं तेथे दिसत होती. आता त्या दोन बाजू एकमेकांवर प्रहार करण्यासाठी सज्ज झाल्या होत्या. त्यांच्या हालचालीचे आवाज सगळीकडे घुमत होते. अखेरीस त्यांच्यात लढाई सुरू झाली. जिंकण्यासाठी ते लढत होते. बाणांचा वर्षाव सुरू झाला. पांडव आणि श्रींजय द्रोणावर चाल करून जातात. द्रोण त्याचे हल्ले परतवत असतात. दैवी शस्त्रांचा वापर होऊ लागतो. द्रोण थोड्याच वेळात पांजवांच्या सैन्याला

मोठा झटका देतात त्यामुळे ते हादरून जातात. पांचालांचे सैनिक धृष्टद्युम्नाच्या नेतृत्वाखाली द्रोणांवर हल्ला करतात. द्रोणांचे सैन्य त्यामुळे फाकले जाते. त्यांची फळी तुटते. द्रोणाच्या बाणांचा वर्षाव उलटवून धृष्टद्युम्न कौरवांच्या सैन्यातील पुष्कळ मारून टाकतो. कौरवांची मोठी हानि होते. द्रोण ती उलटवण्यासाठी त्याच्या फौजांवर हल्ला करतो. त्याच वेळी  पांडव आणि श्रींजय ह्यांच्या फौजा द्रोणांच्या मारामुळें खजिल झालेल्या दिसतात. सिंहाच्या येण्यामुळे जशी हरण पळू लागतात तसे ते सैरावैरा पळत होते. द्रोणाच्या मार्यामुळें वणवा पसरावा अशी पांडवांच्या फौजेची गत झाली होती. द्रोण तेजस्वी दिसत होते. त्यांच्या रथात ते ताठ उभे राहून बाणांचा मारा करत होते. त्यांचे बाण आकाशात मारले जात होते व ते खाली येतांना सैनिकांवर लागत होते अशाप्रकारे द्रोण पांडवांच्या व त्याबरोबर तुझ्या सैनिकांचा नाश करत होते. तशा मारामुळे सगळीकडे घबराट पसरली.

द्रोणाभिषेक पर्व भाग सात संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग आठवा

संजय पुढे सांगतो, द्रोण पांडवांचे सैनिक, घोडे, हत्ती मारत होते तरी त्यामुळें विचलित न होता पांडवांची सेना त्यांना वेढा घालू लागते. कारण त्यांचे बाण उंच आकाशात जाऊन त्याच्या रथाच्या पासून दूर पडत होते. त्या मधल्या भागात असलेले सैनिक द्रोणांच्या बाणांच्या वर्षावापासून सुरक्षित होते. युधिष्ठीर धृष्टद्युम्नाला व धनंजयाला सांगतो कीं त्यांनी द्रोणांला ताब्यात घ्यावे. त्याप्रमाणे त्यांचे सैनिक द्रोणाचार्याला घातलेला वेढा जास्त आवळत जातात. त्या कारवाईत त्यांना केकया, भिमसेन, अभिमन्यू, घटोत्कच, नकुल सहदेव, मत्स्य देशाचा राजा विराट, द्रौपदीची मुलं, द्रुपदाची मुलं असे सगळे मोठ्या उत्साहाने तो वेढा मजबूत करत असतात. त्यांना सत्यकी, धृष्टकेतू, चित्रसेन, युयुत्सू, व इतर राजे पंडुच्या मुलांबरोबर तेथे त्या वेढ्यात सामील होतात. तो डाव द्रोणांना समजतो व ते रागावतात. ते रागावून त्या वेढ्याकडे पहातात. त्यांच्या अंगाची लाही लाही होते. जरी ते वृद्ध झाले होते तरी त्यांचा उत्साह तरूणासारखा होता. त्याचे लाल रंगाचे घोडे असलेला रथ तो फिरवतो व तो पांडवांच्या सैन्याने केलेला वेढा चांगला न्याहाळतो. त्यांचा राग पाहून युधिष्ठीराचे सैनिक सैरावैरा पळून जातात. त्यांच्या भित्रेपणाची सगळयांना गंमत वाटते. द्रोण पुन्हा स्वताचे नाव घेऊन जोराने बाणांचा वर्षाव त्या पळणाऱ्या सैनिकांवर करू लागतो. त्यांचा तो अवतार साक्षात यम असा होता. त्या पणणाऱ्या सैनिकांचे हात डोकी तुटून पडत होती. त्यातून त्या योद्ध्यांचे दागिने मातीत कोसळत होते. सगळीकडे एकच गोंधळ उडाला होता. त्यांच्या रथाच्या चाकांचा गडगडाट व त्यांचे धनुष्याचे टणत्कार आकाशात जाऊन भिडले होते. त्यांनी फेकलेले लांबलचक बाण दूरवर असलेल्या हत्तींना व घोड्यांना जखमी करत होते. असंख्य पाईक त्यामुळे मारले जात होते. ते होत असतांना पांचाल व पांडव योद्धे त्यांच्या जवळ जाण्याचे धैर्य करतात. द्रोण त्या जवळ जाणाऱ्यांना यमाकडे पाठवत होते. ते इतके बाण पाठवत होते कीं, त्यामधून कांहीं दिसत नव्हते. फक्त त्यांचा ध्वज दिसत होता. द्रोणांनी फेकलेल्या बाणाच्या मुळे एक ढग त्यांच्या भोवती तयार झाले होते. त्यांच्या बाणांनी ते केकयाचे पांच बंधू जखमी करतो. त्यानंतर द्रोण युधिष्ठीराकडे त्यांचा मोर्चा वळवतो. त्यानंतर ते एका मागोमाग एक असे भिमसेन, अर्जुन, सत्यकी, द्रुपदाची मुलं, काशीचा राजा, सैव्याची मुलं, सिवी स्वतः, अशा सगळयांना त्यांच्या बाणांची चव दाखवतात. ते करत असतांना ते मोठ्याने ओरडून आव्हानं देत असतात. त्यांचे सोन्याचे पंखधारी बाण वेगांने हत्तींच्या पोटात घुसत व त्यातून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. सगळे धारातीर्थ मोडलेल्या रथांनी भरलेले होते. त्यातून जाणे दुरापास्त झालेले होते. जखमांनी भरलेले हत्ती व घोडे इतस्ततः धावत पळत होते.

तुमच्या मुलाच्या समाधानासाठी त्यांनी ते केले होते. सत्यकी, भिम आणि धनंजयाच्या पलटणी द्रोणांनी पराभूत केल्या होत्या. त्याशिवाय अभिमन्यू, द्रुपद, राजा काशी, ह्यांच्या फौजासुद्धा मार खात होत्या. ते पांडवांचे सैन्य त्यांच्या बाणांच्या वर्षावाने भाजून काढत होते. त्या मारात अनेक राजे त्यांच्या बाणांने मारले जातात. पांडवांचे कित्येक हजार सैनिक द्रोण त्या युद्धात ठार मारतात. द्रोणांनी त्या युद्धात पांडवांचे दोन अक्षौहिणी सैन्य गारद केले होते. अहो राजे, त्या हत्त्याकांडा नंतर धृष्टद्युम्नाने द्रोणांवर बाण मारून त्यांना ठार मारले. त्यामुलें ते अखेरीय क्षत्रिय वर्णाच्या अंतिम ठिकाणी गेले. त्यांचा वध पांडवांनी व पांचालानी केला होता. ते इतके अघटीत व अचानक झाले कीं त्यांवर कोणाचा विश्र्वास बसत नव्हता. आकाशातून त्यामुळें विचित्र प्राण्यांचे ओरडणे ऐकू येत होते. ते पितरांचे ओरडणे होते. अहो भारद्वाजाचा पुत्र मेला, भारद्वाजाचा पुत्र मेला असें ते बोलत होते. तो एक पांडवांची विजय होता. त्या आवाजांनी पृथ्वी हादरली.

द्रोणाभिषेक पर्व भाग आठवा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग नववा

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, "पांडव आणि पांचाल द्रोणांचा वध कसा करतात. ते युद्ध कलेत इतके तरबेज असतांना असें कसे झाले? रथात कांही बिघाड झाला होता कां? नेमके काय झाले ते मला सांग. त्यांचे धनुष्य तुटले होते कां? पांचालाचा मुलगा त्यांना कसे मारू शकतो जे इतके प्रवीण आहेत युद्ध कलेत? ते एक उत्तम धनुर्धारी होते. ते महान ब्राह्मण होते. त्यांचे वादाचे ज्ञान श्रेष्ठ होते. ते सगळी दैवी शस्त्रं आयुध जाणत होते. जे फार सावध होते. जे अनेक युद्धात पराक्रम केले होते. नियती कर्मापेक्षा जास्त प्रभावी असते. माझे दुर्दैव आहे कीं अशी वार्ता मला ऐकावी लागत आहे. अशा वार्तेने माझे काळींज फाटत कां नाही. वेदाचे अभ्यासक व शस्त्रविद्यासुद्धा चांगली जाणणारे असे कसे मरतात. कांहीं समजत नाही. ते सज्जनांचे संरक्षक होते व पापी लोकांचे नियंत्रक होते. असा भला माणूस दुर्योधनाच्या हट्टापायी मारला गेला ह्याचे मला वाईट वाटते. मला सांगा ते कसे मारले गेले? काय त्यांचे सिंध प्रांतातून आणलेले घोडे जखमी झाले होते. त्या घोड्यांना कोणी अडवले होते कां? ते पांडवांना पुरून उरतील असें वाटले होते परंतु, तसे झाले नाही. आपल्या शौर्याने इतरांना नाकी नव आणणारे स्वतः कसे मारले गेले अशा अचानक पणे ते समजत नाही. त्याना मारले गेले तेव्हां तेथे कोण योद्धे होते"?

युधिष्ठीर त्याच्या भावंडांबरोबर आणि धृष्टद्युम्न असें, त्यांना पकडा, पकडा, असे ओरडत घेराव घालतातआणि त्यांच्यावर हल्ला करतात. त्यांचे सैन्य त्यांच्या बाजूने होते. पार्थाने आपले सैनिक त्याच्या बाणांच्या वर्षावांने अडवले आसतील. तशा परिस्थितीत प्रिशताच्या मुलांने डाव साधला असें झाले असेल असें मला वाटते. धृष्टद्युम्नाशिवाय इतर कोणी योद्धा त्यांच्यावर वार करण्याचे धाडस करील असे वाटत नाही. केकया, छेड्डी, करुष, मत्स्य, असे सगळे तेथे होते पण त्यांची हिम्मत नव्हती द्रोणांवर वार करण्याची. दुसरे असें कीं, धृष्टद्युम्न द्रोणांना मारण्यासाठी आला होता असें ठरलेले होते. कदाचित असें झाले असेल कीं, द्रोण एकाद्या द्वंद्वात गुंतले असतांना त्यांने त्यांचे लक्ष नसतांना त्यांच्यावर कुटीलपणे हल्ला केला असेल. मला वाटते तेंच जास्त शक्य आहे. नाहीतर शत्रूंचा नाष करणारा हा योद्धा अशाप्रकारे सहजपणे मरणे शक्य वाटत नाही. वाईट वाटते कीं, एक ब्राह्मण अशारितीने मरावा. माझ्यामुळें त्यांचा बऱ्याच वेळा विनाकारण अपमान होत असे. तशात त्यांचा अंत कुंतीच्या मुलांकडून झाला. जे इंद्रासारखे शूर होते ते असं मरावे हे पटत नाही. कदाचित त्यांना मरावयाचे होते म्हणून ते मेले असतील हे जास्त पटण्यासारखे वाटते. ते वृद्ध झाले होते, त्यांचे वय सन्यासाश्रमाचे होते, युद्धात लढण्याचे नव्हते

तरी ते माझ्या मुलाच्या आग्रहाखातर लढत होते व त्यातच ते गेले हे चांगले झाले नाही. ते पैशासाठी लढत नव्हते. त्यांच्या जीवनात दोन ध्वनी होते, एक वेदांचा व दुसरा धनुष्याच्या टणत्काराचा. ते नेहमी शांत स्थितप्रज्ञ होते. कांही असें मला त्यांचा मृत्यू झाला ह्यावर विश्वास ठेवायला आवडत नाही. त्यांच्या गटात कोण होते जे त्यांच्या संरक्षणासाठी ठेवलेले होते. त्यांच्या मागे जाऊन वार करणे किती अवघड होते तरी ते झाले. त्यांच्या संरक्षणासाठी असलेले योद्धे तेव्हां काय करत होते?

द्रोणांसारखा सत्शिल माणूस अशारितीने मरावा हे मनाला पटत नाही. अरें संजया, तूर्त आपण हे संभाषण थांबवावे असे वाटते. मला बेचैनी वाटत आहे. थोडे बरे वाटले कीं, मग पुन्हा तू मला तेथे काय होत होते ते सांग.

द्रोणाभिषेक पर्व भाग नववा संपला.

## द्रोणाभिषेक पर्व

## भाग दहावा

वैशंपायन जनमेजयाला सांगतात, संजयाशी असें बोलल्यानंतर धृतराष्ट्र त्यांच्या मुलाच्या यशाबद्दल साशंक असें त्यांच्या आसनावरून खाली जमिनीवर पडतात. त्यांना शुद्धीवर आणण्यासाठी घरातील महिला सुवासिक पाण्याचा शिडकावा करतात. त्यांना वारा घालतात. त्या बायका त्यांना सावकाशपणे उठवून त्यांच्या आसनावर बसवतात. त्या बायकांना रडू येते. तरी ते बेहोष असल्यासारखेच वाटत होते. थोड्या वेळांने त्यांचे शरीर थरथरू लागते. त्याना शुद्ध आल्यासारखे तेथे असलेल्यांना वाटते. थोड्या वेळांनी ते शुद्धीवर आल्या सारखे बोलू लागतात. ते युद्धातील प्रसंगांबद्दल विचारू लागतात. धृतराष्ट्र बोलतात, "तो अजातशत्रू  जो सूर्यासारखा तेजस्वी आहे, जो शत्रूंवर वेगांने रागावलेल्या हत्तीप्रमाणे हल्ला करतो, त्याला माझ्या वीरानी कसे अडवले ते सांग. कारण त्याच्या एका क्रुद्ध दृष्टीक्षेपाने शत्रू जळून जाऊ शकतो. सगळे आपले सैन्य तो त्या नजरेने जाळू शकतो. तरी तो संयमी आहे म्हणून हे युद्ध होत आहे. तो द्रोणांजवळ कसा पोहोचला ते सांग. तो वृकोदर कुंतीचा पुत्र ज्याच्या अंगात दहा हजार हत्तींचे बळ आहे तो काय करत होता ते सांग. तो रथी ज्याचा रथ साक्षात वासुदेव चालवतो तो कसा तेथे आला ते सांग. त्याचे बाण कोणी अडवू शकत नाही त्याचे बद्दल सांग. त्याच्या क्रोधापुढे कोणीही टिकत नाही. जो शत्रूच्या मर्मस्थानी बाण मारतो. ज्याचे बाण साक्षात मृत्यू असतात, ज्याचे धनुष्य गांडीव आहे. ज्याचे लक्ष्य माझा दुर्योधन आहे. जेव्हां तू त्या पार्थाला पाहिलेस तेव्हां तुझ्या मनाची स्थिती कशी झाली, तेथे असा कोणीही नाही जो त्यांना झेलू शकेल. ते कोण होते जे द्रोणाबरोबर राहीले व ते कोण भितरे जे त्यावेळी पळून गेले ते मला सांग. त्या लढाईत मोठे मोठे योद्धे घाबरले होते. माझी सेना त्याच्या पुढे टिकाव धरणारी नाही. जेव्हां तो देखणा पंडुपुत्र नकूल द्रोणांवर धावून गेला तेव्हां माझ्या सैन्याने कसा विरोध केला ते सांग. जेव्हां तो व्रतस्थ जीवन जगणारा सहदेव ज्याची चाल चपळ सापा सारखी असते, जो शुद्ध चारित्र्याचा आहे, द्रोणांवर चाल करतो तेव्हां माझे सैन्य त्याला कसे अडवते ते सांग. युयुधन ज्याने सौवीराच्या राजाला पाणी पाजले जो ब्रह्मचर्य पालन करतो, जो रणांगणावर वासुदेवाच्या बरोबरीचा आहे, ज्याने अर्जुनाकडून विद्या संपादन केली त्याने काय केले? सत्यकीला माझ्या सैन्याने अडवले कां त्यावेळी ते मला सांग. पांचालांतील उत्तमौज, द्रुपदाचा मुलगा, जो नेहमी अर्जुनाच्या सहयोगी असतो तो काय करत होता? तो कौरवांचा शत्रू आहे त्याने काय केले ते मला सांग. त्यांना माझ्या सैन्याने थांबवले कां? धृष्टकेतूला माझ्या कोणत्या लढवय्याने विरोध केला. पांजवांच्या बाजूचे छेड्डी द्रोणावर कसे चालून गेले ते सांग. केतुमलाला द्रोणापासून दूर ठेवण्यासाठी कोणी प्रयत्न केले ते सांग. शिखंडीने

द्रोणाच्या वधात काय केले ज्याने भिष्माच्या वधाचे काम केले ते मला समजून घ्यावयाचे आहे. अभिमन्यूचे काय होत होते ते सांग. द्रोणांवर पांडवांचे योद्धे चालून जात असतांना आपले काय करत होते ते मला ऐकावयाचे आहे. द्रौपदीची मुल त्यावेळी काय करत होती. त्या मुलांनी लहानपणीच बालपणाचे खेळ टाकून मोठ्यांचे खेळ स्वीकारले आहेत ते काय करत होते. भिष्मावर चाव करणारे त्याचे मुलगे क्षेत्रंजय, क्षेत्रदेव, क्षात्रवर्मन, मनद, द्रष्टद्युम्नाची ती मुल तेथे काय करत होती? चेकितनाला कोणी विरोध केला. ते पांच केकया बंधू ज्यांच्या शौर्याचे काय सांगावे, जे पांडवांच्या आईकडचे भाऊ आहेत ते काय करत होते?

आपल्यातील कोण द्रोणांनान संरक्षण देत होते ते मला सांग. तो युयुत्सू जो पांडवांसाठी होता त्याने काय केले द्रोणांच्या वधात? त्याशिवाय तो धृष्टद्युम्न ज्याला यज्ञातून आणले व ज्याचा जन्मच मुळी द्रोणांच्या मृत्यूसाठी होता त्याने कसे द्रोणांना ठार मारले ते मला सांग. कौरवांच्या सगळया संरक्षक फळया तोडत ते पांडवांचे द्रोणांपर्यंत कसे गेले ते मला ऐकावयाचे आहे. त्या उशिनराच्या मुलांने काय केले ते सांग. शैव्यांना माझ्या सैन्याने कसे रोकले ते सांग. माझ्या कोणत्या शूरांनी राजा विराटाला अडवले ते सांग. घटोत्कचाला कोणी अडवले ते सांग. श्रींजयानी काय केले द्रोणांच्या वधामध्ये ते मला सांग. वासुदेव असल्याने पांडवांचा विजय निश्र्चित आहे तरी माझे सैन्य कसे लढत होते ते सांग. नारायण त्या युद्धात मुख्य देवता आहे म्हणून तो ज्यांच्या कडे ते जिंकणार हे मला ठाऊक आहे.

द्रोणाभिषेक पर्व भाग दहावा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग अकरावा

धृतराष्ट्र विचारतात संजयाला, वासुदेव लहानपणापासून दैवी कारवाया करत आहे, त्याच्या सारख्या कारवाया कोणी केल्याचे ऐकिवात नाही. नंदाकडे असतांना तो हयराजाला ठार मारतो. जो जंगलात रहात होता. जो दैवी अश्व उच्छश्रैवापेक्षा श्रेष्ठ होता. त्यांच लहानपणी त्याने दानवांना हरवले होते. असुर प्रल्म्व, नरक, जंभा, पिथा, मुरा अशा अनेकांना त्याने बाद केले आहे. मोठेपणी कंस, जरासंध, त्याचा मोठा भाऊ बलराम त्याला मदत करत होता. त्याच कृष्णाने युद्धात सुरसेना, सुनमन ह्याच्या अक्षौहिणी सैन्याला त्यांने पराभूत केले होते. दुर्वास ऋषी जे रागीट म्हणून ख्यातनाम आहेत त्यानी त्याला वर दिले आहेत. गांधाराच्या राजाच्या मुलीच्या स्वयंवराच्या प्रसंगी तो तेथे जमलेल्या सगळया राजांना घोड्याप्रमाणे त्याच्या रथाला जुंपतो व स्वयंवर जिंकतो. कृष्ण दैत्य नगरी शौभ आकाशात फेकून देतो. त्याशिवाय वंग, कलिंग, मगध, काशीस, कौसल, वत्स्य, गारगीय, करुष, पौंड्र त्याने लिलया जिंकले होते. अवंती, दक्षिणेकडील देश, पहाडी देश, देसर्क, काश्मीर, औरसिक, पिशाच, समुद्गल, कंबोज, वटधन, चोल, पांड्य, संजय, त्रिगर्त, मालव, दरद जे जिंकणे अशक्य समजले जात तेसुद्धा त्याने पादाक्रांत केले होते. खासी, शक, यवन त्याने मिळवले. असे सगळे त्यांने प्राचीन काली केले आहे. तो समुद्रा जाऊन वरुणाला हरवतो. दानवांना हरवून त्यांच्या कडून दैवी शंख पांचजन्य घेतो जे त्याचे वाद्य झाले आहे. अग्नीला संतुष्ट केले दोघांनी खांडववनात. महेंद्राला हरवून त्याच्याकडून पारिजातक पृथ्वीवर आणले. कोणी कृष्णाला पराजीत केले आहे असे कधी ऐकले नाही. अरे संजया त्यांने जी किमया माझ्या सभेत केली ती आठव, त्याला फक्त भक्तीने जिंकता येते, शस्त्रांने नाही अशी त्याची ख्याती आहे.कृष्णाच्या लिलांना मर्यादा नाहीत हेच खरे. गद, शम्व, प्रद्युम्न, विदूरथ, चारुदेशन, शरण, उल्मुख, निशाध, झिलीवब्रू, प्रीत्बू, विप्रीथू, समिक, अरीमेजय हे आणि इतर महान योद्धे वृश्नीमध्ये आहेत. ते आता ह्या युद्धात लढत आहेत. जेथे जनार्दन आहे तेथे बलराम आहे. तो जनार्दन पांडवांसाठी लधत आहे. त्यांच्याशी लढण्याचा विचार करणेसुद्धा मूर्खपणाचे आहे. तो मनात आणिल तर सगळी पृथ्वी पांडवांना आंदण देऊ शकतो. असा कोणता रथ आहे जो धनंजयाच्या रथापुढे जाईल ज्याचा सारथी कृष्ण आहे. माझा मूर्ख मुलगा केशवाला ओळखत नाही. दैवामुळें त्याच्या भोवती मृत्यूचा वेढा आवळला जात आहे. त्याला माहित नाही कीं, ते दोघे नर व नारायण आहेत प्राचीन ऋषी पृथ्वीवरील पाप कमी करण्यासाठी आले आहेत. सामान्य लोकांना वाटते कीं ते दोन आहेत परंतु, जे जाणतात त्यांना माहीत आहे कीं, ते एकच आहेत, ते सदैव अजिंक्य असतात. भिष्म व द्रोण कितीही श्रेष्ठ होते पण अखेरीस मृत्यूने त्याना नेलेच. वेदाचा

अभ्यास करा, ब्रह्मचर्य पाळा वैराग्य धारण करा कांहीं केले तरी मृत्यू नेणारच हे समजूनच माणसांने कर्म केले पाहिजे. ह्या दोघाच्या मृत्यूमुळें आम्हाला युधिष्ठीराच्या आश्रयाने रहावे लागणार आहे. युधिष्ठीराच्या क्रोधामुळें भिष्म व द्रोण मेले. मला असें वाटते सगळे नष्ट होणार आहे.जे कांहीं घडले ते सगळे मला सांग संजया.

द्रोणाभिषेक पर्व भाग अकरावा संपला.

## द्रोणाभिषेक पर्व

## भाग बारावा

संजय बोलतो, जे मी माझ्या डोळयानें पाहिले ते सांगतो. द्रोण कसे खाली पडले ते सांगतो. द्रोणांना पांडव आणि श्रींजय कसे ठार मारतात ते मी सांगतो. सरसेनापती पद मिळाल्यावर द्रोण कुमच्या मुलाला काय सांगतात ते प्रथम सांगतो, ते बोलले, "आपण मला हा सन्मान दिला आहे त्याबद्दल धन्यवाद करतो. माझ्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा आहेत, ते सांगा". ते ऐकल्यावर तुमचा मुलगा दुःशासन व कर्णाबरोबर चर्चा करतो व नंतर त्यांना बोलतो, "आपण पांडवांचा मोठा भाऊ युधिष्ठीर ह्याला अटक करा व माझ्या समोर त्याला जीवंत आणा". ते ऐकल्यावर तो त्यांचा एकेकाळचा गुरू बोलतो, "तू केवळ कुंतीपुत्राला अटक करावयाला सांगतोस? त्यापेक्षा त्याला मारण्याची आज्ञा दे, ते अधिक सोपे जाईल मला". त्यावर तुझा मुलगा त्यांना सांगतो की, "तुम्ही समजता तसे कांहीं नाही. मला त्याच्याबद्दल प्रेम वगैरे झालेले नाही. ह्यात एक कुटील कारस्थान आहे ते ऐका, मी त्याला व त्याच्या बरोबर त्याच्या मूर्ख आज्ञाधारक भावांना पुनः वनवासात पाठवणार आहे. त्यामुळे युद्ध करण्याचे कारणच रहाणार नाही. तेथे ते सगळे मूर्खासारखे रानात त्यांचे आयुष्य व्यतीत करतील व मी येथे मजेत राहीन परंतु, जर त्याला मारले तर त्याचे बंधू आम्हा सगळया कौरवांचा नाश करतील म्हणून त्या मूर्ख माणसाला तुम्ही माझ्याकडे जीवंत आणावे अशी मी तुम्हाला आज्ञा करत आहे".

द्रोण त्याला बोलतात, जर अर्जुनाचे संरक्षण त्याला नसते तर मी त्याला ताबडतोब अटक करून आणले असते. पार्थ बद्दल सांगावयाचे म्हणजे त्याला देवसुद्धा हात लावणार नाहीत. म्हणून मी ते करणार नाही. अर्जुन माझा शिष्य आहे, मी त्याला धनुर्विद्येचे पहिले धडे दिले आहेत. त्यानंतर त्यांने इंद्राकडून, भद्राकडून आणखीन विद्या संपादन केली आहे. त्याशिवाय त्याचा तुझ्यावर राग आहे म्हणून मी ते करणार नाही. परंतु, तू ते करण्याचे कार्य तुझ्या मित्राला सांगू शकतोस. जो पांडवांचा द्वेष करत असतो".

"तू अर्जुनाचा प्रथम नाश करून दाखव त्यानंतर तुझे काम सोपे होईल. कर्णाला सांग अर्जुनाचा नाश करण्याचे काम आणि पहा काय होते ते. एकदा अर्जुनाचा नाश झाला कीं, युधिष्ठीराला पकडणे अवघड नाही. जोवर अर्जुन आहे त्याचे संरक्षण करत तोवर देवांना असुरांना असे कोणालाही ते जमणार नाही".

संजय पुढे सांगतो, द्रोणांने तसे मर्यादित स्वरुपाचे आश्र्वासन दिले त्यामुळे तुझा मूर्ख मुलगा फार खूषीत जातो जणू काय युधिष्ठीर अटक झाला आहे. तरी तुझ्या मुलाला द्रोणांचा कल

पांडवांकडे आहे ते माहीत होते. म्हणून त्यांना त्यांचा शब्द पाळण्यास सांगून तो त्याच्या सैन्याला पार्थावर सोडतो. तो जाहिर करतो कीं, द्रोण युधिष्ठीराला अटक करणार आहेत. ती वार्ता पांडवांच्या गोटात पोहोचते.

द्रोणाभिषेक पर्व भाग बारावा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग तेरावा

संजय पुढे सांगतो, त्या मर्यादीत स्वरुपाची घोषणा द्रोणांनी केल्यानंतर युद्धभूमीत एकच गदारोळ उठतो. युधिष्ठीराला कैद करण्याचे फर्मान दुर्योधन काढतो? सगळे नवल करत असतात. युधिष्ठीराला त्याच्या द्युताद्वारा काय खबर आहे ते समजते. त्यात कोणता डाव आहे ते सुद्धा त्याला समजते. त्यानंतर तो त्याच्या सगळया भावांना व मित्र राजांना एकत्र बोलावतो व धनंजयाला बोलतो, "द्रोणाला आज्ञा झाली आहे कीं, त्याने मला कैद करून दुर्योधनापुढे आणावे व त्या प्रमाणे ते करणार असें दिसते, त्यासाठी आपल्याला असे करावे लागेल की तो उद्देश त्यांचा साध्य होणार नाही. त्याने सांगितले आहे कीं, प्रथम धनंजयाचा काटा काढावा दुर्योधनाने मगच ते युधिष्ठाराला कैद करण्याचे वचन पूर्ण करतील. ह्याचा अर्थ असा होतो कीं, सगळे तुझ्यावर अवलंबून आहे. त्यासाठी अशी कारवाई झाली पाहिजे कीं दुर्योधनाचा उद्देश साध्य होणार नाही".

अर्जुन बोलतो, माझ्या गुरूचा वध मी कधीच करणार नाही. त्यासाठी दुसऱ्या कोणाची नेमणूक करावी लागेल. त्याच प्रमाणे मी आपल्याला कधीच कैद होऊ देणार नाही. धृतराष्ट्राच्या मुलाला सत्ता पाहिजे व त्यासाठी हा खोटा मार्ग तो वापरू पहात आहे. त्याचे स्वप्न कधीच खरे होणार नाही. आकाशा त्यातील तारे घेऊन खाली पडेल एकवेळ, पृथ्वी कदाचित दुभंगेल परंतु, द्रोण आपल्याला कधीच कैदी करून घेऊ शकणार नाहीत जोवर मी आहे. मी आतापर्यंत कधीच हरलो नाही, माझे म्हणणे कधीच खोटे झालेले नाही, मी कधीच दिलेले वचन मोडलेले नाही. म्हणून आपण भय सोडून द्यावे".

संजय पुढे सांगतो, त्यानंतर युद्धाच्या आवाहनाची रणवाद्य शंख, ढोलकी, झांजा वाजवण्यास पांडवांच्या तळावर सुरूवात होते. पांडव मोठ्या मोठ्याने कौरवांना आव्हानं देऊ लागतात. त्या आवाजाने आकाश दुमदुमून निघते. तो गदारोळ ऐकून तुझ्या तळातून सुद्धा तसेंच आव्हानाचे आवाज येऊ लागतात. त्यानंतर युद्धाला तोंड फुटते. द्रोण व पांचाल एकमेकांना भिडतात. श्रींजय मोठ्या कष्टाने द्रोणाच्या पलटणीना हरवण्याचा प्रयत्न करत असतात पण त्यात त्यांना म्हणावे तसे यश येतांना दिसत नाही. त्याच प्रमाणे तुझ्या पलटणा सुद्धा पांडवांपुढे मार खात असलेल्या दिसत होत्या. दोनही बाजू आघाडीत यशस्वी होत नव्हत्या. त्यानंतर द्रोण आघाडी मारतात व पांडवांच्या फौजांची फळी तोडण्यात यशस्वी होतात. द्रोणांचा रथ असा चपळतेने फिरत होता कीं तो एकच नसून अनेक आहे असे वाटत होते. त्यामुळे पांडव आणि श्रींजयांच्या सैनिकांत घबराट पसरली. त्या वेळी द्रोण साक्षात सूर्य असावेत असे त्या दुपारच्या

प्रहरी चमकत होते त्या बाराव्या दिवशी. द्रोणांच्या त्या कारवाईमुळे पांडवांच्या गटात चिंतेचे वातावरण उत्पन्न झाले होते. त्यानंतर भारद्वजाचा मुलगा त्याच्या बाणांनी धृष्टद्युम्नाच्या फौजांचा परामर्श घेऊ लागतो. त्याच्या बाणांच्या वर्षावाने प्रिशताच्या मुलाच्या फौजा हवालदिल झाल्या होत्या.

द्रोणाभिषेक पर्व भाग तेरावा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग चौदावा

संजय पुढे सांगत असतो, द्रोणांच्या त्या कारवाईमुळें पांडवांच्या गटात गोंधळाचे वातावरण उत्पन्न झाले होते. द्रोण त्यांच्या सोनेरी रथातून बाणांचा वारेमाप वर्षाव करत होते. श्रींजयांना समजत नव्हते कीं, आता काय करावयाचे. द्रोणांच्या दनुष्यातून येणाऱ्या टणत्काराच्या आवाजांने सगळे आकाश भरून गेले होते. द्रौणांच्या चपळ हातांने ते जे बाण सोडत त्याच्यापुढे कोणाचा टिकाव लागत नव्हता. त्यांच्या बाणाने अनेक हत्ती, घोडे, त्यावरील स्वार, पाईक असें बरेच लोक यमाकडे गेले होते. त्यामुळे शत्रूपक्षात अस्वस्थता पसरली होती. त्यांच्या त्या एकेरी हल्ल्याने पांडव गटात संतापाची लाट उठली होती. त्या नरसंहारामुळे श्वापदांचे लोंढे रणभूमीत येऊ लागले होते. कित्येक हिंस्र पशू जमिनीवर पडलेले ताचे रक्त चाटत होती. रक्त मांसाचा चिखल सगळीकडे पसरला होता. तेथे मरून पडलेल्या माणसे व पशू ह्यांमुळें त्यांच्यातून चालत जाणे अशक्य झाले होते. रथ सुद्धा अडकून पडलेले होते. घोडे खिंकाळत होते. मेलेल्यांच्या बरोबर त्यांची शस्त्रं तेथे विखुरलेली होती. कित्येकांच्या अंगावरून दागिने सुद्धा त्या रक्ताच्या चिखलात पडलेले दिसत होते. अशी अवस्था होती त्या कुरुक्षेत्राची जेथे ते युद्ध होत होते. भिष्मांनी केलेला संहार व हा द्रोणांनी केलेला संहार सारखेच होते. द्रोण त्यांचा रथ घेऊन त्या रणांगणांत त्यांचा अडकलेला रथ काढण्याचे प्रयत्न करत असतांना युधिष्ठीर त्याच्या सैनिकांना द्रोणाच्या रथाला घेराव टाकण्याचे आदेश देतो. ते सैनिक पायी चालत त्या रक्ताच्या चिखलातून द्रोणांच्या रथाला घेराव घालतात. द्रोण ते पहात असतात पण कांहीं करू शकत नाहीत. त्यावेळी तुमचे शूर योद्धे पांडवांच्या योद्ध्यांने अडवण्यासाठी पुढे होतात. त्यांच्यात धमासान युद्ध पुन्हा सुरू होते. त्यात शकूनी मोठा भाग घेतो. तो सहदेवावर चाल करून जातो. तो त्याच्या सारथ्याला जखमी करतो. सहदेव त्यामुळे न घाबरता शकूनीचा रथ मोडून टाकतो. शकूनीवर साझ बाण मारतो. त्यामुळें तो जबर जखमी होतो. तरी तो शूर वीर योद्धा रथातून उडी मारतो व हातात गदा घेऊन सहदेवावर चाल करतो. तो सहदेवाच्या सारथ्याला खाली पाडतो. आता दोघांचे रथ निकामी झालेले असतात. ते दोघे गदायुद्ध सुरू करतात. द्रोण द्रुपदाला दहा बाण मारतात त्या बदल्यात द्रुपद द्रोणांना अनेक बाण मारतात. त्यांचे एकमेकांना बाण मारण्याचे तसे चालू होते. भिम विविंसतीला बाण मारतो. त्यामुळे त्याला कांहींच होत नाही. त्याचे भिमाला नवल वाटते. विविंसती भिमाचे घोडे मारून टाकतो. आता ते दोघे जमिनीवर येतात. त्यांच्या हातात गदा असतात. भिमसुद्धा त्याच्या शत्रूचे घोडे मारतो. तरी विविंसती घाबरत नाही. विविंसती तलवारीने भिमाशी लढण्यास सुरूवात करतो. भिम चवताळलेल्या हत्तीसारखा त्याच्यावर जातो.

सल्य हसत हसत नकूलाला जखमी करतो जो त्याचा भाचा आहे. मामाच्या त्या हल्ल्याने न घाबरता त्यांचे घोडे, छत्री आणि सारथी असे सगळे नष्ट करतो व त्या जोशात शंख वाजवू लागतो. धृष्टकेतू कृपांशी लढत असतो. त्यांच्यात बाणयुद्ध सुरू होते. सत्यकी हसत हसत कृतवर्मनीला जखमी करतो. तरीसुद्धा कृतवर्मन सत्यकीला बाणाने हैराण करतो. सेनापती शुशर्मनाला त्याच्या वर्मस्थानी बाण मारून जखमी करतो. शुशर्मन त्याच्यावर भाला फेकतो. विराट राजा त्याच्या मत्स्य योद्धांबरोबर शत्रूंशी लढत असतो. तो कर्णाला आव्हान देतो. ते विशेष लक्षणीय होते. कर्माला आव्हान देणे हेंच मोठे धाडसाचे समजले गेले. त्यांची लढाई चांगली जुंपली. राजा द्रुपद भागादत्ताशी लढत होता. त्यांचे द्वंद्व पहाण्यासारखे होते असें आकाशातील देव, ऋषी सांगत होते. सोमदत्ताचा मुलगा व शिखंडी दोघेही उत्तम लढवय्ये एकमेकांना पुरून उरले होते. भुरिश्रव यज्ञसेनाच्या मुलाला आव्हान देतो. शिखंडी सोमदत्ताच्या मुलाला, भुरिश्रवाला अनेक बाण मारतो. ते राक्षस हिडींबाचा मुलगा व अलमवुष ह्यांचे द्वंद्व वाखाणण्यासारखे होते. त्यांचे युद्धकौशल्य कमालीचे होते. ते त्यांची भ्रमकिमया एकमेकांवर वापर होते. भयंकर लढणारा चेकीतन अनुविंदाशी लढत होता. लक्ष्मण (दुर्योधन) क्षात्रदेवाशी लढत होता. पौरव राजा अभिमन्यूला आव्हान देतो. त्या दोघांत जे द्वंद्व झाले त्याची तारिफ देव करत होते. त्यामध्ये अभिमन्यू पौरवाचा झेंडा पाडतो. त्यानंतर त्याला अनेक बाण मारतो. ते केल्यानंतर तो आनंदाने सिंहगर्जना करतो. अभिमन्यू पौरवाला ठार मारण्यासाठी बाण लावतो परंतु, त्यावेळी हृदिकाचा मुलगा त्याचे धनुष्य मोडून टाकतो. अभिमन्यू धनुष्य सोडून तलवार ढाल घेतो. जमिनीवर उतरतो. त्याची हिम्मत धैर्य वाखाणण्यासारखे होते. ढाल व तलवार दोनही ते असे चालवत होता कीं ढालसुद्धा शस्त्र ढाली होती. त्या नंतर तो अर्जुनाचा मुलगा पौरवाच्या रथात चढतो व मोठ्यानो गर्जना करत त्याच्यावर वार करतो. तो पैरवाच्या झिंज्या पकडतो, त्याला खाली पाडतो. तलवारीचे वार त्याच्यावर करतो. त्यानंतर अभिमन्यू त्याला केस पकडूनच उभा करतो, पौरवाचे कांहींच चालत नसते. जसई गाय सिंहापुढे खाली मान घालून पडते तसे त्याचे झाले होते. पौरवाचे होत असलेले हाल जयद्रथाला पहावत नाहीत. तो हस्तक्षेप करून ते द्वंद्व थांबवतो. त्यानंतर जयद्रथ जोरांने ओरडतो. जयद्रथाच्या त्या आगाऊपणाने चिडलेला अर्जुनाचा मुलगा पौरवाला सोडतो व जयद्रथाकडे त्याचा मोर्चा वळवतो. जयद्रथाने फेकलेले भाले, कुर्हाडी तो त्याच्या हातात असलेल्या तलवारीचे दूर उडवतो. तो त्याची तलवार व ढाल वर उंच धरून योद्ध्यांना आव्हानं देत असतो. त्यानंतर तो वृधक्षत्राच्या मुलाकडे वळतो. जो त्याच्या पित्याचा शत्रू आहे. ते असे दिसत हेते जसे वाघ हत्तीकडे जात आहे. ते एकमेकांना पहातात व लढण्यास सुरूवात करतात, भीषण युद्ध होते. ते तोलासमोल असें समसमान होते. कोण अधिक चांगला योद्धा ते ठरवता येत नव्हते. दोन सिंह जसे लढावेत तसे ते होते. जयद्रथ अभिमन्यूच्या ढालीवर

वार करतो. त्याला ती ढाल अभिमन्यूच्या हातातून हिसकावून घ्यावयाची होती. त्याची तलवार तुटली आहे ते लक्षात आल्यावर तो अर्जुनाचा मुलगा चटकन रथात चढतो. ते द्वंद्व संपले होते. त्यानंतर रथाच चढलेल्या अभिमन्यूच्या मागे इतर राजे लागतात. तरी त्याचे ध्यान जयद्रथाकडे असते, तो पहात असतो जयद्रथ काय चाल करणार आहे. जयद्रथ हरला आहे ते समजल्यावर तो इतर कौरवांच्या कडे पाहू लागतो. त्यावेळी सल्य त्यावर एक भयंकर शर फेकतो. अभिमन्यू उडा मारून तो शर पकडतो. जसे गरुड उडता पक्षी हवेतच पकडते तसे ते दिसले. अभिमन्यू त्याची समशेर काढतो, त्याची कसब पाहून तेथे असलेले राजे अचंबित होऊन ते पहात होते. त्यांचे कौतुक करत होते. जोरजोरानो ओरडत त्याला प्रोत्साहन देत होते. त्यानंतर तो विषारी शर अभिमन्यू सल्याला मारतो. तो शर त्याच्या सारथ्याला ठार मारतो. त्यामुळे सल्य त्याच्या रथातून उतरतो.

विराट, द्रुपद, धृष्टकेतू, युधिष्ठीर, सत्यकी, केकया, भिम,धृष्टद्युम्न आणि शिखंडी, नकूल व सहदेव, द्रौपदीची पांच मुलं ते पाहून फार छान फार छान असे त्याला बोलून त्याचे कौतुक करत असतात. अर्जुनाच्या मुलाची ती कामगिरी तुझ्या मुलाला पचत नाही. त्याच्या अंगाची लाही लाही होते. तुझे सगळे कौरव त्याला घेरून त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतात. त्यानंतर तो महायोद्धा सल्य ज्याला कांहीं अर्त्यायिनी असेसुद्धा म्हणतात, तो संतापलेला असा त्या तरूण अभिमन्यूवर धावून जातो.

द्रोणाभिषेक पर्व भाग चौदावा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग पंधरावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, अरे संजया, तू मला अनेक द्वंद्वांची वर्णनं केली आहेस. ती ऐकून मला पाहू शकणाऱ्या लोकांचा मत्सर वाटू लागला आहे. कारण मी ते पाहू शकणार नाही. कुरु व पांडवांचे युद्ध पूर्वीच्या देव दानव युद्धा सारखेच होत आहे असे मला आता वाटू लागले आहे. त्या युद्धाच्या कथा पुढे लोक सांगत रहातील असे मला वाटते. तुझी सांगण्याची पद्धत फारच रोचक आहे, त्यामुळें मला ऐकावयाला फार आनंद होतो. आता मला सांग, अर्तायिन आणि अभिमन्यू ह्यांच्यातील द्वंद्वाची कहाणी.

संजय सांगू लागतो, सल्याला समजते कीं, त्याचा सारथी मेला आहे. तो त्याची गदा हातात घेतो व रथातून खाली उतरतो. त्यावेळी भिम त्याच्यावर धावून जातो. त्याचा तो अवतार साक्षात यमासारखा होता. अभिमन्यू त्याची गदा उचलतो सल्याला उद्देशून बोलतो, ये, ये माझ्याकडे ये, भिम त्याच्या पुतण्याला सांगतो कीं, तो त्यावेळी सल्याच्या व भिमाच्या मध्ये येऊ नये. त्यावेळी मद्रचा राजा सल्य भिमाला तेथे आलेला पहातो. त्याचवेळी तुतार्या जोर जोरांने वाजू लागतात. शंखनाद होऊ लागतात. सैनिक गर्जना करू लागतात. कौरव आणि पांडव योद्धे त्यांना उत्तेजन देण्यासाठी त्यांच्या नावांचे घोष करू लागतात. भिमसेनाला आव्हान गदायुद्धात देण्याचे धाडस फक्त एकच करू शकत होता व तो होता सल्य. त्याची गदा लोखंडाची होती. दोघे गदायुद्ध प्रारंभ करण्याआधीच्या प्रदक्षिणा करू लागतात त्या रणांगणाला. सगळे योद्धे आपापले द्वंद्व थांबवून त्यांचे पहाण्यात गर्क झाले. त्या प्राथमिक चक्रा झाल्यानंतर ते समोरासमोर ऊभे राहिले. दोन बलवान वृषभ जसे उभे रहावेत तसे ते होते. पहिला वार भिमाने केला. सल्याच्या गदेने तो झेलला व त्यालेळी त्यातून ठिणग्या निघाल्या. भिमसुद्धा त्याची गदा आकाशात भिरकावतो. त्या दोन गदा एकमेकांवर आकाशातच आदळतात. त्यांच्यातून ठिणग्या पडतात. त्यांचे द्वंद्व सुरू झाले व थोड्याच वेळात दोघे रक्ताने न्हावून निघतात. त्यांच्या रक्ताने मातीचा चिखल होतो. ते दोघे रक्ताने इतके माखलेले होते कीं, त्यांचे जसें दोन लाल पुतळे लढत आहेत असे वाटत होते. त्यांच्या फटक्यांचे आवाज दूरवर ऐकू येत होते. ते एकमेकांवर कधी उजव्या बाजूंने तर कधी डाव्या बाजूंने गदांचे प्रहार करत होते. गदा आणि मल्ल असे दुहेरी प्रकारे ते आता एकमेकांवर हल्ले करत होते. त्यांच्या लोखंडी गदा जेव्हां आदळत तेव्हां ठिणग्या पडत होत्या. जसे दोन इंद्र लढत आहेत असे पहाणाऱ्या देवांना वाटत होते. त्या वेळी अचानकपणे कृतवर्मन सल्याच्या बाजूने आला. सल्य थकलेला दिसत होता. कृतवर्मन वेगांने सल्याला त्याच्या रथात घेतो व तेथून पोबारा करतो. भिम

त्याची गदा उंच करून तेथे विजयी झाल्यासारखा उभा रहातो. तुमचा मुलगा सल्याला पळून जातांना पाहून थरथरू लागतो. तुमचे सैन्य घाबरलेले दिसत होते. ते सैरावैरा पळू लागले. जसे आकाशात ढगे पळतात तसे ते दिशाहीनपणे पळत होते. पांडवांचे योद्धे धृतराष्ट्रींना पळवल्यामुळे खूषीत दिसत होते. ते तुतार्या, झांजा, नगारे, शंखू वाजवू लागले आपला विजय दाखवण्यासाठी. त्यांच्या तोंडावर आनंद ओसंडू जात होता.

द्रोणाभिषेक पर्व भाग पंधरावा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व

## भाग सोळावा

संजय पुढे सांगतो, तुझी सेना अशारितीने भेदरलेली आहे हे पाहिल्यावर वृषसेन एकटा त्या सेनेला आधार देण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या कडे असलेली मायावी आयुध तो वापरू लागतो. त्याचे मंतरलेले बाण पांडवांच्या सैन्याचे चांगलेच नुकसान करतात. उन्हाळयातूल सूर्य जसा सगळयांना भाजून काढतो तसे त्याचे बाण पांडवांच्या योद्ध्यांना करपून टाकत होते. वृषसेन अशाप्रकारे एकट्या हाताने पांडवांचे अनेक हत्ती, घोडे, सैनिक ठार मारतो. तो नभिता पांडवांच्या पलटणींमधून फिरत होता. पांडवांचे राजे नकूलाच्या नेतृत्वाखाली गोळा झाले होते त्याला विरोध करण्यासाठी. नकूलाचा मुलगा सतनिक वृषसेनावर बाणांचा हल्ला करतो व त्याला जखमी करतो. कर्णाचा मुलगा वृषसेन ते बाण मोडत जातो. त्यानंतर तो सतनिकाच्या ध्वजस्तंभाला पाडतो. ते पाहिल्यावर द्रौपदीची इतर मुलं त्यांच्या भावाला वाचवण्यासाठी त्याच्या मदतीसाठी धावतात. लवकरच ते त्यांच्या बाणांनी वृषसेनाला त्यांच्या बाणांनी झाकून टाकतात. ते पाहून वृषसेनाला मदत करण्यासाठी द्रोणांचा मुलगा अश्र्वत्थामा जातो. द्रौपदीची मुलं त्यालासुद्धा बाणांच्या वर्षावाने बधीर करतात. त्यावेळी पांडव त्यांच्या मुलांना मदत करण्यासाठी त्या रणभूमीत जातात. त्यानंतर जे युद्ध झेडले जाते ते फारच भीषण होते. महाबली गरुड आणि नागराजे जसे एकमेकांत लढत होते तसे ते लढत होते. त्यात भिम, कर्ण, कृप, द्रोण, अश्र्वत्थामा, प्रिशताचा मुलगा धृष्टद्युम्न आणि सत्यकी एकत्रपणे सामील झाले होते. युगाताच्या वेळी जशी परिस्थिती असेल तशी वेळ आली होती. युधिष्ठीराचे सैन्य मोठ्या मोठ्यानो ओरडत तुमच्या सैन्याचा नाश करत होते. असंख्य रथ मोडले गेले होते. तुमचे सैन्य पळू लागले तेव्हां द्रोण त्यांना उद्देशून बोलतात कीं, "पळून जाऊ नका". ते बोलल्यानंतर तो रागावलेला सरसेनानी पांडवांच्या सैन्यात घुसतो. युधिष्ठीरीवर चाल करतो. युधिष्ठीर त्यांच्यावर धारदार बाण मारतो परंतु, द्रोण ते उचवून लावतो. त्यावेळी युधिष्ठीराचा संरक्षक कुमार जो पांचावचा एक राजपुत्र आहे, द्रोणांना अडवतो. द्रोणाना तो यशस्वीरित्या अडवतो आणि त्यात यशस्वी झाल्याची मोठ्यांने गर्जना करतो. रणांगणातील योद्धे त्याची तारिफ करणाऱ्या घोषणा करू लागतात, त्याचा द्रोणांना राग येतो. ते हजार बाण त्याच्यावर फेकतात. त्यामुळे कुमाराला जखमा होतात. त्यानंतर द्रोण कुमाराचा वध करतात. एक मंत्रविद्या जाणणारा हुशार क्षत्रिय मारला गेला म्हणून सगळे खंत व्यक्त करतात. द्रोण तुझ्या फौजेचे संरक्षक बनतात. द्रोण शिखंडीला व उत्तमौजसाला बारा बाण मारतात, नकूलाला सात, सहदेवाला पांच, युधिष्ठीराला पुन्हा बारा बाण मारतात. त्यानंतर त्यांचा मोर्चा वळतो द्रौपदीच्या मुलांकडे त्याना प्रत्येकी पांच बाण मारतात. विराटाला दहा बाण

लागतात, त्या भडीमारामुळे सगळे युद्धक्षेत्र हादरून जाते. त्यानंतर द्रोण युधिष्ठीराला कैद करण्याच्या इराद्याने पावले टाकू लागतात. त्यावेळी युगंधर द्रोणांना अडवतो. त्यानंतर विराट, द्रुपद, कैकेया, सत्यकी, सिवी, व्याध्रधर पांचालचा राजपुत्र, पराक्रमी सिंघसेन आणि इतर बरेच द्रोणाला घेरतात. व्याघ्रधर द्रोणांवर असंख्य बाम मारतो व त्यांना बेजार करतो. सिंघसेन सुद्धा तसेंच करतो. द्रोण त्यांच्यावर चाल करून जातो. अश्र्वत्थामा त्याच्या बाणाने सिंघसेन आणि व्याघ्रदत्ताच्या हत्तीचे कान कापतो. त्याशिवाय इतर राजाच्या घोड्यांना इजा करतो. ते केल्यावर तो युधिष्ठाराच्या रथासमोर उभा होतो. साक्षात यम असा त्याचा अवतार होता. युधिष्ठीर सापडला अशा आरोळया तुझ्या सैन्याचे लोक मारत असतांना त्याच सुमारास अर्जुन त्याचा मुकूट घातलेल्या पेहरावात तेथे येऊन पोहोचतो. त्याने मारलेल्या योद्ध्यांच्या रक्ताचे पाट वहात होते. त्याने तुझ्या असंख्य योद्ध्यांचा नाश केला होता. तो पंडुपुत्र तेथे अचानकपणे आल्याने कौरवांचा जोर कमी होतो. अर्जुनाचे बाण एका धारेत येत होते. त्यांना अडवणे केवळ अशक्य प्रायः होते. त्याच्या बाणाने सगळे आसमंत सगळी क्षितिजे भरून गेले होते. त्याच्या बाणांच्या धुक्यामुळें कोणी कांहीं पाहू शकत नव्हते. त्याच वेळी सूर्य अस्ताला गेला होता. त्या दिवशीचे युद्ध थांबले होते. कोण मित्र कोण शत्रू समजत नव्हते. द्रोण आणि दुर्योधन ह्यांना त्यांच्या फौजांना परत फिरण्याचे आदेश दिले जातात. त्या दिवशीचे युद्ध संपल्याचे सांगणारी वाद्ये वाजू लागतात. सैनिक आपापल्या निवासस्थानी परततात. पांडव सुद्धा त्यांच्या त्यांच्या सैन्याला परत बोलावतात. पांडव, पांचाल आणि श्रींजय युधिष्टीर वाचल्यामुळें आनंदात असतात. ते जिश्नुची स्तुती करतात जसे ऋषी सूर्याची करत असतात. धनंजयाला सुद्धा खूप आनंद झालेला असतो. ते सगळे त्यांच्या निवासस्थानी सावकाशपणे जात असतात. बारावा दिवस संपला होता.

द्रोणाभिषेक पर्व भाग सोळावा संपला.

# द्रोणाभिषेक पर्व (संपले)

## भाग सतरावा

संजय पुढे सांगत असतो, दोनही बाजूचे सैन्य आपापल्या तळावर जातात रात्रीची विश्रांती घेण्यासाठी. सगळे आपापल्या ठिकाणी गेले होते परंतु, द्रोणांना चुकल्या चुकल्या सारखे सतत वाटत होते. त्यांची मोठी संधी हुकली होती. युधिष्ठीर थोडक्यात त्यांच्या हातातून निसटला होता. त्यांना शरम वाटत होती. ते दुर्योधनाला सांगतात कीं, जर अर्जुन तेथे असेल तर त्या पांडवाला पकडणे शक्य होणार नाही. आणि तसेंच झाले आज. देवसुद्धा ते करू शकणार नाहीत. तुम्ही सगळे जरी त्याच्यावर चालून गेलात तरी तो सगळयांना पुरून उरेल अशी शक्ती त्याच्यात आहे. तो माणूस नाही हे लक्षात घ्या. कृष्ण आणि अर्जुन एकत्र असल्यावर त्यांना कोणीही बाद करू शकणार नाही. जर तू कांही करून त्याला अर्जुनाच्या संरक्षणातून दूर करू शकलास तरच युधिष्ठीराला पकडता येईल एरवी शक्य नाही असे द्रोण दुर्योधनाला निक्षून सांगतात, "युधिष्ठीर आहे त्यापेक्षा फार दूर अशा जागी अर्जुनाला युद्धात अडकवलेस तर ते शक्य आहे एरवी नाही. जर ते तुला करता आले तर मी धृष्टद्युम्नाच्या समोर यमाच्या मुलाला त्याच्या पलटणीसकट पकडून आणीन असा मी तुला विश्वास देतो".

संजय पुढे सांगतो, द्रोणाचे ते आश्वासन ऐकल्यावर त्रीगर्ताचा राजा व त्याचे बंधू बोलतात, "आम्हा राजांचा तो गांडीवधारी नेहमी अपमान करत असतो. जरी आम्ही त्याला कधी त्रास दिलेला नाही. तरी तो मात्र आम्हाला सतावत असतो. त्याच्यामुळे आमची रात्रीची झोप नाहीशी झालेली आहे. म्हणून ते करण्याचा आमचा निर्धार आहे. जर आमचे भाग्य असेल तर आम्ही त्या धनंजयाला धडा शिकवू इच्छितो. ते करण्याची आता वेळ आली आहे असे वाटते. त्याला आमच्या मागे लागावयाला लावू. तो आमच्या मागे धावत येईल व आम्ही त्याला मारू व तुम्ही युधिष्ठीराला पकडा. असें करता आले तर बरे होईल. आमच्या शब्दावर भरवसा ठेवा. सत्यरथ, सत्यवर्मन, सत्यव्रत, सत्येशू आणि सत्यकर्मन तेंच आग्रहाने शपथेवर बोलतात. त्यांच्या कडे दहा हजार रथ आहेत. ते दुर्योधनाला असें बोलतात. त्याशिवाय मलव, तुंडीकेरी त्यांच्या हजार रथांनी येण्यास तयार होतात, शुशर्मन प्रिशस्थलचा राजा, मवेलक, ललिथा, मद्रक त्यांच्या प्रत्येकी हजार रथानिशी त्यात भाग घेण्यास तयार होतात. ते सगळे एकंदर प्रमुख सात राजे एकत्र येतात म्हणून त्यांचा उल्लेख संसप्तक असा झाला. ते सगळे अर्जुनाचा खत्मा करण्याची शपथ तुझ्या मुलापुढे घेतात. शपथ घेण्याच्या विधीसाठी ते कुस गवत आणतात. अग्नी पेटवतात त्यांत

संमीधा घालतात, त्यासाठी तसे वस्त्र नेसतात. ब्रह्मणांना दानं दिली जातात. दंडाला शपथेचा गंडा त्यासाठी बांधतात. त्यांच्या धनुष्याची पुजा करतात. अशाप्रकारे तो यज्ञ संपन्न होतो. ब्राह्मण त्यांना आशिर्वाद देतात. अशा विधिने जे क्षत्रिय युद्धासाठी स्वताला वाहून देतात त्यांना ते स्वर्गात खात्रीने जातात असें समजले जात असें. तो विधी केलेले क्षत्रिय संसप्तक म्हणून ओळखले जातात. त्यासाठी ब्राह्मणांना मोठ्या देणग्या ते देतात. ब्रह्मचारी व वेदाचा अभ्यास करणारे ह्यांची पुजा ते करतात. सोनं चांदी, जडजवाहर, उंची वस्त्रं ते दान करतात. मोठा विघी होतो. त्यात तुझा मुलगासुद्धा सामील असतो. तेसुद्धा दानं करत असतो व ब्राह्मणांना खूष करत असतात ते सगळे शपथवीर क्षत्रिय. त्यात धनंजयाचा वध करण्याची मुख्य शपथ ते घेत असतात. त्या शपथेत ते मान्य करतात की ते कधी नशापाणी करणार नाहीत. ते त्यांच्या गुरूच्या पत्नीशी संबंध करणार नाहीत, ते कोणाच्या गोष्टी चोरणार नाहीत, ते ब्राह्मणाची चोरी करणार नाहीत, विश्र्वासघात करणार नाहीत, ते स्त्रीच्या इच्छे विरुद्ध तिच्याशी संबंध करणार नाहीत. ते त्यांच्या स्त्रीच्या मासिक पाळीच्या काळी जबरदस्ती करणार नाहीत. जे श्राद्धाच्या व दुसऱ्या दिवशी कोणत्याही बाईशी झोपणार नाहीत. चोरटे व्यवहार करणार नाहीत, जे अश्रद्ध आहेत त्यांच्याशी संबंध ठेवणार नाहीत. ज्यात पाप आहे ते कांहीं ते करणार नाहीत. धनंजयाला मारल्याने अथवा त्याच्या कडून मारले गेल्यामुळे आम्हाला उत्तम लोक मिळो अशी त्यात प्रार्थना होती. ब्राह्मणांकडून ते अशी शपथ करून घेतात. नंतर ते अर्जुनाला दक्षिणेकडच्या भागात लढण्यासाठी बोलावण्याचे ठरवतात. ते ठरवल्यावर ते तेराव्या दिवशी युद्धासाठी रणांगणाकडे निघतात. अर्जुनाला ते तसे आव्हान देतात ते समजल्यावर तो पांडव त्याच्या मोठ्या भावाला बोलतो, "मी आव्हान कधीच नाकारत नाही. शुशर्मन व त्याच्या लोकांनी मला दक्षिणेकडे लढण्यासाठी आव्हान दिले आहे. मला ते आव्हान घेण्याची आपण परवानगी द्यावी. ते आधीच मेले आहेत असे समज". युधिष्ठीर त्याला समज देतो कीं, द्रोणांनी जे सांगितले आहे त्याप्रमाणे माझ्यापासून तुला दूर नेण्याचा हा त्यांचा डाव आहे हे समजून घे. द्रोण फार शक्तीमान आहेत. जर तू माझ्या बरोबर नसशिल तर ते मला सहज पकडू शकतील. त्याचा सुद्धा विचार करावा कारण, हा त्यांचा डाव आहे कीं, तू माझ्यापासून दूर रहावेस. अर्जुन त्याला बोलतो, "सत्यजित आज तुझा संरक्षक असेल. जोवर सत्यजित तुमच्या जवळ आहे गुरूजी (द्रोण) तुला पकडू शकणार नाहीत असा माझा विश्र्वास आहे. परंतु, जर तो मारला गेला तर तुम्ही युद्धात राहू नका, जरी आपले सैन्य तुमच्या भोवती असले तरी.

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीर त्यानंतर अर्जुनाला ते आव्हान घेण्याची परवानगी देतो. त्याला मिठी मारतो. त्याच्याकडे प्रेमाने पहातो. अशारितीने युधिष्ठीराच्या संरक्षणाची व्यवस्था

केल्यानंतर तो आव्हान घेण्यासाठी निघतो. महाबली पार्थ त्रिगर्तांचे आव्हान घेण्यासाठी दक्षिणेकडे जातो.

दुर्योधनाचे कपटी लोक त्या संधीची वाट पहात असतात. ते युधिष्ठीराला कैद करण्यासाठी फारच उत्तेजित होतात. ते असे लढतात जसे गंगा व शरयू एकमेकात मिसळत आहेत.

द्रोणाभिषेक पर्व भाग सतरावा संपला.

# समसप्तक बंध पर्व (सुरू)

## भाग अठरावा

संजय पुढे सांगत असतो, ते संसप्तक आनंदात असतात. ते अर्जुनाचा पराभव करण्यासाठी व्युह रचना करतात. त्याचा आकार चंद्राच्या कोरीसारखा असतो. ते अर्जुनाला त्या बेचकीत पकडण्याचा डाव साधणार असतात. ते अर्जुनाला येतांना पहातात. त्याला येतांना पाहून ते उत्साहाने ओरडू लागतात. त्यांच्या आरोळयाने आकाश दुमदुमून निघते. सगळया दिशा त्याने दणाणून निघतात. ते एक सपाट मैदान असते, माणसां शिवाय तेथे कोणी नव्हते. अर्जुन ते पाहून अलगदसा हसतो. त्याला त्या क्षत्रियांची किंव आलेली असते. तो देवकीच्या मुलाकडे पहातो. त्याला बोलतो, ते पहा जनार्दना, त्रिगर्त मरण्यासाठी सज्ज उभे आहेत. ते रडण्या ऐवजी हसत आहेत ह्याची मला गंमत वाटते. खरेखरच हा त्यांचा शुभ दिवस आहे कारण आज ते त्या लोकांत जाणार आहेत जेथे भित्रे जाऊ शकत नाहीत. ते बोलत असतांत तेवढ्यात तो व हृषिकेश त्या चंद्रकोरीच्या मध्ये येऊन पोहोचतात. तेथे आल्यावर तो त्याचा देवदत्त शंख काढतो व वाजवू लागतो. त्या शंखनादाने सगळ्या दिशा भरून निघतात. त्या नादाने कांहीं संसप्तक घाबरतात. ते तसेंच उभे रहातात. त्यांच्या अंगातून घाम फुटतो. त्यांचे पशूसुद्धा डोळे मोठे करून एकडे तिकडे पाहू लागतात कांही मुततात. कांहीं रक्त ओकतात. तरी ते हिम्मत करून आपापल्या रांगेत राहून अर्जुनवर बाणांचा वर्षाव करू लागतात. अर्जुन त्याच्या पांच ते दहा बाणांने ते सगळे शेकडो बाण उलटवतो त्या मारणाऱ्यांवर. त्यातून कांही जिश्नुला लागतात. त्यातील कांही राजे त्याच्यावर प्रत्येकी पांच बाण मारतात. त्या लढाईने त्यांना चेव येतो व ते पुन्हा पार्थ व माधवावर जोरांने बाणांचा वर्षाव करू लागतात. त्या वर्षावाचा दोघाना कांहींच त्रास होत नाही. ते अर्जुनाच्या मुकूटावर नेम धरून बाण मारतात. पण त्याचा कांहींच परिणाम होत नाही. ते सगळे बाण अर्जुन तोडून टाकतो. सुवाहू, सुधर्मन, सुधवान, पार्थावर सतत बाण मारत असतात. अर्जुन त्यानंतर सुधवानचे धनुष्य तोडून टाकतो. अर्जुन त्यांचे सगळे बाण उलटवत असतो. त्यानंतर अर्जुन त्यातल्या एकाचा घोडा मारून टाकतो. त्यानंतर तो त्या संसप्तकांपैकी एकाचे पागोटे उडवतो. ते झाल्याने त्याचे इतर सहकारी घाबरतात. ते तेथून पोबारा करतात व जेथे दुर्योधन होता तेथे जातात. ते पाहिल्यावर इंद्राचा मुलगा प्रचंड रागावतो त्या दुर्योधनाच्या लोकांवर संतत धार असा बाणांचा वर्षाव करतो. त्यामुळे त्याचे विरोधक हरल्याचे मान्य करतात. त्रिगर्त आता खरोखरच फार घाबरलेले असतात. अर्जुन त्यांचा संहार करत असतांना ते मात्र शुंभासारखे तसेंच पहात उभे असतात. जणूकाय ते मंतरलेले होते. दुर्योधन आपल्याला भित्रे म्हणेल त्याचे त्यांना

वैषम्य वाटते. दुर्योधन त्यांना आदेश देतो की असे पळून जाऊ नका, तुमच्या कुवतीप्रमाणे लढत रहा. त्यानंतर ते संसप्तक पुन्हा रणांगणात उतरतात. ते नारायणाच्या हातून मरण्यासाठीच.

संसप्तक बंध पर्व भाग अठरावा संपला.

## संसप्तक बंध पर्व

## भाग एकोणीसावा

संजय पुढे सांगतो, अर्जुन पहातो कीं ते पळालेले संसप्तक पुन्हा रणांगणात आले आहेत. तो वासुदेवाला बोलतो, "आपला रथ संसप्तकांच्या कडे न्यावा. ते जीवंतपणी लढण्याचे थांबवणार नाहीत असें दिसते. त्याना यमाकडे पाठवावे लागेलच. आज माझ्या मित्रा तू माझ्या शस्त्र सामर्थ्याची प्रचिती घेशिल. आज मी त्या सगळयांना ठार मारणार आहे. जसें रुद्र युगांती पशूंचा वध करतात. त्याचा तो निर्धार ऐकून कृष्ण हसतो. त्यांचा रथ त्या संसप्तकांच्या घेर्यात आणून ठेवतो. त्यानंतर ते नारायण रागात येऊन आपली दैवी आयुध काढतात. त्यांच्या बाणांच्या वर्षावामुळे धनंजय आणि कृष्ण दिसेनासे होतात. त्यानंतर फाल्गुनी संतापलेला, त्याचे शंख वाजवतो. त्यानंतर तो त्याच्या बाणांचा वर्षाव करू लागतो. तो त्वश्त्री आयुध वापरतो. ते आयुध एका क्षणात फार मोठा जनसमुह नष्ट करू शकणारे होते. त्या मायावी शस्त्रामुळे कौरवांच्या सैनिकांना अर्जुन त्यांच्यातच दिसू लागतो. त्यामुळे ते सैनिक एकमेकांना बाण मारून ठार करू लागतात. ते तसे सतत होत राहिले. त्यांच्याच बाणांने ते त्यांच्याच लोकांना ठार मारत होते. त्या त्यांच्या स्वताच्या बाणांच्या भडिमारामुळे ते यमाच्या घरी गेले. ते दृष्य पाहून विभत्सू हसत होता. मवेलक आणि त्रिगर्त बाजूचे योद्धे अशारितीने मारले गेले. त्यानंतर उरलेले संसप्तकांचे सैनिक अर्जुनावर बाणांचा वर्षाव करू लागतात. परंतु, त्यामुळें त्या दोघांचे कांहींच बिघडत नाही. ते दोघे मोठ्याने ओरडून आपला आनंद व्यक्त करतात. परंतु मायावी अस्त्रांमुळें त्या संसप्तकातील लोकांना असें वाटते कीं, त्यांनी अर्जुनाला व कृष्णाला मारले आहे. त्या गैरसमजाच्या प्रभावाखाली ते आपली वस्त्रं उडवून आनंद व्यक्त करतात. त्या आनंदात ते त्यांची रणवाद्ये वाजवू लागतात. कृष्ण पार्थाला विचारतो, "अरे दोस्ता, तू कोठे आहेस? तू जीवंत आहेस कां"? ते ऐकल्यावर अर्जुन वायव्य अस्त्र वापरतो. त्यामुळे आधीचे भ्रमदृष्य नाहीसे होते. त्या वार्याच्या झोतामुळे कौरवांचे सैन्य त्या जागेतून दूर ढकलले जाते. ते दृष्य विलक्षण होते पहाणाऱ्यांसाठी. आकाशातील देव व ऋषी आनंदाने टाळया वाजवू लागतात. त्याचवेळी अर्जुनाच्या बाणांमुळे संसप्तकांच्या सैनिकांची डोकी उडवली जातात. त्याशिवाय असंख्य सैनिक जखमी झाले होते. ते सुद्धा मातीत पडलेले होते. अशारितीने धनंजय त्याच्या शत्रूंचे हात पाय डोकी कापत जातो. त्या शत्रूंचे हत्ती, घोडेसुद्धा तो मारत असतो. पुन्हा एकदा तेथे मुडद्यांचा ढीग लागतो. कित्येकांच्या डोळयाची बुबुळं बाहेर आलेली असतात. पाईक सैनिकांचे पात पाय तुटलेल्या अवस्थेत तेथे विव्हळत पडलेले दिसत होते. जे मेले ते सुटले परंतु, जे जखमी झाले त्यांचे हाल बघवत नव्हते. अर्जुनाच्या बाणांमुळें जो रक्ताची सडा पडत होता त्याने सगळू जमीन लाल झालेली होती. त्या

रणधुमाळीत अर्जुनाचा रथ तेजांने चमकून दिसत होता. जसा रुद्राचा रथ असावा. ते दक्षिणेकडील रणक्षेत्र संसप्तकांच्या मुडद्याना खचाखच भरलेले होते. ते युद्ध होत असतांना उत्तरेकडे द्रोण त्यांच्या फौजा घेऊन ठरल्या प्रमाणे युधिष्ठाराच्या फौजेवर चाल करून जाण्याच्या तयारीत असतात. ते युधिष्ठीरावर चाल करतात. तेथे युद्ध जोर धरते.

संसप्तक बंध पर्व भाग एकोणीसावा संपला.

## संसप्तक बंध पर्व

## भाग विसावा

संजय पुढे सांगतो, त्यानंतर तो दिवस संपतो व चौदावा दिवस उगवतो. भारद्वजांचा पुत्र द्रुर्योधनाला बोलतो, "अहो राजन मी आपला सेवक आहे. ठरल्या प्रमाणे धनंजयाला आपण संसप्तकांच्या ठिकाणी पाठवले आहे. तेव्हां मी युधिष्ठीराला कैद करण्याच्या कामाला सुरूवात करणार आहे". असे सांगून द्रोण त्यांच्या सैन्याची जुळवाजुळव करू लागतात. युधिष्ठीरीला पकडण्यासाठी ते निघतात. द्रोणांनी त्यासाठी गरूड प्रकारचे व्युह रचलेले असते त्यात द्रोण मुख्य जागी असतात. युधिष्ठीर त्याचे सैन्य त्या कौरवांच्या व्युहाला तोडण्यासाठी त्यांची व्युहरचना करतात. द्रोणांच्या व्युहात दुर्योधन मध्य भागी रहातो. त्याच्या भोवती त्याचे उरलेले भाऊ असतात. कृतवर्मन आणि कृप त्याच्या दोन टोकांना असतात. जसे माशाला पकडम्यासाठी जाळे टाकावे अशी व्यवस्था केलेली होती. त्यांचे सैन्य होते भूतशर्मन, क्षेमशर्मन, करकक्ष, कलिंग, देसरक, शक, यवन, कंबोज, हंसपद, सुरसेना, दरद, मद्र आणि कालीकेय ह्यांची शंभरानी फौज ज्यात हत्ती, घोडे रथ, पाईक असें सगळे त्या गरुडाच्या मानेशी होते. भुरिश्र्वर, सल्य सोमदत्त, वल्हिक, अक्षौहीणी सैन्याबरोबर होते. ते त्यांच्या जागा घेतात. विंद, अनुविंद अवंतीचे आणि सुदक्षिण कंबोजचा राजा त्या गरुडाच्या डाव्या बाजूस राहीले. द्रोणांचा मुलगा अश्र्वत्थामा त्यांच्या मागे होता. गरुडाच्या मानेत होते कलिंग, अम्वस्थ, मगध, पौंड्र, मद्रक, गांधार, शकूनी आणि पूर्वेकडील गिर्यावर्दी व वसती असे सैनिक होते. त्याच्या शेपटाडे कर्ण होता. त्याच्या बरोबर त्याचा मुलगा होता. त्याशिवायत्येचे मित्र राजे होते. जयद्रथ, भिमरथ, संपती, जय, भोज, भूमिंजय, वृष, कृथ, आणि बलाढ्य निशाध होते. ते सगळे उत्तम योद्धे होते. त्यांच्या बरोबर मोठे लष्कर तैनात होते. त्या सगळयांचे लक्ष्यावर ध्यान होते. त्या सगळया योद्ध्यांचा उत्साह ओसंडून जात होता. त्या सगळयामध्ये प्रागज्योतिषचा राजा भागादत्त त्याच्या हत्तीवर चमकत होता. त्याच्या गळयात हाराच्या माळा होत्या. तो पोर्णिमेच्या चंद्रासारखा तेजस्वी दिसत होता. त्याचा हत्ती पावसाळयातील ढगा सारखा सावळा होता. त्याचा आकार एकाद्या डोंगरासारखा अजस्त्र होता. भागादत्ताच्या बरोबर डोंगराळ प्रदेशातील राजे होते. त्यांच्याकडे त्यांची विविध शस्त्रं होती.

युधिष्ठीर ते पहातो. प्रिशताच्या मुलाला बोलतो, "अरे धृष्टद्युम्ना असे कांहीं केले पाहिजे कीं ते मला पकडू शकणार नाहीत". तो बोलतो, "आपण कधीच त्याच्या ताब्यात जाणार नाही. त्याने

कांहीं केले तरी त्यांना त्यात यश येणार नाही. मी आज द्रोणांना पकडणार आहे जे माझे मुख्य काम आहे. मी जोवर आहे तोवर आपण निश्चिंत असा. द्रोण मला हरवू शकणार नाहीत".

संजय पुढे सांगतो, ते बोलल्यावर तो द्रोणाकडे बाणांचा वर्षाव करू लागतो. द्रोणाला पहातात. त्यांच्या दृष्टीने तो एक अशुभ शकून होता. ते त्याला पाहून निराश झालेले असतात. तुमचा मुलगा दुर्मुख द्रोणांना मदत करण्यासाठी पुढे होतो. तो धृष्टद्युम्नाला विरोध करू लागतो. धृष्टद्युम्न त्याला मारतो व पुन्हा द्रोणांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यावेळी द्रोण युधिष्ठीराचे बरेच सैन्य मारून टाकतो. त्या साधारण वाटणाऱ्या चकमकीचे एका पूर्ण युद्धात लवकरच रुपांतर झाले. जसें रिमझीम पडणाऱ्या पावसाचे मुसळधार पावसात रुपांतर व्हावे. कोण कोणाला मारतो तेंच समजत नव्हते. केवळ अंदाजपंचे ते बाण मारत होते. बऱ्याच वेळा तुझे सैनिक तुझ्याच सैनिकाला मारत होते तसेंच पांडवांच्या बाबत सुद्धा होत होते. हत्ती त्यांच्या वरील झेंड्यामुळे ओळखता येत होते कीं ते कोणाचे आहेत. तुफान झालेले हत्ती त्यांच्या सुळयांनी कोणालाही भोसकत होते. त्यात त्यांचे सुळे तुटत होते. हत्तींच्या पायाखाली कित्येक चिरडले जात होते. कांहीं हत्ती जखमांमुळें वेदनांनी बिथरलेले सैरावैरा धावत होते. त्यात कित्येक रथ मोडत होते व त्यावरील योद्धे फेकले जात होते. त्या रणधुमाळीत घाबरून सगळे युद्ध सोडून पळ काढत होते. जणू काय युगांत आला होता. मृत्यूचे तांडव चालू होते. हत्तीवर बसलेले योद्धे तोल जाऊन खाली पडत व मरत होते दुसऱ्या हत्तीच्या पायाखाली. सगळे भीषण होते. माहूत मेलेले हत्ती बेतालपणे इकडे तिकडे धावत होते. योद्ध्यांची शस्त्रं सगळीकडे विखुरलेली पडलेली होती. प्रचंड आकाराचे हत्ती कोसळल्यामुळे जमीन हादरत होती.

मेलेले योद्धे त्यांच्या हातात शस्त्रं तसेंच आहे असें जमिनीवर पडलेले दिसत होते. जखमी हत्तींच्या खिंकाळण्याने सगळे आकाश दणाणत होते. रक्त मांसाचा चिखल पसरला होता. तेथे पडलेल्या मृत प्राण्यांच्या अंगावरून जाणे दुरापास्त होते. आपला जीव वाचवण्यासाठी जो तो पळत होता. हत्ती रथांना उचलून फेकत होते त्यातील स्वार व सारथी आकाशात भिरकावलेले दिसत होते. जखमांनी भरलेले ते क्षत्रिय बाप कोण मुलगा कोण ते न पहाता मारत होते. जमिनीवर रक्त मांसाचा असा चिखल झाला होता कीं त्यातून चालणे अशक्य होते. सगळया गोष्टींवर लाल रक्ताचा रंग चढला होता. सगळे लालेलाल झाले होते. त्यात द्रोणांचे लक्ष मात्र युधिष्ठीरावर चांगले होते. ते त्याच्या रथाकडे जाण्यास सुरूवात करतात.

संसप्तक बंध पर्व भाग विसावा संपला.

# संसप्तक बंध पर्व

## भाग एकविसावा

संजय पुढे सांगत असतो, द्रोण युधिष्ठराला जवळ आहे हे पाहिल्यावर त्याच्यावर ते बाणांचा जोरदार वर्षाव सुरू करतात. त्यामुळें युधिष्ठीराच्या सैनिकांत मोठ्याने आरडाओरड सुरू होते. जसे जेव्हां हत्तीच्या कळपावर सिंह हल्ला करतात तेव्हा हत्ती जसे चित्कार करतात. द्रोण जवळ येत आहेत हे सत्यजित पहातो. तो द्रोणांवर हल्ला करतो. त्यांच्याच द्वंद्व सुरू होते. जसे वली आणि इंद्राचे झाले प्राचीन काळी. सत्यजित त्याच्या बाणांनी द्रोणांना खोल जखमा करतो. असें कीं त्यामुळे द्रोण मारले जावेत. तो द्रोणांच्या सारथ्याला बेशुद्ध करतो. त्यांच्या घोड्यांना दहा बाण मारतो. त्यानंतर तो द्रोणांच्या सहाय्यक सारथ्यांना सुद्धा ठार मारतो. त्याचा राग वाढत असतो, तो द्रोणांच्या ध्वजस्तंभाला पाडतो. सत्यजित द्रोणांना यमाकडे पाठवण्याच्या तयारीनेच युद्ध करत होता. तेवढे झाल्यावर द्रोण त्याची दखल घेतात. ते सत्यचिताला ठार मारण्याचे ठरवतात.

प्रथम ते सत्यजिताचे धनुष्य तोडून टाकतात. त्यानंतर ते त्याचा खोल जखमा करतील असें बाण मारतात. त्यामुळें न डगमगता तो नवीन धनुष्य घेतो. द्रोणांवर जोराचा हल्ला करतो. ते पाहिल्यावर पांडवांच्या सैनिकांत उत्साह येतो व ते सत्यजिताला उत्तेजन देण्यासाठी जोराजोराने ओरडून प्रोत्साहन देऊ लागतात. त्यामुळे आणखीन एक त्यांचा योद्धा उत्तेजित होतो तो वृक, द्रोणांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. द्रोणांच्या छातीत तो त्याचे बाण मारत असतो. त्याचा द्रोणांना फार त्रास होतो असें दिसते. त्यामुळें द्रोणांना खूप राग आलेला असतो. ते दातओठ चावत वृकावर बाणांचा मारा सुरू करतात. ते वृकाचे धनुष्य मोडून टाकतात. त्या नंतर ते सहा बाणांनी वृक व त्याच्या सारथ्याला ठार मारतात. सत्यजित मोठा तिरकमठा घेऊन द्रोणांवर हल्ला करतो. त्यांचे घोडे, सारथी जखमी करतो व त्यांचा ध्वज पाडून टाकतो. तो अपमान द्रोण सहन करू शकत नाहीत. द्रोण त्याच्या प्रतिस्पर्धावर जोराचा हल्ला मोठे बाण मारून करू लागतात. सत्यजिताचे सहाय्यक सारथी ते मारून टाकतात. त्यानंतर सत्यजित ऐकत नाही ते पाहून द्रोण एका धारदार बाणांने सत्यजिताचे मुंडके उडवतात. सत्यजित खाली कोसळतो. युधिष्ठीराला द्रोणांची भिती वाटू लागते. ते तेथून पळून जातात. त्यानंतर पांचाल, केकया, मत्स्य, छेड्डी, करुश, कोसल द्रोणांवर चहू बाजूने हल्ला करतात. असें किं द्रोण युधिष्ठीराचा पाठलाग करू शकणार नाहीत. द्रोण मात्र त्यांचा इरादा सोडावयाला तयार नव्हते. ते त्या पांडवाच्या दोस्ताचे सैन्य मारू लागतात. सतनिक, विराटांचा धाकटा भाऊ द्रोणांवर चाल करून जातो. सतनिक द्रोणांना

जखमी करतो व त्याबरोबर त्यांच्या सारथ्यांना व घोड्याना सुद्धा जखमी करत असतो. मोठ्याने गर्जना करत तो त्याचा मारा करत असतो. खुनशीपणे तो द्रोणांवर वार करत असतो. ते ब्राह्मण आहेत त्याची तो पर्वा करत नाही. द्रोण सतनिकाचे मुंडके उडवतात. त्यामुळें मत्स्य सैन्य पळून जाते. त्यानंतर द्रोण करुष, छेड्डी, कैकेया, पांचाल, श्रींजय अशांच्या फौजा हरवत जात असतात, युधिष्ठीराच्या जवळ. द्रोणांच्या धनुष्याच्या आवाजाने सगळे आसमंत दणाणून गेले होते. त्यामुळे कित्येत हत्ती, घोडे व सैनिक द्रोणांनी मारलेले होते. त्यांच्या उग्र वागण्याने पांडवांच्या सैन्यात एकच घबराट पसरली होती. विष्णूने दैत्यांचा संहार केला होता त्याची आठवण आकाशात असलेल्या देवांना व ऋषींना येत होती. त्या संहारामुळे त्या रणभूमीत रक्ताचे पाट वहात होते. मुडद्यांच्या राशू तेते झाल्या होत्या त्यातून चालणे अवघड झाले होते. रथ चालवणे अशक्य झाले होते. मृतांचे अवयव जिकडे तिकडे पडलेले दिसत होते. त्यात कित्येक मुंडकी पडलेली होती. मृत योद्ध्यांची शस्त्रं सगळीकडे पडलेली दिसत होती. त्या संहारामुळें कित्येक क्षत्रिय घराणी संपली होती त्याची गणना नव्हता. भर दिवसा त्या रणभूमीत राक्षस वावरू लागले होते ते मेलेल्यांचे मांस खाण्यासाठी आले होते. त्यांच्या बरोबर कुत्री, लांडगे, कोल्हे सुद्धा फिरत होती. त्यानंतर कुंतीची मुलं द्रोणांना चहू बाजूनी घेरतात. ते पाहून तुमच्या बाजूचे राजे द्रोणांना संरक्षण देण्यासाठी पुढे सरसावतात. शिखंडी द्रोणांना बाण मारतो. क्षात्रधर्मन सुद्धा द्रोणांना बाण मारतो. वासुदेव पांच मारतो व उत्तमौज तीन बाण मारतो. क्षात्रदेव पांच मारतो. सत्यकी शेकडो बाण द्रोणांवर फेकत असतो. त्याच प्रमाणे युधमन्यू आठ मारतो. युधिष्ठीर सुद्धा द्रोणांवर हल्ला करतो, धडष्टद्युम्न आठ बाण मारतो. चेकितन तीन, ते झाल्यावर द्रोण चिडलेल्या हत्तीप्रमाणे पांडवांच्या गटावर हल्ला करतात. धृढसेनाला त्याच्या रथासकट फेकून देतात. त्यानंतर ते क्षमावर नऊ बाण मारतात. त्यामुळे तो राजा मरतो. त्याच्या रथातून खाली पडतो. त्यानंतर द्रोण स्वताभोवती गोल फिरत सर्व दिशांना बाण मारू लागतात. त्यांमुळे पांडवांच्या बरोबर कौरवांचे सुद्धा क्षत्रिय मारले जात असतात. त्यानंतर ते शिखंडीवर वार करतात. उत्तमौज, वासुदेव ह्यांना ते यमाकडे धाडतात. सुदक्षिण, क्षेमवर्मन, क्षेत्रदेव ह्यांना जखमी करतात. युधमन्यू, सत्यकी ह्यांना बाणांने मारत तो द्रोणाचार्य आता युधिष्ठीरांच्या रथाजवळ जाऊ लागतो. ते पाहून युधिष्ठीर तेथून पोबारा करतो. द्रोण त्याला जाऊ देतात असे वाटते, म्हणजे अरे राजा धृतराष्ट्रा, द्रोणांना युधिष्ठीराला मनापासून पकडण्याची इच्छा नव्हती असे ते पाहून दिसून येते. त्याचवेळी पांचाल द्रोणांवर जोराचा मारा करू लागतात. द्रोण त्या पांचाल पुत्राला ठार मारतात. ते पाहून पांचाल गोटातून मोठ्यांने आक्रोश ऐकू येऊ लागतो. "त्या ब्राह्मणाला ठार मारू, द्रोणाला ठार मारले पाहिजे", असे ते लोक त्वेषाने ओरडत असतात. ते ऐकल्यावर द्रोण पांचालांच्या सैन्यवर हल्ला करतात. मत्स्य, कैकया, श्रींजय असे सगळे द्रोणांवर तुटून पडतात. कौरव फौजांच्या मदतीने द्रोण सत्यकीच्या

पलटणी मारून टाकतात. त्यामध्ये चेकीतनाचा मुलगा, सेनाविंदू, सुवर्चा आणि इतर अनेक राजे सामील असतात. पांडवांचे मोठे नुकसान झाले होते. तुमचे सैन्य त्या दिवशी जोरदार होते. विजय त्यांच्या हातात आला होता. पांडव पळून जात होते ठिकठिकाणाहून. त्याच प्रमाणे कैकेया, मत्स्य पांचाल सुद्धा हरत असल्याचे दिसत होते.

संसप्तक बंध पर्व भाग एकविसावा संपला.

# संसप्तक बंध पर्व

## भाग बाविसावा

धृतराष्ट्र बोलतात, "जेव्हां पांडवांचे सैन्य द्रोणाचार्याच्या मारामुळे तुटले होते तेव्हां पांडवांपैकी कोणी त्याला द्वंद्वात आव्हान देण्यासाठी गेले होते कां? कोणी कां त्याला सामोरी गेले नाही? तसा हिम्मतवान कोणीच क्षत्रिय त्यांच्यात नव्हता कां"? मला सांग संजया. त्याला थांबवण्यासाठी कोण पुढे आले ते मला सांग.

संजय सांगतो, छेड्डी, कालकेया, मत्स्य, पांडव पांचाल असे सगळे द्रोणाचार्यांच्या मारामुळे खजील झाले होते. तेव्हां कौरव आनंदाने ओरडत होते. ते पांडवांच्या सैन्यावर त्यांच्या हत्तीदल, रथदल, घोडेस्वार व पाईक सैनिकांच्या मदतीने चहोबाजूने हल्ला करण्यास सुरूवात करतात. दुर्योधन ते पाहून त्याच्या फौजेच्या मध्ये सुरक्षित असा राहून मोठा आनंद व्यक्त करत होता. तो कर्णाला बोलतो, "अरे राधासुता पहा पांडवांची कशी दैना द्रोणाचार्य करत आहेत. पांचांलांचे हाल पहा कसे द्रोणांने केले आहेत. सिंहाला पाहून जशी हरणं पळून जातात तसे ते जात आहेत. पहा आपले सैन्य कसे त्यांना घेरत आहे. तो एकटा पडलेला भिम पाहून मला फार आनंद होत आहे. त्याने हे सिद्ध होते कीं, ते पंडुचे पुत्र त्यांची राज्य घेण्याची कल्पना सोडून देतील".

कर्ण त्याला बोलतो, "तो बलाढ्य योद्धा जोवर जीवंत आहे तोवर रणांगण सोडणार नाही. ते पांडव सुद्धा असे हार मानणार नाहीत. जे घडत आहे ते पांडव गुपचुप सहन करतील अशा भ्रमात आपण राहू नये. ते कमालीचे शूर आहेत. त्यांच्याकडे उत्तोत्तम शस्त्रं आहेत. तुम्ही जे कांहीं पूर्वी केले आहे त्यांच्याशी, त्याची आठवण जोवर त्यांना आहे तोवर ते लढत रहाणार आहेत. तो पहा शक्तीमान वृकोदर परत लढण्यासाठी येत आहे. कुंतीची मुलं आपले मोठे योद्धे ठार मारल्याशिवाय गप्प बसणार नाहीत हे ध्यानात असू द्या. तो भिम त्याच्या लोखंडी गदेने आपले कित्येक योद्धे सहजपणे मारू शकतो. ते पहा सत्यजिताचे वीर, पांचालांचे वीर, केकया, मत्स्य असे सगळे पुन्हा परतत आहेत वृकोदरा पाठून. ते सगळे फार मोठे शूर योद्धे आहेत. त्यांचे नेतृत्व भिमाकडे आहे. ते पहा भिम द्रोणाला घेरण्यासाठी व्युह रचत आहे. त्यांच्या मध्ये द्रोण आता असुरक्षित आहेत. त्यांच्याकडे असलेल्या आयुधांनी ते द्रोणाला सहजपणे पकडू शकतात. आता जे कांहीं करावयाचे अश्वत्थामा करेल तर द्रोण वाचतील. चला आपण द्रोण जेथे आहेत तेथे सगळे जाऊ नाहीतर तो व्रतस्थ जीवन जगणारा ब्राह्मण त्यांच्या हाती मारला जाईल".

संजय पुढे सांगतो, कर्णाचे ते बोलणे ऐकून दुर्योधन सावध होतो. ते सगळे कौरव बंधू द्रोण जेथे होते तेथे जाऊ लागतात. पांडवांचे सैन्य मोठा आवाज करत तेथे जात असते. ते पुन्हा

लढण्याच्या तयारीने जात आहेत असे दिसते. त्या सगळ्यांची एकच इच्छा कीं, द्रोणाला मारावयाचे, एकटा गाठून.

संसप्तक बध पर्व भाग बाविसावा संपला.

## संसप्तक बंध पर्व

## भाग तेविसावा

धृतराष्ट्र पुढे बोलतात, मला सांग संजया, भिमाच्या नेतृत्वाखाली जाणाऱ्यांची माहीती, त्यांचे कपडे, कोणती शस्त्र ते घेतात, किती घोडे, किती हत्ती असें सगळे सांग.

संजय सांगू लागतो, वृकोदर त्याच्या रथाने द्रोणांकडे जात असतो व त्याच्या मागून सिनिचा नातू सत्यकी असतो. त्यांच्या बरोबर युधमन्यू द्रोणावर चाल करण्यासाठी जात असतो. धृष्टद्युम्न सुद्धा तेथेच जात असतो. त्या सगळयांचे घोडे मोठे रुबाबदार असतात. स्वताच्या पित्याला मदत करण्याच्या उद्देशाने त्याचा मुलगा क्षात्रधर्मन लाल रंगाच्या घोड्यावरून जात होता. क्षात्रदेव शिखंडीचा मुलगा हिरव्या रंगाच्या घोड्यावर होता. ते सगळे द्रोणांना पकडण्यासाठी जात असतात. नकूल त्यांत सामील होतो. उत्तमौजसुद्धा त्यात होता. ते त्यांचे धनुष्य द्रोणावर नेम धरून जात असतात. सहदेव त्यांच्यात येऊन मिळतो. त्याच्या घोड्याचा रंग पिवळा असतो. युधिष्ठीर काळया रंगाच्या घोड्यावर स्वार झाले होते. बरेच योद्धे त्यांच्या बरोबर त्यांना संरक्षण देण्यासाठी चालत होते. युधिष्ठीरा बरोबर द्रुपद राजा होता. ते त्यांच्या रथात होते व त्यांच्या डोक्यावर छत्री होती. त्यांच्या बरोबर त्यांचे सैनिक होते. त्यात अनेक धनुर्धारी होते त्यात विशेष म्हणजे सौताही होता. त्यांच्या मागून विराट राजा त्याच्या सैन्यानिशी जात होता. त्या सगळयांचा मोठा आवाज होत होता. कैकेया, धृष्टकेतू त्यांच्या पलटणी बरोबर मत्स्य राजा विराटाच्या सैन्यासह जात होते. सगळे बारा हजार सैन्य होते. त्यातील सहा हजार शिखंडीबरोबर होते. त्यामध्ये शिशुपालाचा मुलगासुद्धा होता. छेड्डीचा राजपुत्र धृष्टकेतू कंबोजी घोड्यावर होता. कैकेया राजपुत्र सिंधी घोडे वापरत होते. सेनाविंदू त्याच्या शांतपणे चालणाऱ्या घोड्यांवर होता. युधिष्ठीराचा मुलगा प्रतिविंध्य पांढर्या रंगाच्या घोड्यावर होता. सुतसोमसुद्धा तशाच शुभ्र रंगाच्या घोड्यावर होता. तो अर्जुनाचा मुलगा होता. त्याचा जन्म चंद्राच्या कृपेमुळें कुरु राज्यात उदयेंदू नगरात झाला होता. तो सोमकांचा प्रमुख होता. श्रृतकर्मन भिमाचा द्रौपदीला झालेला मुलगा त्यांत होता. त्या सगळया मुलांचा उल्लेख द्रौपदीची मुलं असा होत होता. श्रृतकिर्ती मोठा विद्वान होता. त्यांच्या मध्ये अभिमन्यू सुद्धा होता. धृतराष्ट्राचा एकच मुलगा पांडवांच्या बाजूने लढत होता तो युयुत्सू त्यांच्यामध्ये होता. वर्धक्षेमी गवताच्या रंगाच्या घोड्यावर होता. श्रेनिमत त्याच्या सोन्याचे चिलखत घातलेल्या घोड्यावर होता. सत्यधृती जो सगळी शस्त्रविद्या शिकलेला होता व वेदांचा ज्ञानी होता तो सुद्धा त्यांच्यामध्ये होता. त्यांच्या मध्ये द्रोणांचा वध करण्याचे कार्य असलेला व सेनेचा सरसेनापती असलेला धृष्टद्युम्न होता. त्यांच्यामध्ये सौचित्ती, वसुदन,

विभू जो काशिसचा राजा होता, त्यांच्या सोन्यानी मढवलेल्या घोड्यावर होता. त्यांचा रुबाब असा होता कीं, ते वैश्रावण वाटत होते. कंबोजचा प्रभाद्रक त्याच्या सहा हजार सैनिकांसह होता. असें बरेच योद्धे त्यात सामील होते. पांचाल पुत्र सिंगसेना, गोपतीचा मुलगा होता. त्याला कांहीं जनमेजय म्हणून सुद्धा ओळखतात. दंडधर गवताच्या रंगाच्या रुबाबदार घोड्यावर होता. व्याघ्रदत्त काळया रंगाच्या घोड्यावर होता. सुधवन आणखीन एक पांचाल राजपुत्र काळे ठिपके असलेल्या उमद्या घोड्यावर होता. कोसलचा राजपुत्र सुक्षेत्र सोनेरी रंगाच्या घोड्यावर होता. समुद्रसेनाचा मुलगा चंद्रसेन फार मोठ्या आकाराच्या घोड्यावर होता जे समुद्र किनारी सापडतात. सैव कमळाचा रंग असलेल्या घोड्यावर होता. राधासेन शुभ्र रंगाच्या घोड्यावर होता. लाल रंगाच्या घोड्यावर चित्रयुध होता. राजा निल त्यांत होता त्याच्या शस्त्रानिशी. त्यांमध्ये दंडकेतू सुद्धा होता. महाबली सारंगध्वज पांड्यचा राजा द्रोणावर चाल करण्यासाठी त्यांच्या सामील झाला होता. त्याची कथा अशी सांगतात की, त्याच्या पित्याचा वध कृष्णाने केला होता म्हणून तो कृष्णाचा वैरी झाला होता. त्यानंतर तो भिष्म, कृप, भार्गव व द्रोणांकडून शस्त्रविद्या संपादन करून तो कर्ण, रुक्मी, अर्जुन ह्यांच्या तोडीचा झाला होता. तो द्वारका नष्ट करण्याचे ठरवतो परंतु, कांहीं सूज्ञ त्याला चांगला सल्ला देता व तो सूड न घेण्याचे ठरवतो. असा बलाढ्य राजा सारंगध्वज होता. तो आता पांडवांसाठी लढत होता. घटोत्कच एका रंगीबेरंगी घोड्यावर स्वार झाला होता. राजा वृहंत त्याच्या रथात होता. तो युधिष्ठारावरील प्रेमाखातर पांडवांना मिळाला होता.

असे ते सगळे त्यांच्या विविध रंगी घोड्यांवरून व रथातून युधिष्ठीराच्या साठी लढण्यास आले होते. त्यांचे झेंडे त्यांच्या बरोबर होते. त्यावरून कोण कोण ते समजत होते. त्यांचे नेतृत्व भिमसेन करत होता. द्रोण मात्र त्या सगळयाच्या पेक्षा श्रेष्ठ वाटत होते. भिमसेनाचा ध्वज भलामोठा सिंह दाखवत होता ज्याचे डोळे पाचुचे होते. युधिष्ठीराच्या ध्वजावर सोनेरी चंद्रमा दाखवला होता ज्याच्या भोवती तारका होत्या. ध्वजस्तंभाला दोन ढोलकी होती यंत्राच्या मदतीने वाजणारी. त्यातून सुमधूर नाद ऐकू येत होते. त्या ढोलक्यांना नंद व उपनंद अशी नांव दिली होती. नकूलाचा ध्वजस्तंभ उंच होता त्याचे स्वरुप घाबरवणारे होते. घाबरवणारे अशा साठी कीं, त्यावर शरभाचे चित्र होते. [*शरभ नांवाचा प्राणी त्या काळात होता, ज्याला सहा पाय होते व तो सिंहाची शिकार करत असें त्याला शौर्याचे प्रतिक मानले जात असें*]

सहदेवाच्या झेंड्यावर हंस पक्षी दाखवले होते. द्रौपदीच्या मुलांच्या ध्वजावर क्रमांने यम, मरुत, शक्र, दोन आश्विनी कुमार दाखवलेले होते. अभिमन्यूच्या ध्वजावर मोराचे चित्र होते. तो

सोन्याचा होता. घटोत्कचाच्या ध्वजावर गिधाड दाखवले होते. त्याचे घोडेसुद्धा मायावी असल्याने कोठेही जाऊ शकत होते. युधिष्ठीराच्या हातात महेंद्र नांवाचे धनुष्य होते. भिमाकडे वायव्य (वायूदेवाचे) होते. घटोत्कचाच्या हातात पौलसत्य नांवाचे धनुष्य होते. द्रौपदीच्या मुलांच्या हातात क्रमाने रुद्र, अग्नेय, कौवर्य, यम्य आणि गिरीश होते. रुद्र बलदेवांचे होते. ते त्याने अभिमन्यूला भेट दिले होते. त्याशिवाय इतर अनेक पहाण्या सारखे ध्वज तेथे दिसत होते. द्रोणाच्या सैन्यात कोणीही भित्रा नव्हता, त्यांचे झेंडे उंच उंच फडकत होते त्यांनी आकाश भरलेले होते.

राजा द्रुपद द्रोणाकडे जाऊ लागतो. त्या दोघा वृद्ध योद्ध्यांचे द्वंद्व मोठे बहारदार झाले. अवंतीचे विंद आणि अनुविंद विराटावर जातात. त्या मत्स्य व केकया मधील लढाईत हत्ती घोडे व पाईक सगळे लढत होते. भूतकर्मन ज्याला सभापती सुद्धा म्हणतात तो द्रोणांना संरक्षण देण्यासाठी नकूलाच्या मुलाला अडवत असतो. परंतु, सतनिकाने मारलेल्या मोठ्या बाणाने सभापतीचे शीर तुटून पडते. विविंसती सुतसोमाला अडवतो. सुतसोम रागांने त्याच्या चुलत काकाला जखमी करतो. भिमरथ दुर्योधनाचा भाऊ सल्वाला व त्याच्या घोड्यांना बाद करतो. चित्रसेनाचा मुलगा श्रृतकर्मनला व दुसऱ्या तुझ्या पांडवांकडील नातवंडाना अडवत असतो. ते दोघे त्यांच्या वरिष्ठांना जे साध्य करावयाचे ते मिळवून देण्यासाठी लढत असतात. प्रतिविंध्यला अश्वत्थामा पहातो कीं तो त्याच्या पित्याकडे जात आहे, तेव्हां तो त्याला आव्हान देतो. प्रतिविंध्य रागाने अश्वत्थामाला जखमी करतो. त्यानंतर तो द्रोणाचार्यांच्या मुलावर बाणांचा भडिमारा करत असतो. दुःशासनाचा मुलगा श्रृतकिर्तीला अडवतो, कारण तो द्रोणांकडे जात होता. श्रृतकिर्ती तो हल्ला परतवतो व त्यात तो दुःशासनाच्या मुलाच्या रथाला मोडतो नंतर तो द्रोणांकडे जात रहातो. दुर्योधनाचा मुलगा लक्ष्मण त्याला अडवतो. परंतु, त्याचा कांही उपयोग होत नाही. लक्ष्मणाच्या शस्त्रांची तो मोडतोड करतो. विकर्ण शिखंडीला अडवतो. शिखंडी विकर्णाला बाणांने असे घेरतो की, तो घाबरून जातो. अंगद उत्तमौजास अडवतो. त्यांचे द्वंद्व भीषण होते. तुमचा दुर्मुख पुरुजिताला अडवतो कारण तोसुद्धा द्रोणांकडे जात होता. कर्ण पांच केकया बंधूंना अडवतो. ते पांच भाऊ कर्णाला घेरतात. तुमचा मुलगा दुर्जय, जय, विजय राजा निलाला अडवतात. त्यांचे युद्ध पहाणाऱ्यांना आनंद देणारे होते. क्षेमधृती व वृहंत सत्यकीला अडकवतात. ते युद्ध पहाण्यासारखे होते. छेड्डीचा राजा रागांने अनेक योद्ध्याना मारतो जे त्याच्या वाटेत येतात. राजा अम्वस्थ सुद्धा त्याच्या विरोधकांना बाणाने जखमी करत असतो. कृप वर्धक्षेमीला अडवतो. सोमदत्ताचा मुलगा द्रोणांना वाचवण्यासाठी मनीमतला अडवतो. मनीमत त्याचे सर्वस्व काढून घेतो. ते झाल्यावर सोमदत्ताचा मुलगा त्याच्या निकामी झालेल्या रथातून उडी मारून खाली

उतरतो व मनीमताचे रथाचे घोडे, सारथी ह्यांच्यावर तलवारीचे वार करतो व त्यांना घायाळ करतो. ते केल्यावर तो पुन्हा त्याच्या रथात चढतो व स्वतः रथ चालवत निघतो. तो नंतर पांडवांचे सैन्य कापू लागतो. जे हातात येईल त्याने तेथे लढाई होत होती. नियम राहिले नव्हते. घटोत्कच त्याच्या विरोधकांचा चुराडा करत तेथे आला. त्याला द्रोणांना पकडावयाचे होते. त्याला पाहिल्यावर तुझ्या बाजूचा राक्षस अलमवुष त्याला अडवतो. त्यांचे द्वंद्वं फारच भयानक होते. त्यात मायावी व दैवी आयुधांचा वापर झाला होता. त्याशिवाय तुझ्या आणि पांडवांच्या मधील असंख्य योद्ध्यात द्रोणांना वाचवण्यासाठी द्वंद्व होत होती त्यातील कांही फारच भीषण होती.

संसप्तक बध पर्व भाग तेविसावा संपला.

# संसप्तक बंध पर्व

## भाग चोविसावा

धृतराष्ट्र बोलतात, "मला सांग संजया, पांडवांची व माझ्या फौजेची लढाई कशी होत होती व अर्जुन संसप्तकांना कसा तोंड देत होता.

संजय सांगतो, जसे ती दोन सैन्ये एकमेकांत गुंतली होती त्यावेळी तुझा मुलगा दुर्योधन भिमावर त्याच्या हत्तीदलाने चाल करतो. भिम त्या हत्तीदलावर त्वेषाने हल्ला करतो. डोंगरासारखे प्रचंड दिसणारे ते तुझ्या सैन्याचे हत्ती भिमाच्या हल्ल्याने बावचळतात. सगळीकडे एकच गोंधळ होतो. त्या हत्तींच्या पायाखाली दोनही बाजूचे सैनिक मारले जात होते. भिमाच्या मोठ्या व लोखंडी बाणामुळे जखमी झालेले ते हत्ती रक्ताने माखलेले होते. दुर्योधन त्यानंतर नेम धरून भिमावर बाण मारतो. भिम त्याच्या बाणांने दुर्योधनाचे बाण मोडून टाकतो. दुर्योधन अडचणीत सापडला आहे ते पाहून अंगचा राजा त्याच्या मदतीसाठी तेथे जातो. ते पाहून भिम त्याच्या भल्यामोठ्या हत्तीला बाण मारून जखमी करतो. त्या माराने तो अंगचा हत्ती मरून खाली पडतो. त्यावर बसलेला म्लेच्छ राजासुद्धा खाली पडतो. भिम त्याचे डोके छाटून टाकतो. हत्तींच्या धुमाकूळाने सगळे रणांगण घुसळून निघते. सगळे पाईक सैरावैरा धावत असतात त्यांचा जीव वाचवण्यासाठी. तो भागादत्ताचा हत्ती भिमावर चालून जातो. वृकोदराचा रथ तो फेकून देतो. भिम त्या हत्तीच्या पोटाखाली जातो व त्याला जोरा जोरांने गुद्दे मारू लागतो. भिमाला अंजलिकबेध विद्या चांगली माहीत असते. त्याप्रमाणे तो करत असतो. त्यानंतर भिम त्याच्या पोटा खालून बाहेर येतो. आणि त्या हत्तीच्या, सुप्रतिकाच्या समोर उभा होतो. सुप्रतिक भिमाला सोंडेने उचलतो व उंच करून मग खाला आपटतो. तरी भिम त्याची सोंड सोडत नाही व नंतरती पिळून त्या पकडीतून स्वताची सुटका करतो. तेवढ्यात पांडवांचा एक डोंगरासारखा प्रचंड हत्ती सुप्रतिकाला आव्हान देतो. भिम त्या दोघांच्या पासून दूर पळून जातो. त्याच्या एकत्र येण्याने फार मोठी आवाज होतो व लोकांचा असा समज होतो कीं, भिम मेला आहे. सगळे हळ हळ व्यक्त करू लागतात. परंतु, पांडव कधीच मरत नाहीत हे माहित असलेले तेथे दुर्लक्ष करतात. तरी युधिष्ठीर भागादत्तावर त्याच्या सैनिकांना मारा करण्याचे आदेश देतो. पांडवांचे सैनिक घाबरून पळून जातात पण भिम मात्र तेथे लपून योग्य संधीची वाट पहात असतो. युधिष्ठीर त्याच्या भलभक्कम सैन्यानिशी भागादत्तला धरतो. परंतु, भागादत्त त्याच्या आयुधानी ते प्रयत्न हाणून पाडतो. ते होत असतांना दसर्नचा राजा भागादत्तावर चाल करतो. त्याचे हत्ती सुप्रतिकाला अडवू शकतात. प्राचीन काळी झालेल्या उडणाऱ्या पर्वतांच्या युद्धा सारखे ते विलक्षण युद्ध होते. भागादत्त

दसर्नाच्या हत्तीवर बसलेल्या योद्ध्याला भाल्याने डिवचण्याचा प्रयत्न करत असतो. भागादत्ताच्या हत्तीला युधिष्ठीराची सेना वेढा घालते. भागादत्त त्यामुळे अजिबात घाबरत नाही. भागादत्त सुप्रतिकाला पराणीने टोचून इशारा करतो कीं तो युधिष्ठीराकडे जावे. त्यावेळी सुप्रतिक सत्यकीच्या मागे होता. तो सत्यकीला उचलून लांब फेकतो. त्यातून तो सुदैवाने वाचतो. सुप्रतिक परत फिरतो व वाटेत येणारे राजे उचलून फेकू लागतो. जसे ऐरावत दानवांना फेकत होता. त्यामुळें पांचाल सगळीकडे पळू लागले. त्यांचा मोठा गदारोळ झाला होता. ते भिम पहात होता. त्याचा राग अनावर झाला होता. भिमाला पाहून सुप्रतिक त्याच्या अंगावर त्याच्या सोंडीने जोराचा पाण्याचा झोत फेकतो. त्यावेळी अर्जुनाचा मुलगा रुचीपर्वन येतो. तो भागादत्तावर चाल करतो. भागादत्त एका बाणांने रुचीपर्वनाला घायाळ करतो. ते पाहून अभिमन्यू, द्रौपदीची मुलं, चेकितन आणि धृष्टकेतू असे युयुत्सू बरोबर सुप्रतिकाच्या मागे लागतात. त्याना तो हत्ती मारावयाचा असतो. भागादत्त त्याच्या पराणीने सुप्रतिकाला युयुत्सूकडे वळवतो. युयुत्सूचा रथ तो उलटवतो. त्यावेळी दुर्योधन अभिमन्यूकडे जातो. अभिमन्यू त्याला बाणांने जखमी करतो. त्याशिवाय पांडवांची मुलं तुझ्या मुलाला बऱ्याच जागी जखमा करतात. अंगाला अनेक बाण रुतले आहेत असा ते सुप्रतिक ते बाण घेऊन रणांगणात गोल गोल फिरत होता. वाटेत येईल त्याला उडवत होता. पांडवांच्या फौजांची वाट लागली होती. त्या हत्ती पासून दूर पळणाऱ्या फौजांचा मोठा आवाज होत होता. सैनिक किंचाळत होते. भागादत्त जिंकल्याच्या अविर्भावात त्या रणांगणात रुबाबात फिरत होता. त्या रणधुमाळीमुळें आसमंत धुळीने भरले होते. जणूकाय अनेक हत्ती लढत आहेत असें वाटावे.

संसप्तक बंध पर्व भाग चोविसावा संपला.

## संसप्तक बंध पर्व

## भाग पंचविसावा

संजय पुढे सांगतो, आपण मला अर्जुनाची काय कमाल तेथे होत होती संसप्तकांच्या युद्धात ते विचारत होता तर ऐका ते आता सांगतो. अर्जुनाला दुरवरून भागादत्ताच्या धुमाळीमुळे उडणारी धूळ दिसते व आक्रोश ऐकू येतात. तसे तो संसप्तकांचा समाचार घेऊन युधिष्ठीराकडे येण्यास निघतो. तो कृष्णाला बोलतो, "अहो माधवा, मला वाटते प्रागज्योतिषचा भागादत्त तेथे कांहीं धमाल करत आहे. तो आवाज व ती आकाशात उडणारी धूळ कांहीं सांगत आहे. तो हत्तीवरून लढणारा एकमेव योद्धा आता आहे. त्याचा हत्तीसुद्धा तसांच आहे. त्याला जर वेळीच आवरले नाही तर तो पांडवांची वाट लावू शकतो. म्हणून आपण त्वरेने तेथे गेले पाहिजे. आपल्या दोघांशिवाय त्याला आवरणारा कोणी नाही. त्याचा उद्धटपणा पाहता त्याला आजच यमाकडे धाडले पाहिजे". ते ऐकल्यावर कृष्ण त्यांचा रथ भागादत्ताकडे नेऊ लागतो. त्याच वेळी संसप्तकाचे चौदा हजार सैन्य ज्यात गोपाल व नारायण होते, जे वासुदेवाला संरक्षण देत होते ते संसप्तकांच्या करता युद्ध करण्यास पुढे होतात. [हे ते सैन्य जे कृष्णाने दुर्योधनाला युद्धात मदत म्हणून दिले होते जेव्हां दुर्योधन त्याच्याकडे मत मागण्यासाठी गेला होता]

आता अर्जुन द्विधा मनस्थितीत जातो. त्याला काय करावे ते समजत नाही. त्यातील कोणते जास्त महत्वाचे आहे ते तो ठरवत असतो. त्याचे एक मन सांगते कीं, संसप्तकांचा नाश महत्वाचा आहे. तो ठरवतो कीं, संसप्तक मारणे जास्त श्रेयस्कर आहे. तेंच कर्ण व दुर्योधन अपेक्षित असतात. त्यांचा डाव यशस्वी होणार असें त्यांना वाटत होते. तो ठरवतो कीं प्रथम हे संसप्तक मारू मग भागादत्ताचा समाचार घेऊ. संसप्तकांच्या बाणांच्या वर्षावामुळें कोणी दिसत नव्हते. कृष्णाच्या अंगाला घाम फुटतो. ते पाहून अर्जुन ब्रह्मास्त्र वापरतो व एका क्षणात सगळे योद्धे मारून टाकतो. मोठा संहार होतो. त्यात माणसां बरोबर हत्ती, घोडे सुद्धा मारले जातात. मेलेल्या लोकांची मुंडकी जिकडे तिकडे पडलेली होती. धनंजयाने त्यांचा नाश इतक्या सहजपणे केला होता कीं ते पाहून आकाशातील देव व ऋषी टाळया वाजवत होते. ते पाहून त्यांना नवल वाटत होते. ते हात जोडून पार्थाची स्तुती करत होते. आपण जे हे केले ते शक्राला किंवा यमालासुद्धा जमले नसते. साक्षात महादेव सुद्धा तसे करणार नाहीत. अशारितीने ते संसप्तक मारल्यानंतर अर्जुन भागादत्ताचा समाचार घेण्यासाठी निघण्याची माधवाला विनंती करतो.

संसप्तक बंध पर्व भाग पंचविसावा संपला.

# संसप्तक बंध पर्व

## भाग सव्विसावा

संजय पुढे सांगतो, पार्थाच्या विनंतीनुसार कृष्ण द्रोणाच्या दिशेने त्याचा रथ नेतो. तो आता त्याच्या भावांना मदत करण्यासाठी निघालेला असतो. कारण ते द्रोणामुळें व्यथित झालेले होते. त्याला शुशर्मन दिसतो जो त्याला आव्हान देत असतो. पार्थ माधवाला बोलतो, "अरे माधवा, हा शुशर्मन मला आव्हान देत आहे, मला सांग, मी काय करावे कारण मला संभ्रम झाला आहे. काय योग्य व काय अयोग्य ते समजत नाही". कांहीं न बोलता कृष्ण त्यांचा रथ त्रिगर्ताच्या राजाकडे (शुशर्मन) वळवतो. अर्जुन शुशर्मनाला मारतो. ते त्रिगर्ताचे राजे यमाकडे जातात. त्यानंतर तो कौरवांच्या फौजांवर हल्ला करतो. ते कौरव त्याच्या आयुधामुळें भाजून जातात व कांहींचा कोळसा होतो. अशारितीने तो कुंतीचा मुलगा तुझ्या सैनिकांचा नाश करत भागादत्ताच्या जवळ पोहोचतो. तेथे तो त्याचे गांडीव हातात धरून पांडवांच्या भल्यासाठा व तुझ्या नाशासाठी सज्ज होतो. ह्या क्षत्रियांच्या संहाराची सर्वस्वी जबाबदारी तुमच्या मुलांवर जाते कारण त्याने निष्पाप पांडवांशी कपट केले व त्यांना वनवासाला पाठवले.

बागादत्त ते अर्जुनाचे पहातो व त्याच्या अंगावर चाल करतो सुप्रतिकाच्या वरून. अर्जुनाचा रथ व भागादत्ताचा हत्ती ह्यांत युद्ध होते. ते फार भीषण होते. त्यांची साघन त्यांच्या प्रकारची होती. भागादत्त त्याच्या हत्तीवरून अर्जुनावर बाणांचा वर्षाव करतो. अर्जुन ते सगळे बाण उडवून लावतो असे कीं. ते त्याच्या पर्यंत पोहोचतच नाहीत. भागादत्त आता कृष्णावरसुद्धा बाणांचा मारा करू लागतो. त्यानंतर तो त्याच्या हत्तीला अर्जुनाच्या रथावर चाल करण्याची आज्ञा करतो. तो अजस्त्र हत्ती अंगावर येत आहे ते पाहून कृष्ण त्याचा रथ असा हलवतो कीं हत्ती त्यांच्या डाव्या बाजूला असेल. अर्जुन त्या हत्तीला मारू शकला असता परंतु तो तसे करत नाही कारण ते चांगल्या युद्धनितीत बसत नव्हते. परंतु, तो हत्ती त्या नियमांचे पालन करत नाही व वाटेत येणारे रथ तो उलटवत पुढे आक्रमण करत येतो. ते पाहून अर्जुनाला राग येतो.

संसप्तक बंध पर्व भाग सव्विसावा संपला.

# संसप्तक बंध पर्व

## भाग सत्ताविसावा

धृतराष्ट्र बोलतात, "रागावलेला पार्थ पुढे भागादत्ताचे काय करतो ते मला ऐकावयाचे आहे. त्याच वेळी प्रागज्योतीषचा राजा काय करतो त सुद्धा मला सांग".

संजय पुढे सांगतो, भागादत्त त्याचे बाण दोघांवर मारत असतो. त्यातील कांहीं काळयान लोखंडाचे होते ते तापलेल्या सळीसारखे कृष्णाच्या अंगात जातात व बाहेर पडून जमिनीवर पडतात. ते पाहून पार्थ भागादत्ताचे धनुष्य तोडून टाकतो. भागादत्त अर्जुनावर भाले फेकू लागतो. अर्जुनाच्या प्रतिकारामुळें भागादत्त भानावर येतो. त्याची मस्ती संपते. त्याला घामाच्या धारा लागतात. अर्जुनाच्या मारामुळें सुप्रतिकाचे चिलखत तुटून पडते. तो मोठा हत्ती असुरक्षित होतो. त्या असुरक्षित हत्तीवर अर्जुनाचे धारदार बाण रुतूं लागतात. त्यांने तो हत्ती अस्वस्थ होतो. भागादत्त कृष्णावर एक सोनेरी शर फेकतो परंतु, अर्जुन तो तोडून टाकतो. त्यानंतर अर्जुन त्याला दहा बाण मारतो व जखमी करतो. त्यामुळे तो पहाडी राजा अर्जुनाच्या नांवांने ओरडत त्याच्यावर भाले फेकू लागतो. त्या भाल्याने अर्जुनाचा मुकूट थोडा हलतो. अर्जुन तो नीट करतो व त्या डोंगराल प्रदेशाच्या राजाला उद्देशून बोलतो कीं, माझा मुकूट आता व्यवस्थित आहे. असें बोलून तो हसतो. ते भागादत्ताला रुचत नाही तो आणखीन रागात त्यां दोघांवर आणखीन बाण मारू लागतो. पार्थ त्याचे धनुष्य तोडतो व तक्याचा भातासुद्धा काढून घेतो. भागादत्तावर त्याने केलेल्या हल्ल्याने त्याला फार त्रास होऊ लागतो. भागादत्त मंत्र उच्चारून त्याच्या हातात असलेल्या पराणीचे वैश्नव अस्त्रात रुपांतर करतो व ते अर्जुनावर फेकतो. ते अस्त्र माधव स्वतावर झेतो व अर्जुनासा संरक्षण देतो. त्या अस्त्राचे फुलाच्या हारात रुपांतर होते व ते निष्प्रभ होते. अर्जुनाला ते रुचत नाही, तो त्याच्या मित्राला बोलतो, अरे माधवा, तू फक्त माझा सारथी होणार आहेस, त्या युद्धात लढणार नाहीस. ते ऐकून कृष्ण हसतो. बोलतो, "ऐक पार्था, हा आपल्या दोघातील एक प्राचीन करार आहे त्याचे बद्दल सांगतो, मी चार प्रकारे ह्या विश्वाचे संरक्षण करत असतो. मी जगाचे भले करत असतो, माझा एक अवतार तपस्या करत असतो. दुसरा अवतार वाईटाचे निर्दालन करत असतो, तिसरा अवतार कर्म करत असतो, चौथा अवतार निद्रा करत असतो. असे माझे चार अवतार सदैव कार्यरत असतात. मी जेव्हां निद्रेतून जागृत होतो तेव्हां चांगल्या लोकांना उपकृत करत असतो. एकदा पृथ्वीने माझ्याकडे तिच्या मुलासाठी, नरका साठी वर मागितला. एक पार्था, तो होता कीं, तो नरक वैश्नव आयुधाने युक्त असावा त्यामुळे तो कोणाकडूनही मरणार नाही. ती तिची प्रार्थना ऐकल्यावर त्या प्राचीन काळी ते वैश्नवी आयुध

नरकाला मी दिले. ते देतांना पृथ्वीला मी बोललो कीं, ह्या आयुधामुळे तिचा मुलगा अभेद्य होईल. तो त्या आयुधामुळे त्याचे प्रतिस्पर्धी हरवू शकेल. पृथ्वीचे समाधान झाले. नरक त्यांमुळें अभेद्य झाला. तो त्या ताकदीमुळें सगळयांना सतावू लागला. त्या नरकाकडून भागादत्ताला ते मिळाले आहे. त्या आयुधापुढे इंद्र अथवा रुद्रसुद्धा टिकणार नाहीत. म्हणून मी त्यावेळी हस्तक्षेप केला व तुला वाचवले. माझे वचन मोडले त्यामागे असे कारण आहे. वैश्नवी आयुधामुळे भागादत्त एवढा माजला आहे. परंतु, आता ते बाद झाले आहे. आता त्याला तू सहजपणे आवरू शकशिल. ते बोलत असतांना अर्जुन त्याच्या बाणांनी भागादत्ताला घेरतो. अर्जुन दोन मोठे बाण त्याच्या हत्तीच्या पोटात मारतो. त्यामुळे तो अवाढव्य हत्ती तुटतो. अशी अवस्था होते सुप्रतिकाची कीं, ते त्याच्या मालकाचे ऐकेनासा होतो. भागादत्त आश्र्चर्य करत असतो कीं, असे कसे झाले कीं, तो हत्ती त्याचे ऐकत नाही. तो पायातील ताकद गेल्या सारखा जमिनीवर कोसळतो. तो प्रचंड आकाराचा हत्ती प्राण सोडतो. भागादत्त त्याच्यावरून खाली उतरतो. त्यानंतर अर्जुन एक लांबसर बाण भागादत्ताच्या छातीत मारतो व तो डोंगराळ प्रदेशातील राजा मरतो. त्यानंतर पांडवांच्या सैन्यात नवा हुरूप येतो. तुझे सैन्य भागादत्ताचे मरण पाहून हतबल होतात.

संसप्तक बंध पर्व भाग सत्ताविसावा संपला.

## संसप्तक बंध पर्व

## भाग अठ्ठाविसावा

संजय पुढे सांगतो, भागादत्ताचा वध केल्यानंतर जो इंद्राचा मित्र होता, पार्थ त्याच्या शवाला एक प्रदक्षिणा घालतो. त्यानंतर गांधाराचे दोन मुलगे, विशाक आणि अचल अर्जुनाच्या मागे लागतात. ते दोघे अर्जुनावर दोन बाजूने हल्ला करतात व त्याला बाणांनी बोचत रहातात. अर्जुन त्यानंतर त्यांचे घोडे मारतो. सारथ्याला जखमी करतो. त्यांच्या रथावरील छत्री उडवतो. त्यांचे ध्वजस्तंभ मोडून टाकतो. ते दोघे सुवलाचे पुत्र होते. ते केल्यानंतर अर्जुन गांधारांच्या फौजेवर हल्ला करतो. ज्याचे नेतृत्व शकूनी करत होता. त्यातील पांचशे योद्धे तो यमाकडे पाठवतो. त्यांचे रथ उलटतात कारण त्यांचे घोडे मारले जातात. ते सगळे अर्जुन करत असतो. ते झाले तरी शकूनीची मुलं अर्जुनचा पिच्छा सोडत नाहीत. ते नवीन धनुष्य घेतात व बाण मारत रहातात. ते तुझे आप्त अर्जुनाला असे भिडतात जसे वृत्र आणि वली इंद्राला भिडले होते. त्या युद्धात ते भारी जखमी होतात. ते जास्त झाले म्हणून अर्जुन त्यांना ठार मारतो. त्यांच्या मरण्याने तुझ्या लष्करात भितीचे वातावरण निर्माण होते. शकूनाला समजते कीं, त्याचे देन भाऊ मारले गेले आहेत, त्यामुळे तो चिडतो व भ्रम सिद्धीच्या मदतीने अर्जुन व कृष्ण ह्यांना गोंधळात टाकण्याचा प्रयत्न करतो. त्या भ्रमसिद्धीने तो असे भास निर्माण करतो की, विविध प्रकारची शस्त्रं त्यांच्यावर पडत आहेत. त्यात सोटे, दगड, शत्रूघ्नी, शर, गदा, काटेरी गदा, तलवारी, दांडपट्टे, कुर्हाडी, बाण, भाले असें कित्येक होते. त्याशिवाय गाढवं, उंट, रेडे, वाघ, सिंह, चित्ते, अस्वलं, लांडगे, गिधाडी, मांकडे, आणि विविध प्रकारचे सरपटणारे जीव त्याच्यावर हल्ला करत आहत असे त्याला वाटू लागते.

धनंजय जो दैवी विद्येत पारंगत होता त्यांना त्याच्या मायावी मंत्राने भारलेले बाण मारून पिटावतो. त्यामुळे ते मायावी प्राणी मरून खाली पडतात. त्यानंतर अर्जुनाच्या रथाभोवती अंधार पसरतो. त्या अंधारातून कोणीतरी अर्जुनाला धमकावू लागतो. ते ज्योतिश्क नांवाच्या अस्त्राने अर्जुन उडवून लावतो. तरी भ्रम प्रकार थांबत नाहीत. आता त्याला सगळीकडे पाणीच पाणी झाल्या सारखे वाटू लागते. त्यावर अर्जुन आदित्य नांवाचे अस्त्र सोडतो. त्यामुळे ते मायावी पाणी वाळून जाते. सगळे पूर्ववत होते. शकूनी पुन्हा पुन्हा भ्रम निर्माण करत होता व अर्जुन ते तोडत होता. ते एक वेगळया प्रकारचे युद्ध सगळे आकाशातील ऋषी व देव पहात होते. त्याचे कांही चालत नाही हे समजल्यावर तो गांधारचा राजा पळून जातो. त्यानंतर अर्जुन कौरवांच्या फौजांची कत्तल करू लागतो. त्यामुळें रक्ताचे पाट वाहू लागतात. त्यामुळें तुझ्या गटातील लोकांत एकच

हाःहाःकार माजतो. त्यातील एक रक्ताचा पाट द्रोणांकडे जातो. दुसरा दुर्योधनाकडे जात असतो. अर्जुनाच्या गांडीवाचे टणत्कार ऐकू येत असतात. व त्या बरोबर योद्ध्यांचे मरतांनाचे ओरडणे असे दोनच आवाज आसमंतात घुमत होते. द्रोणाच्या कडील योद्धे युधिष्ठीराचे सैन्य मारत होते. त्या मरणाऱ्यांत माणसांप्रमाणे हत्ती घोडेसुद्धा होते. अर्जुन त्याचे बाण कोणा एकाला मात नव्हता. तरी त्याच्या बाणांच्या मंत्राच्या प्रभावामुळें तेथील योद्धे व प्राणी मरून पडत होते हे विशेष होते. त्यावेळी सूर्य उतरणीला लागला होता. रक्त मांस खाणारे प्राणी रणभूमीत जमू लागले होते. पार्थाच्या बाणांपासून स्वताला वाचवण्यासाठी सगळे योद्धे रणभूमी सोडून पळत होते.

संसप्तक बंध पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

## संसप्तक बंध पर्व

## भाग एकोणतिसावा

धृतराष्ट्र बोलतो, "जेव्हां माझ्या पलटणी उध्वस्त केल्या गेल्या त्यावेळी तू त्या रणभूमीतून पळून गेलास त्यावेळी तुझ्या मनाची स्थिती कशी होती ते मला सांग. मला समजते कीं, त्यावेळी जी तारांबळ तुझी उडाली होती असेल त्यावेळी तू फार घाबरलेला असशील".

सजय सांगतो, तुमे सैन्य हवालदिल झाले होते तरी त्यातील कांही मर्द योद्धे तुझ्या बाजूची राखण करण्यासाठी सरसावले होते. ते द्रोणाबरोबर राहीलेले दिसत होते मला. त्यां लोकांनी मोठी मर्दुमकी तेथे गाजवली होती पांडवांशी लढतांना. त्यामुळें युधिष्ठीर द्रोणाच्या आवाक्यात आला होता. पांडवांतील भिम, सत्यकी व धृष्टद्युम्न ह्या तिघाने ज्या चुका केल्या त्याचा फायदा उठवत कौरवांची सेना युधिष्ठीरा जवळ जात होती. त्यावेळी दोन बाजूचे लोक ओरडत होते, एक बाजू ओरडत होती कीं, "द्रोणाला पकडा, द्रोणाला पकडा", तर दुसरी बाजू ओरडत होती कीं, "द्रोणाला पकडू नका, द्रोणाला पकडू नका". जणू द्रोणाच्या नावांने ते जुगार खेळत होते. धृष्टद्युम्न त्याच्या सैन्याला मदत करण्यासाठी जात असतो ज्या सेनेली द्रोणाचे सैनिक त्रास देत होते. जोरजोरानी ओरडत ते सगळे एकमेकांशी लढत होते. द्रोणांना मारण्यासाठी ते पांडवांचे योद्धे जीवावर उदार झाले होते.

त्या जमान्यातील वृद्धाना आठवत नव्हते की, अशी लढाई त्यांना आधी कधी पाहिली होती. असें ते विलक्षण भीषण युद्ध होते. जीवाची कांहीं किंमत उरलेली नव्हती. पांडवांच्या प्रतिकारामुळे घाबरलेले कौरव जोरा जोराने ओरडत होते व मागे सरकत होते. त्यानंतर द्रोण त्यांच्या बाणांच्या भडिमाराने पांडवांमध्ये पुन्हा एकदा धास्तीचे वातावरण उत्पन्न करतात. त्या वेळी पांडवांचे सरसेनापती धृष्टद्युम्न द्रोणाला अडवतात. त्या दोघांतील द्वंद्व पहाण्यासारखे होते. ते अतुलनीय होते. त्यानंतर राजा निल कौरवांच्या सेनेचा नाश करू लागतो. द्रोणांचा मुलगा अश्र्वत्थामा ज्याला निलाबरोबर द्वंद्व करण्याची इच्छा होती तो पुढे होतो. तो निलाला बोलतो, "अहो निल राजे, ह्या सामान्य शिपायांना मारून तुम्हाला काय मिळणार? माझ्याशी दोन हात करा". ते ऐकल्यावर क्षणार्धात निल अश्र्वत्थामाला जखमी करतो. त्याबरोबर वेळ न दवडता अश्र्वत्थामा निलाचे धनुष्य मोडून टाकतो. त्याची छत्रीसुद्धा उडवून देतो. त्या बरोबर निल त्याच्या रथातून उडी मारून उतरतो व हातात ढाल व तलवार घेऊन अश्र्वत्थामाचे मुंडके उडवण्याची तयारी करतो. ते होण्या आधी अश्र्वत्थामा निलाचेमुंडके त्याच्या बाणाने उडवतो. ते जमिनीवर पाडते. निलाच्या मृत्यूमुळें पांडवांत हळ हळ होते. त्यांचा एक सलामीचा योद्धा कामी

आलेला होता. तसे होत गेले तर एकटा अर्जुन आम्हाला कसे वाचवणार, असे प्रश्न ते विचारू लागले. अर्जुन अजून संसप्तकात अडकला आहे कां? असे ते विचारत होते.

संसप्तक बंध पर्व भाग एकोणतीसावा संपला.

## संसप्तक बंध पर्व (संपले)

## भाग तिसावा

संजय पुढे सांगतो, वृकोदर ते सहन करू शकला नाही. तो वल्हीकांवर हल्ला करतो. त्याशिवाय कर्मावर प्रत्येकी साठ आणि दहा बाण मारतो. द्रोण भिमाला मारण्यासाठी पुढे होतात. त्याच्या वर्मी ते घाव घालतात. त्याबरोबर फार वेळ न दवडता कांहीं विषारी बाण ते भिमावर फेकतात. भिम अश्वत्थामावर सात व दुर्योधनावर सहा बाण फेकतो. तो द्रोणालासुद्धा घायाळ करतो. भिम कर्माला दहा बाण मारतो. ते सगळे मृत्यूशी खेळत होते एक लपंडाव असे दिसत होते. कोणालाही मरणाचे भय वाटत नव्हते. युधिष्ठीर भिमाला मदत करण्यासाठी कांही शूर योद्धे धाडतो. त्यात माद्रीची मुल होती. युयुधन त्यांचा मुख्य होता. ते नव्या दमाचे योद्धे द्रोणाची फळी तोडण्याचा निश्चय करतात. द्रोण मात्र त्यांना न घाबरता तोंड देतात. तुमचे योद्धे पांडवांवर तुटून पडतात जीवावर उदार होऊन. त्या झटापटीत पुष्कळ क्षत्रिय मारले जातात. माणसांबरोबर इतर प्राणी सुद्धा नेहमीप्रमाणे ठार मरतात. कित्येकांची डोकी हत्तीच्या पायाखाली चिरडून ते मरतात. त्या वेळी जास्त माणसे हत्तीच्या धांदळीमुळें मारली जातात. कित्येक राजे मृत्यू आनंदाने स्वीकारतात. तेथे आप्त एकमेकांना मारत होते. असें विदारक दृष्य पहावे लागत होते. मोडलेले रथ, फाडलेले झेंडे, मृतांच्या अंगावरील दागिने सगळीकडे पडलेले दिसत होते. "मारा, हाणा, धरा, पकडा, असें ओरडणे ऐकू येत होते.

जमिनीवर रक्त व माती ह्यांचा चिखल झाला होता. त्यात मेलेल्यांचे अवयव रुतलेले दिसत होते. कित्यांकांची गदेने चुरडलेली डोकी पडलेली दिसत होती. ते सगळे दृष्य बघवत नव्हते. ज्यांची शस्त्रं सांडली होती ते हातानेच मारामारी करत होते, एकमेकांच्या झिंज्या खेचत होते. कांहीं युद्ध सोडून पळून जात असलेले दिसत होते तर काहीं त्यांच्या जखमा चोळत पडलेले होते. कांहीं कळा सहन न झाल्याने रडत होते तर कांहीं शांतपणे मृत्यूची वाट पहात त्या रक्त मातीच्या चिखलात निजलेले होते. कोणी पळून जाणाऱ्यांचा पाठलाग करत जाऊन त्याना मारत होते. जखमी हत्ती त्यांच्या जखमामुळे चित्कारत सैरावैरा धावत होते त्यांच्या पायाखाली कित्येक मरत होत. सर्वत्र दुःखाची छटा पसरलेली होती. कोणीही आनंदात दिसत नव्हता. तरी ते लढत होते. त्याच वेळी पांडवांचे योद्धे कौरवांच्या थकलेल्या सैन्यावर हल्ला करतात. त्यांना द्रोणांना सह द्यावचाचा होता. द्रोणांना पकडा असें ते सारखे ओरडत होते. त्या पांडवांच्या योद्ध्यांची गाठ द्रोण,कृप, कर्ण, जयद्रथ, अश्वत्थामा ह्यांच्याशी पडते. त्याशिवाय विंद, अनुविंद, सल्य सुद्धा त्यात होते.

पांडवांच्या योद्ध्यातील कांहीं द्रोणांना ठार न मारण्याच्या विचाराचे होते कारण द्रोण त्यांचे गुरू होते व ते ब्राह्मण सुद्धा होते. परंतु, द्रोणमात्र तसी विचार न करता त्यांच्यावर मारा करत होते.

ते होत असतांना जिश्नु संसप्तकांचा पराभव करून द्रोणांकडे येत होता. ते पांडवांच्या सैन्याला समजते. अर्जुन द्रोण होते त्या रणभूमीत येतो. आल्या बरोबर तो कौरवांच्या फौजांचा नाश करण्यास सुरूवात करतो. त्याच्या मारामुळे हत्तीवरील स्वार खालू पडतात व मरतात. चांगल्या युद्द नितीप्रमाणे ते खाली पडलेले, जखमी व पळून जाणारे अशांना बाण मारत नव्हता. पळून जाणारे कौरवांचे सैन्य कर्णाला संरक्षणासाठी हाका मारत होते. कर्ण त्यांना सांगत असतो, "घाबरू नका. मी अर्जुनाला आवरणार आहे".

कर्ण अग्नेय अस्त्र फेकतो. आता त्या दोघा धनुर्धार्यात द्वंद्व सुरू होते. दोघे एकमेकाला अडवण्याचा प्रयत्न करत असतात. कर्ण जोरा जोराने ओरडत असतो. त्यावेळी धृष्टद्युम्न, सत्यकी, भिम असें सगळे कर्णावर तुटून पडतात. परंतु, कर्ण त्यांना आटपत नाही. ते त्यांचे धनुष्य निकामी करत जातो. त्यांची शस्त्र निकामी झाल्यामुळे ते हतबल होतात. अर्जुन कर्णाचा धाकटा भाऊ शत्रूंजय ह्याला बाण मारून घायाळ करतो. त्यानंतर अर्जुन विपथाला ठार मारतो कर्माच्या समक्ष. भिम त्याच्या रथातू उतरतो व कर्माला मदत करणाऱ्या योद्ध्यांचे प्राण घेतो. पुन्हा तो त्याच्या रथात चढतो व नवीन धनुष्य घेऊन लढू लागतो. धृष्टद्युम्न चर्मवर्मनाला ठार मारतो. वृहत्क्षत्रालासुद्धा मारतो. तो निशाधचा राजा होता. तो पांचाल पुत्र कर्णावर अनेक बाण मारतो. प्रत्येक वेळी तो मोठ्याने ओरडून त्याचा जय व्यक्त करत असतो. दुर्योधन, द्रोण, जयद्रथ, कर्णाला वाचवण्याचा प्रयत्न करत असतात, तुमचे हत्ती कर्णाला मदत करण्यासाठी तेथे पाठवले जातात.

धृष्टद्युम्न, भिम, अभिमन्यू व स्वता अर्जुन, नकूल, सहदेव, सत्यकीला कर्णापासून वाचवण्याचा प्रयत्न करू लागतात. तेथे त्याचवेळी अनेक मांसाहारी पशू मेलेल्यांचे ताजे मांस खात असलेले दिसत होते. मेलेल्यांचे डोळे बाहेर आलेले, जिभा तोंडातून लोंबत असलेल्या, असे ते मृत दिसत होते. जमिनीत बाण रुतलेले दिसत होते त्यात माणसाचे अवयव अडकलेले दिसत होते.

दोनही बाजूचे मार खात होते. त्यावेळी सूर्य क्षितिजाकडे जात होता. त्या दिवशीचे युद्ध संपल्याची रणवाद्ये वाजू लागली. चौदावा दिवस संपला होता.

संसप्तक बंध पर्व भाग तिसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व (सुरू)

## भाग एकतिसावा

संजय पुढे सांगतो, अर्जुनाच्या येण्यामुळे द्रोण त्यांनी दुर्योधनाला दिलेले वचन पूर्ण होत नाही. ज्यात ते युधिष्ठाराला कैदी करून आणण्याचे बोललो होते. आता दिवस संपला होता व युधिष्ठीर सुरक्षित होता. तो एका प्रकारे कौरवांचा व विशेष करून द्रोणांचा पराभव झाला होता असेंच समजले गेले होते. कौरवांचे सैन्य त्यांच्या तळावर जात असतांना ऐकत असतात कृष्ण व अर्जुनाच्या दोस्तीच्या कथा, ते ती रात्र शापितासारखी काढतात. त्यांचा अहंकार पुरता दुखावलेला होते. त्यांना समजत नव्हते पुढे काय करावयाचे. ती रात्र असवस्थ अवस्थेत दुर्योधन काढतो, दुसरा दिवस उगवतो पंधरावा युद्धाचा दिवस असतो. दुर्योधन द्रोणांच्याकडे जातो व त्यांना जरा घुश्शातच बोलतो, जे त्याचे सैन्य सुद्धा ऐकत असते. "अहो ब्राह्मणा, आपण आमची घोर निराशा केली आहे, आपल्या अनुभव व ज्ञान ह्याचा आम्हाला काहींच उपयोग होत नाही हे मान्य करावा लागेल. आपण युधिष्ठीराला अटक करण्याचे आश्वासन दिले होते ते आपम पाळू शकत नाही. आपल्या डोळयासमोरून तो निघून जातो ह्याचा आम्ही काय अर्त समजावयाचा? आपण आपला वर खरा करण्यात असमर्थ झाला अहात, एका ब्राह्मणाला ते शोभते कां"? ते दुर्योधनाचे उद्गार द्रोणाच्या मनाला फार लागतात. एका प्रकारे तो ते त्यांचा अपमान असें समजतात. तो ब्राह्मण त्याला उत्तर देतो, "मी आपल्या भावना समजू शकतो, ह्या तीन जगात जेथे देव, असुर आणि गंधर्व असतात, त्याशिवाय यक्ष व नागसुद्धा असतात, त्यांना अर्जुनाला चीत करणे  केवळ अशक्य असते विशेष करून जेव्हां त्याच्या बरोबर साक्षात नारायण असतात. मी आपल्याला सांगितले होते कीं, अर्जुनाला जर आपण तेथून दूर करू शकलात तर मी युधिष्ठाराला अटक करीन परंतु, तुम्हाला ते जमले नाही ह्यात माझा काय दोष"? ते बोलल्यानंतर द्रोण दुर्योधनाला पुन्हा आश्वासन देतात कीं, आज ते पांडवांच्या कोणा एकातरी प्रमुख योद्ध्याचा वध करतील परंतु, त्यासाठी दुर्योधनाला अर्जुनाला द्रोणांपासून दूर ठेवणे जमले पाहिजे. जर ते जमले नाही तर ते कांहीं करू शकणार नाहीत असें ते निर्वाणीचे तुझ्या मुलाला सुनवतात.

संजय पुढे सांगत असतो, द्रोणांचे ते ऐकल्यावर संसप्तक पुन्हा अर्जुनाला आव्हान देण्याचे ठरते. पुन्हा त्याला त्या लांबच्या दक्षिण टोकाकडे बोलवावयाचे ठरते. अर्जुन ते आव्हान स्वीकारतो व त्याठिकाणी एक भीषण युद्ध होते. जसे आधी कधी झाले नव्हते. ते होत असतांना द्रोण एक व्युह रचतात जो त्यांच्या मते अभेद्य होता. पांडवांच्या सरसेनापतीच्या आज्ञेने अभिमन्यू त्या चक्रव्यूहात जाण्याचे ठरते. अभिमन्यूने त्याआधी अशा बऱ्याच व्युह रचना फोडलेल्या असतात

म्हणून त्याचा आत्मविश्वास बलवान असतो. ह्या चक्रव्युहात तो कौरवांच्या सहा महाबली योद्ध्यांना तोंड देणार असतो. त्या युद्धात तो अर्जुनाचा व सुभद्रेचा मुलगा दुःशासनाच्या मुलाच्या कपट योजनेचा अखेरीस बळी ठरतो. त्याच्या वधाने तुझ्या मुलांत आनंदाचे वातावरण उत्पन्न झालेले होते व पांडवांत दुःख व सूडाची भावना वृद्धींगत होत असते. ते झाल्यावर त्या दिवसाचे युद्ध संपते.

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, "अरे संजया, तो अर्जुनाचा मुलगा लहान होता तरी त्याचा वध का केला गेला? हे ऐकून माझ्या हृदयाचे तुकडे होत आहेत. हे काय होत आहे कुरुवशांत ते मला समजेनासे झाले आहे. क्षत्रियांचे कार्य क्रूरतेने भरलेले असते असें जे म्हणतात ते खरे आहे. सत्तेसाठी लहान मुलांची हत्त्या करणे कोणत्या क्षात्रधर्मात आहे ते मला समजत नाही. मोठ्याने मोठ्यांची हत्त्या करणे मी समजू शकतो पण लहानांना मारणे कधीही मला मान्य नाही. मला सांग अरे गवळगणा, इतक्या योद्ध्यानी त्या लहान मुलाला कसे मारले ते मला सविस्तरपणे सांग. तो पांडव त्या चक्रव्युहात एकटा शिरल्यानंतर काय झाले ते मला ऐकावयाचे आहे. ऐषारामत वाढलेला तो माझा नातू बापाच्या कामात हात घालतो ह्याचे मला विशेष वाटते. त्याचे बेडरपण कौतुकास्पद आहे".

संजय सांगतो, आपण विचारता त्याची माहिती मी आपल्याला देत आहे ती नीटपणे ऐका, मी आपल्याला सांगणार आहे, कसे तो युवक पांडव त्याची शस्त्रं वापरत होता. त्याला विजयाची शाश्वती होती. जसां तो त्या व्युहात घुसतो तुझे योद्धे घाबरून जातात. त्यांना समजत नाही त्याला कसे तोंड द्यावे.

अभिमन्यू वध पर्व भाग एकतिसवा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग बत्तीसावा

संजय पुढे सांगतो, ते पांच पांडव त्यांच्या अभूतपूर्व पराक्रमाने व कृष्णाच्या मदतीने देवांसुद्धा अजिंक्य ठरले होते. त्यांचे गुण, व्रतस्थता, कुलकिर्ती, बुद्धिमत्ता, कर्तृत्व, प्रसिद्धी, समृद्धता अशामुळें ते सदेव अजिंक्य राहिले होते. त्याना युधिष्ठीरासारखा गुणी ज्येष्ठ बंधू लाभला होता. त्यांच्या वासना नियंत्रित होत्या त्यामुळे त्यांना कोणतीही वाईट शक्ती प्रभावित करू शकत नव्हती. त्यामुळे ते सदैव स्वर्गाचेच मानकरी ठरत होते. यम, भार्गव आणि भिमसेन असे तिघे पार्थाच्या बरोबरीचे समजले जात होते. ते त्यांने घेतलेल्या शपथा कधीच तोडत नव्हते. संयम, ब्रह्मचर्य, सौंदर्य, शौर्य, बुद्धीमत्ता आणि दानशूरपणाहे नकुलाचे गुण होते. सहदेवाचे गुण वेदाचा सखोल अभ्यास, वागण्यातील गांभिर्य, सुमधूर वाणी, शांतप्रवृत्ती, धाडस असें होते. ते दोघे साक्षात आश्विनीकुमार होते. ते सगळे उत्तम गुण अभिमन्यूमध्ये होते. कृष्णाचे अनेक गुण सुद्धानत्यात होते. तो भयंकर कृत्य करण्यात भिमाच्या बरोबरीचा होता. जे क्षत्रियांना शोभतात. नितीशास्त्रात तो युधिष्ठीराच्या सारखा जाणकार होता. त्याला उपजत बुद्धीने ते समजत होते. त्याच्या पित्याचे सगळे गुण त्याच्याच तंतोतंतपणे आलेले होते. सुसंस्कृतपणात तो कोणाच्याही पेक्षा कमी नव्हता.

धृतराष्ट्र विचारतो, मला सांग अरे संजया त्या गुणा पांडवांचा वध कसा झाला. मला सविस्तरपणे सांग.

संजय पुढे सांगतो, जरा धीर धरा राजन, मी ते सगळे सांगणार आहे. द्रोणांनी चक्रव्युह तयार केले होते. त्यात संरक्षणासाठी आपल्या बाजूचे सगळे मोठे राजे नेमलेले होते जे एक एक इंद्रासारखे शूर योद्धे होते. त्यान चक्रवुयाहाच्या तोंडावर मोठे पराक्रमी राजे ठेवलेले होते. त्यांच्या अगावर लाल रंगाचे कपडे होते. त्यांच्या अगाला चंदनाचे गंध चोपडलेले होते. युद्ध जिंकण्याच्या तयारीने ते त्यांच्या नियुक्त जागी सज्ज होते. दुर्योधन त्याच्या फौजेच्या मध्ये सुरक्षित असा होता. त्याच्या पुढे द्रोणांची फौज तैनात होती. त्यांच्या बाजूला जयद्रथ होता. त्यांच्या बाजूला अश्वत्थामा होता. त्याच्या संरक्षणात आपले तीस पुत्र सज्ज होते. जयद्रथाच्या दिमतीला गांधार सेना तैनात होती. त्यांचा प्रमुख होता शकूनी. त्याला सल्य व भुरिश्रव मदत करण्यासाठी योजलेले होते.

त्यानंतर रणवाद्ये वाजू लागली व युद्ध सुरू झाले त्या दिवसाचे. त्यांचे लढणे युगांताची आठवण करणारे होते.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग तेहतिसावा

संजय सांगत असतो, त्यानंतर पांडव भिमसेनाच्या नेतृत्वाखाली त्या चक्रव्युहात शिरण्याचे ठरवतात. त्यामध्ये सत्यकी, चेकीतन, धृष्टद्युम्न, कुंतीभोज, द्रुपद, अभिमन्यू, क्षात्रधर्मन आणि वृहतक्षात्र, धृतकेतू, घटोत्कच, युधमन्यू, शिखंडी, उत्तमौज, कौकेया बंधू, श्रींजय, द्रौपदीची पांच मुलं, शिशुपालाचा मुलगा, नकूल आणि सहदेव असे योद्धे त्यांच्या फौजांसह त्या चक्रव्युहात शिरण्याची तयारी करतात. ते अचानकपणे त्यात मुसंडी मारत घुसतात. परंतु, अश्र्वत्थामा तयारीतच होता व तो त्या हल्ल्याला पुरतो, उत्तर देतो. पांडवांना ते मागे ढकलतात. द्रोणांच्या बाणांच्या वर्षावापुढे त्यांचा चालत नाही. तो प्रतिहल्ला असा होता कीं, पांचाल व श्रींजय त्याच्यापुढे टिकाव धरू शकत नाहीत. द्रोणांचा हल्ला परतवण्यासाठी युधिष्ठीर बरेच प्रयत्न करतो पण व्यर्थ. तो अभिमन्यूवर त्याच्या कुवतीपेक्षा जास्त जबाबदारी टाकतो. युधिष्ठीर त्याला सांगतो कीं, "माझ्या मुला, तू अशाप्रकारे लढावयाचे कीं जेव्हां तुझा पिता परत येईल तेव्हां त्याला तुझा अभिमान वाटला पाहिजे. आपल्याला कळत नाही हे चक्र कसे फोडावयाचे. तू किंवा अर्जुन अथवा प्रद्युम्न आणि कृष्ण हे चौघेच ते करू शकतील असे मला वाटते. तू आम्हा सगळ्याना तसे आश्र्वासन दे कीं तू ते चक्र फोडशिल". ते युधिष्ठीराचे ऐकून तो विनम्र पुतण्या त्याला बोलतो, "काळजा करूं नका काका, मी प्रयत्न करतो. मला ते कसे फोडावयाचे ते माझ्या पित्याने शिकवले आहे. त्या ज्ञानाचा आता उपयोग होणार आहे. परंतु, मी आत जरी गेलो तरी त्यातून बाहेर कसे निघावयाचे, मी शिकलेलो नाही". युधिष्ठीर त्याला आत घुसण्याची आज्ञा करतो. तो बोलतो, "आत घुसून तू आमच्यासाठी वाट करून दे. मग आम्ही आत शिरतो. तू जसा जाशिल तसे आम्ही तुझ्या मागून येऊ". भिम त्यावर बोलतो, मी तुझ्या मागून येणार आहे. तेथे असलेले कौरवांचे योद्धे आम्ही मारून टाकणार आहोत. अभिमन्यू बोलतो, "जसा किटक ज्योतीकडे जातो तसा मी त्यात जाणार आहे, माझे काय होईल मला माहीत नाही. जे माझ्या लोकांसाठी योग्य आहे ते मी करणार आहे. त्यात कसलीच कुचराई होणार नाही ह्याबद्दल निशंक असा". आज मी माझ्या समोर येणारे सगळे मारून टाकणार आहे, त्यातून एक जरी निसटला तरी ते मला नामुष्कीचे ठरेल. तसे नाही केले तर मी माझ्या पित्याचा मुलगा बोलणार नाही". असें बोलून तो त्या लोकांना आश्र्वासन देतो. युधिष्ठीर त्याला बोलतो, "तुला ह्या बलाढ्य योद्ध्यांचे संरक्षण आहे, जसे कांहीं, साध्य, रुद्र, मरुत इंद्राला देतात, किंवा वसु, अग्नी अथवा आदित्य असावेत असे तुझ्या पाढी आहेत. तू त्या चक्राकार व्युहाला तोडण्याचे काम कर फक्त, बाकीचे आम्ही पाहून घेऊ. तुझी शक्ती वाढत जाओ". असा तो त्याला दुवा देतो.

संजय पुढे सांगतो, ते बोलणे झाल्यावर अभिमन्यू त्याच्या सारथ्याला सुमित्राला सांगतो कीं, त्यांचा रथ द्रोणाच्या चक्रव्युहाकडे घेऊन जा.

अभिमन्यू वध पर्व भाग तेहतिसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग चौतिसावा

संजय पुढे सांगत असतो, युधिष्ठीराची आज्ञा झाल्यावर अभिमन्यू त्याचा रथ द्रोणांच्या चक्राकार व्युहाकडे नेतो. अभिमन्यू स्वताला बोलत असतो, "अरे मर्दा, पुढे जात रहा, पुढे जात रहा, पांडवांनी तुझ्यावर मोठा बोजा टाकला आहे ते यशस्वी करून दाखव. ही तुझी परीक्षा आहे असे समज, एका क्षत्रियाला तक्रार न करता आपले कर्तव्य करावयाचे असते. गुरू द्रोण त्यांच्या विद्येत हुशार आहेत. त्याचे व्युह फोडले तर माझी सर्वत्र वहाव्वा होणार आहे. त्याचा सारथी सुमित्र त्याला बोलतो, "आपण आरामात वाढला अहात, अशा आव्हानांची आपल्याला सवय नाही. ते ऐकून अभिमन्यू त्याला हसत बोलतो, "अरे सुमित्रा, हा द्रोण कोण आहे रे, ते अफाट क्षत्रियांचे जमाव पाहिलेस कां, त्या सगळयांना मी एकटा पुरून उरेन अशी शक्ती माझ्यात आहे, मला कमी समजू नकोस. मी ह्या सैन्याच्या सहापट जास्त शक्तीमान आहे हे लक्षात घे अरे सुता, सुमित्रा".

"माझ्या मनात कधी भिती नसते, शत्रू कितीही मोठा असला तरी मला भिती शिवत नाही. मी बिनधास्त आहे समजलास कां. आता आपला रथ थेट द्रोणांकडे घेऊन जा". अशा रितीने ते बोलत होते. ते बोलल्यानंतर तो त्याच्या तीन वर्षी घोड्यांना त्वरेने पुढे जाण्यासाठी चुचकारतो. ते वेगांने द्रोणाकडे पोहोचतात. त्याला वेगांने द्रोणांकडे जाताना पाहून कौरवांचे योद्धे त्याच्याकडे जाऊ लागतात. त्याच्या मागून पांडवांच्या पलटणी जात होत्या. ते सगळे फार वेगांने पुढे सरकत होते. अभिमन्यू त्या कौरवांचा फडशा पाडत द्रोणांकडे जात होता. जसे सिंहाचा छावा हत्तीच्या कळपावर चाल करून जावा. तुझे योद्धेसुद्धा कांहीं कमी नव्हते, ते सुद्धा त्याच्यावर व त्याच्या मागून येणाऱ्या पांडव फौजे वर बणांचा वर्षाव करत होते. युद्धाला रंग चढत होता. अनेक घोडेस्वार मरून खाली पडत होते जसे नेहमी अशा युद्धात होते व त्यांचे घोडे दिशाहीनपणे कोठेतरी भरकटत धावत जात होते. त्या दिवशीचे युद्ध अधिकाधिक भीषण होत होते. द्रोणाच्या नजरेसमोर अभिमन्यू त्या चक्रव्युहात अखेरीस यशस्वीपणे शिरला होता व त्याच्या मागून त्याचे सैन्य वेगांने आत घुसत होते. रणवाद्ये जोरां जोरांने वाजत होती. त्यात सैनिकांचे ओरडणे, त्यांच्या किंकाळया अशा आवाजांने आसमंत भरले होते. योद्ध्यांचे एकमेकांना ओरडून सांगणे जसे, थांब थांब, ह्याला धर, त्याला धर, मार, पकड, आपट अशा आरोळया ऐकू येत होत्या. हत्तींचे किंचाळणे, घोड्यांचे खिंकाळणे असे विविध आवाज चहूकडून येत होते. त्याशिवाय हास्य कल्लोळ सुद्धा ठिकठिकाणाहून ऐकू येत होते.

कौरवांचे योद्धे अभिमन्यूवर तुटून पडतात. अभिमन्यूच्या बाणांपुढे त्यांचे कांहीं चालत नव्हते. त्यांने ठार मारलेले तुमचे योद्धे त्यांच्या चिलखतासह त्या मातीत पडलेले दिसत होते. कांहींच्या हातात तलवारी, ढाली, धनुष्य अशी आयुध होती. कांहींच्या अंगावर उंची कातड्याची वस्त्र होती, फाडलेली व रक्ताने माखलेली. तेथे मरून पडलेल्या सैनिकांच्या अंगाला लावलेल्या सुगंधाचा दरवळ सर्वत्र पसरलेला होता. त्यांच्या अंगावरील दागिने सर्वत्र विखुरलेले दिसत होते. त्या मौल्यवान दागिन्यांकडे कोणी पहातसुद्धा नव्हते. रथावरील झेंडे फाटलेले होते, त्याबरोबर असलेली रणसाधने मोडून गेलेली होती. अभिमन्यूचे मृत्यूसत्र जोरात चालू होते. अभिमन्यू त्याच्या धारदार बाणांने कित्येक हत्तींना ठार मारले होते. कौरवांच्या सैन्यात विविध प्रजातीचे घोडे होते जसे, कंबोज, वल्हीक ते वेगांने धावणारे अश्व आता मरून पडलेले होते, त्यांच्या जीभा त्यांच्या तोंडातून बाहेर आलेल्या होत्या. कांहींचे डोळे बाहेर आलेले होते. त्या मेलेल्या प्राण्याना पाहून मांसभक्षक प्राणी मोठ्या संख्येने त्यांच्यावर तुटून  पडत होते. त्या विजयामुळे तो पांडव फार खूष दिसत होता. अभिमन्यूने तुझ्या तिनही दलांचा म्हणजे रथदल, अश्वदल आणि हत्तीदल, पराभव केला होता.

अर्जुनाच्या मुलाचा विजय असा होता जसा त्रिनेत्रचा झाला होता जेव्हां तो असुरांचा पराभव करतो. सर्वत्र पाईक सैनिक मरून पडलेले दिसत होते. एकट्या हातांने ते त्याने साध्य केले होते. देवांचा सेनापती स्कंध जसा लढत होता तसा तो लढत होता. तुझे मुलगे व योद्धे अवाक् होऊन एकमेकांची तोंड पहात होते. त्यांना कळत नव्हते कीं, ह्या सुभद्रा पुत्राला कसे आवरावे. तुझ्या मुलांच्या अंगाला घाम फुटला होता. कांहीं रणभूमी सोडून जाण्याच्या विचारात होते. त्यांचे जखमी मुलं तेथेच टाकून ते तेथून पोबारा करण्याच्या तयारीत दिसत होते. युद्धभूमी सोडून ते जात होते.

अभिमन्यू वध पर्व भाग चौतिसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग पस्तीसावा

संजय पुढे सांगतो, तुमचा मुलगा दुर्योधन ते पहातो कीं, त्याची भावंडं रणभूमी सोडून जाण्याच्या तयारीत आहेत. त्याचा संताप अनावर होतो. दुर्योधन स्वतः अभिमन्यूवर चाल करून जाण्याच्या विचारात दिसतो, ते पाहून द्रोण इतर कौरवांना सांगतात कीं, तुमच्या राजाला आवरा. ते नाहीतर मारला जाईल आपल्या सगळयांच्या नजरे समोर. त्याला आवरा नाहीतर हे युद्धा आजच संपले असे समजावे लागेल. ते ऐकल्यावर जे दुर्योधनाचे चाहते होते ते त्याचे मन वळवण्यासाठी त्याच्याकडे जातात. त्याला घेराव घालून पुढे जाण्यापासून थांबवतात. त्या त्याच्या मित्रात कृप, कर्ण, कृतवर्मन, शकूनी, भुरिश्र्वर, वृहद्वल, सल्य, पौरव, वृषसेना होते. ते अभिमन्यूवर चाल करतात. अभिमन्यूला ते आवडत नाही कीं, त्याची शिकार कोणी काढून घ्यावी. अभिमन्यू एक सिंहगर्जना करतो. त्याच्या बाणांच्या वर्षावामुळें ते तुझे वीर मागे सरकतात. परंतु, आता द्रोण स्वतः त्यांच्यात सामीव होतात व अभिमन्यूवर चाल करतात. परंतु, आपला चुलत नातू त्या हल्ल्याला यशस्वीरीत्या परतवतो. ते त्याचे युद्ध कौशल्य पाहून आकाशातील देव आणि ऋषी संतुष्ट होतात. तुझे मुलगे व नातू त्याच्यावर विषारी बाण मारण्यास सुरूवात करतात. तरी तो अर्जुनाचा मुलगा त्यांना आटपत नाही. असें दिसत होते कीं, अभिमन्यूचे छोडेखानी सैन्य एका बाजूला व विरुद्ध बाजूला तुझे अफाट सैन्य. ते दृष्य पहाण्यासारखे होते. कोणीही हार मानावयाला तयार नव्हते. त्यात दुःशाह अभिमन्यूला नऊ बाण मारतो. दुःशासन कित्येक बाण मारतो. कृप तीन मारतात, द्रोण सतरा मारतात. कृतवर्मन सात, वृहद्वल सत्तर, विविंसती सात, अश्र्वत्थामा सात, भुरिश्र्वर तीन सल्य सहा,शकूनी दोन दुर्योधन तीन असें बाण त्यांच्या कडून अर्जुनाच्या मुलाला मारले जातात. ते सगळे पचवून तो मर्द योद्धा त्याच्या रथात आनंदात नाचत होता. त्याला जे यश मिळाले होते त्याचा त्याला फार संतोष झाला होता असे स्पष्ट दिसत होते. तुझे मुलगे त्याला घाबरवण्याचा जितका प्रयत्न करत होते तितका तो उलट जास्तच धीट होत होता. त्याने ते चक्रव्युह पुरते फोडलेले होते. अभिमन्यू त्याच्या उमद्या घोड्यांच्या मदतीने त्या रणांगणात चौफेर उधळत होता. तो तुझ्या अस्मकाच्या मुलाला अडवतो. अस्मक अभिमन्यूला दहा बाण मारतो आणि बोलतो, "थांब, थांब", परंतु अभिमन्यू त्याच्या चपळाईने त्याच सर्वस्व नष्ट करतो व त्यालासुद्धा ठार मारतो. अस्मकाचा मुलगा मेलेला पाहून तुझे सैन्य मागे फिरते. ते एकत्रितपणे अभिमन्यूवर बाणांचा वर्षाव करू लागतात. त्यामध्ये कृप, कर्ण, द्रोण, शकूनी, सल्य, साल, भुरिश्र्वर, कृथ, सोमदत्त, प्रतर्दन, विविंसती, वृषसेन, शुसेन, कुंडवेदीन, वृंदारक, ललित्थ्य, प्रवाहू, दीर्धलोचन, दुर्योधन असें होते. अभिमन्यू त्या सगळयांना बाण मारून जखमी करत होता.

त्याचा एक बाण कर्णाला लागतो तो त्याच्या शरस्त्राणातून आरपार जातो. त्यामुळे कर्णाला फार त्रास होतो. तो त्या माराने थरथरू लागतो. त्यानंतर अभिमन्यू तुझ्या तीन मुलांना ठार मारतो, सुशेना, दीर्घलोचन आणि कुंडवेदीन. कर्ण त्यातून सावरत अभिमन्यूला पांच व नंतर पंचवीस बाण मारतो. अश्र्वत्थामा त्याला वीस व कृतवर्मन सात बाण मारतात. त्या बाणांने भरलेला अर्जुनाचा सुपुत्र रथातून खाली रणांगणात कोसळतो. सगळयांना वाटते कीं तो यमाच्या घरी गेला. अभिमन्यू त्यातून उठतो व सल्यावर बाणांचा मारा करतो. सल्यसुद्धा त्याला त्याच्या शस्त्राने मारतो. अभिमन्यू सल्याला वर्मी घाव घालतो. सल्य रथातच बसतो. त्यांचे सैनिक रणांगण सोडून जाऊ लागतात. द्रोण ते पहात असतात. मनातून ते संतुष्ट असतात कारण त्यांना पांडवांची जीत व्हावी असेंच वाटत होते. ते पाहून अभिमन्यूचे पितर त्याची वहाव्वा करत असतात स्वर्गातून. सगळे ऋषी, चरण, साध्य त्यात सामील असतात.

अभिमन्यू वध पर्व भाग पस्तीसावा संपला.

## अभिमन्यू वध पर्व

## भाग छत्तीसावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, "मला सांग अरे संजया, अभिमन्यू माझ्या शूरवीर योद्ध्यांचा नाश करत असतांना माझे लोक काय करत होते"?

संजय सांगू लागतो, ऐका महाराज, अभिमन्यू त्याच्या युद्धकौशल्याचे पुरावे देत असतांना तुमचे योद्धे द्रोणाच्या संरक्षणात होते. जेव्हां सल्याच्या रथाचा चुराडा अभिमन्यूने केला व सल्य हतबल झाला तेव्हां त्याचा धाकटा भाऊ संतापला, अभिमन्यूवर चाल करून गेला. परंतु, लवकरच अर्जुनाचा मुलगा त्याचे डोके धडापासून वेगळे करतो व तो सल्याचा भाऊ मरून पडतो. अभिमन्यूचे शस्त्रसंधान इतके नेमके व अचूक होते कीं, ते कसे घडले तेसुद्धा इतरांच्या लक्षात येत नाही. अभिमन्यू भलताच वेगवान होता त्याच्या तिरंदाजीमध्ये. त्याच्या तोडीचा कोणीही नव्हता तुमच्या सैन्यात. ते ज्या झपाट्याने घडले कीं, त्यामुळें तुझ्या सैन्याने धसका घेतला. अभिमन्यूचे शौर्य पाहून स्वर्गातील सगळे आनंदाने "वाहव्वा", "वाहव्वा" करत होते. सल्याचा भाऊ मारला गेल्यानंतर अनेक नावाजलेले योद्धे जे तुमच्या बाजूने लढत होते ते एकत्र येतात व अभिमन्यूवर हल्ला करतात. त्यातील कांहीं रथात होते कांही घोड्यावर होते, कांही हत्तीवर आणि कांहीं पायीच होते. त्यांच्याकडे विविध प्रकारची शस्त्रं अस्त्र होती. त्यांच्यामुळें मोठा आवाज होत होता. ते ओरडून बोलत होते, "आम्ही तुला आता सोडणार नाही"! ते ऐकून अभिमन्यू हसत होता. अभिमन्यू त्याला मिळालेल्या विविध दैवी शस्त्रांचा वापर करत होता. त्यातील कांही वासुदेवांने दिली होती व कांही त्याच्या पित्याने, धनंजयाने दिलेली होती. तो मोठ्या प्रमाणात नरसंहार करत होता. त्याच्यावर टाकलेली जबाबदारी तो प्रामाणिकपणे पूर्ण करत होता. त्याला थकवा, जो योद्ध्याचा खरा शत्रू असतो अजिबात, जाणवत नव्हता. त्या उलटपक्षी त्याचा उत्साह क्षणोक्षणी वाढत होता. तो न रागावता तुझ्या योद्ध्यांचा परामर्श घेत होता. ते मारले जात होते. जसे सूर्याचे किरण त्याच्यातून सरळ बाहेर येतात तसे त्याचे बाण त्याच्या धनुष्यातून सरळ बाहेर येत होते. तो स्वताभोवती गोल फिरत होता व त्यामुळें चौफेर बाणांचा वर्षाव होत होता. द्रोणांसमोर ते सगळे घडत होते. तुझे सैनिक रणभूमी सोडून पळून जात होते. द्रोण ते पहात होते, त्यांना त्या युवकाचे कौतुक वाटत होते असें दिसत होते कारण ते एवढे झाले, तरी ते रागावलेले दिसत नव्हते.

अभिमन्यू वध पर्व भाग छत्तिसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग सदोतिसावा

धृतराष्ट्र बोलतात, "माझे काळींज धडधडत आहे. एका बाजूला अभिमन्यूबद्दल अभिमान वाटत असतांना दुसऱ्या बाजूला माझ्या कुचकामी योद्ध्याबद्दल घृणा वाटते. हे असे मला पाहावे लागते ह्याची शरम सुद्धा वाटते. हा पंडुचा नातू दुसरा स्कंध आहे, तो कुरु वंशाचा कुलदीपक आहे ह्याचा मला सार्थ अभिमान वाटत आहे. त्याच वेळी तो माझ्याच मुलांना मारत आहे ह्याचे वैषम्य सुद्धा वाटत आहे. हे होत आहे कारण माझा तो नालायक पुत्र युद्ध मागत होता.

संजय बोलतो, मी आपल्याला त्या समराचे वर्णन करून सांगणार आहे ज्यामध्ये हा एकटा कित्येकांना कसा भारी जात होता ते समजेल. रथात उभा तो अर्जुनाचा मुलगा, वेगांने बाण चौफेर फेकत असतो. त्याचे बाण नेमके लक्ष्य गाठत होते. त्याचे निर्णय तो वेगांने घेऊ शकत होता. त्यामुळे प्रतिस्पर्ध्याच्या आधी तो त्याला मारत असें. तो द्रोणांपेक्षा जास्त जलदपणे बाण फेकत असल्यामुळे द्रोण, कर्ण, कृप असे मातबर योद्धे त्याच्या पुढे थकत होते. तेच होत होते इतर निष्णात योद्ध्यांच्या बाबत. जसें, सल्य, कृतवर्मन, वृहद्वल, दुर्योधन, सोमदत्त, शकूनी त्यांच्या फौजांनिशी हरत होते. त्वरीत निर्णय घेणे, अचूक नेम, वेगवान भडीमारा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे थकवा न येणे अशा उत्तम गुणांमुळें अभिमन्यू त्या सगळया वृद्ध योद्ध्याना पुरून उरत होता. ते वृद्ध योद्धे त्याच्या शिताफीवर प्रसन्न झाले होते. अशा अर्जुन पुत्राला ठार माऱण्याची कल्पना त्यांना कदाचित रुचत नसावी म्हणून ते जास्त करून बघ्याची भूमिका करत होते असे वाटत होते. ते एकमेकांत बोलत होते, "तो पहा सुभद्रेचा मुलगा पार्थांचे काम करत आहे". त्याच्या पराक्रमामुळें त्याचे सगळे काका प्रसन्न झाले होते. सगळेच अभिमन्यूच्या पराकर्मावर संतुष्ट झालेले होते. कोणी सांगत होते कीं, जर तो ठरवेल तर सगळे कौरव तो मारू शकतो पण त्याच्या मारण्या वरून असे दिसते कीं तो सगळयांना मारू इच्छित नाही. विशेषकरून तो वडिलधार्यांना त्याच्या भडीमारातून वगळत आहे. दुर्योधन, कर्ण, वल्हीक, दुःशासन, सल्य सगळे पहातात कीं, द्रोण त्याला हात लावत नव्हते. ते इतरत्र बाणांचा वर्षाव करत होते. ते समजतात कीं, अभिमन्यू त्यांच्या पट्टशिष्याचा सुपुत्र आहे म्हणून ते त्याला एका प्रकारे अभय देत आहेत. द्रोणांपुढे कोण टिकणार? साक्षात यमसुद्धा त्यांच्या तावडीतून सुटणार नाही मग हा मुलगा कसा वाचत आहे? त्याचे उत्तर ते सगळे समजून होते. द्रोणांकडून अभय प्राप्त झालेला अभिमन्यू जास्तच भीषण झाला होता. दुर्योधन त्यांना सांगतो, "आता झाले ते कौतुक पुरे झाले हा आपला शत्रू आहे व त्याला जर द्रोण मारणार नसतील तर कोणी दुसरा मारेल नाहीतर आपल्याला हार मानावी

लागेल". ते निश्चित झाल्यावर द्रोणांच्या आज्ञेची वाट न पहाता त्यांतील कांहीं ज्येष्ठ योद्धे अभिमन्यूवर जोराचा हमला करतात. दुःशासन त्याच्या मोठ्या भावाला बोलतो कीं, "मी ह्या मुलाला पांडवांच्या समक्ष ठार मारू इच्छितो. जसे राहू सूर्याला खातो तसा मी ह्या अर्जुनाच्या मुलाला खाणार आहे. त्या दोघा कृष्णांना जेव्हां समजेल कीं, मी अभिमन्यूला ठार मारले तेव्हां ते दोघे दुःखाने स्वताहून यमाकडे जातील असे मला वाटते. तसे झाले तर सगळे पांडव त्या मागोमग यमाकडे जातील व आपले काम सोपे होईल".

ते बोलल्यानंतर दुःशासन अभिमन्यूवर बाणांचा वर्षाव करू लागतो. दुःशासन चिडलेल्या हत्ती सारखा झाला होता. अभिमन्यू मात्र शांतपणे त्याला प्रत्यूत्तर देत होता. दोघे निष्णात योद्धे होते. त्यांचे रथयुद्धाचे ज्ञान तुल्यबळ होते. त्यावेळी विविध रणवाद्ये वाजू लागतात. जी योद्ध्यांना लढण्यात उत्तेजन देण्यासाठी वाजवली जातात. त्यात, पनव, मृदंग, दुंदूभी, क्रकचा, अनघ, तुतारी, झांज अशी कित्येक होती. त्याशिवाय योद्धे ओरडून साथ देत होते ते वेगळे.

अभिमन्यू वध पर्व भाग सदोतिसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग अडतीसावा

संजय पुढे सांगत असतो, अभिमन्यू त्याचे पाय बाणांच्या जखमाने दुखावले गेले असतांना सुद्धा हसत हसत दुःशासनाला बोलतो, "नशिबाने माझ्यापुढे तो दुष्ट नराधम आला आहे ज्यांने सभेत माझ्या काकांचा अपशब्द वापरून अवमान केला होता. कपट कारस्थान करून त्या शकूनीच्या मदतीने तुम्ही माझ्या काकांना फसवले होते, त्या सगळ्याची कटू फळ आपण सगळे लवकरच अनुभवणार अहात. म्हणून मी सगळयांच्या पुढे त्याची शिक्षा देणार आहे तुम्हाला. तसे करून मी भिम काकांच्या एका ऋणातून मुक्त होणार आहे. मी हयात असतांना तू जीवंत सुटणार नाहीस". तसे बोलत असतांना त्वरेने अभिमन्यू एक धारदार बाण दुःशासनाच्या छातीत मारतो जो आरपार जाऊन त्याच्या खांद्यातून बाहेर येतो. त्यानंतर आणखीन कांहीं बाण तो त्याच्यावर मारत असतो. त्या अचानक झालेल्या हल्ल्याने दुःशासन त्याच्या रथात कोलमडतो व बेशुद्ध होतो. त्याला रणभूमीतून हलवले जाते. ते पाहून पांडवांकडील लोक मोठ्या मोठ्याने ओरडून अभिमन्यूचे कौतुक करतात. पांडवांकडील रणवाद्ये जोराजोराने वाजू लागतात. त्याने उत्तेजित झालेले द्रौपदीचे पांच, सत्यकी, धृष्टद्युम्न, शिखंडी, केकया, धृष्टकेतू, व मत्स्य देशातील योद्धे, श्रींजयांचे योद्धे युधिष्ठीराच्या नेतृत्वाखाली असे सगळे कौरवांवर तुटून पडतात. ते सगळे द्रोणाचे चक्रव्यूह फोडण्यासाठी पुढे जातात. ते पांडव विजयाच्या अपेक्षेने युद्ध करत असतात.

ते पाहून दुर्योधन तुझा मुलगा कर्णाला बोलतो, "ते पहा राधासुता, आपला एक बुलंद योद्धा अभिमन्यूने बाद केला आहे. पांडवांचा जोर वाढला आहे. ते अभिमन्यूला संरक्षण देणार आहेत असें दिसते". ते ऐकून रागावलेला कर्ण पांडवांवर बाणांचा वर्षाव अभिमन्यूवर करू लागतो. पराक्रमी अभिमन्यू कर्णाला बाणांने भोसकतो. तुमच्या पैकी कोणीही त्या पुढे येणाऱ्या पांडवांना थांबवू शकत नाही. कर्ण अभिमन्यूला शेकडो बाण मारतो. त्याला अभिमन्यूला बाद करावयाचे असते. कर्ण एकेकाळचा भार्गवाचा शिष्य त्या अजिंक्य अभिमन्यूवर सारखा बाण फेकत असतो. परंतु, त्या बाणांचा अर्जुनाच्या मुलावर कांहींही परिणाम झालेला दिसत नाही. अभिमन्यू तुमच्या अनेक योद्ध्यांचे धनुष्य मोडून तोडून टाकतो व नंतर पुन्हा कर्णाकडे वळतो. तो कर्णाच्या डोक्यावरील छत्र, ध्वज, त्याचा दांडा आणि त्याचे घोडे बाद करतो. ते करत असतांना तो हसत असतो. कारण तो ते सहजपणे करत होता. त्यानंतर तो कर्णाचे धनुष्य मोडून टाकतो. ते जमिनीवर पडते. कर्णाची ती अवस्था पाहून त्याचा धाकटा भाऊ वृषसेना अभिमन्यूवर चाल करतो. पांडवांचे

कडील रणवाद्ये जोरा जोराने विजयाची धून वाजवू लागतात. त्यामुळें तुझ्या गटातील लोक फार चिडतात परंतु कांहीं करू शकत नाहीत.

अभिन्यू वध पर्व भाग अडतीसावा संपला.

## अभिमन्यू वध पर्व

## भाग एकोण चाळीसावा

संजय पुढे सांगतो, वृषसेन अभिमन्यूवर बाण मारतो. अभिमन्यूची छत्री पाडतो. त्याच्या सारथ्याला व घोड्याना बाण मारून जखमी करतो. ते पाहून तुमच्याकडील योद्धे आनंद व्यक्त करतात. त्यानंतर अभिमन्यू त्याच्या एका बाणांने वृषसेनाचे डोके उडवतो. तो वृषसेन मरतो. कर्ण ते पाहून थक्क होतो. आता अभिमन्यू इतर योद्ध्यांकडे वळतो. तेथे असलेले घोडेस्वार, हत्तीदल ह्यांचा तो समाचार घेऊ लागतो. कर्णाला त्याच्या भावाच्या मृत्यूचा धक्का सहन न होणारा होता. पांडवांच्या फौजा व अभिमन्यूचे शौर्य ह्यामुळें द्रोणाचे चक्र व्यूह फुटले होते. त्या भडीमारामुळे तुमचे सैन्य रणभूमी सोडून जाऊ लागले होते, फक्त जयद्रथाचे सैन्य उरलेले होते. ते पाहून अभिमन्यू त्याचे शंखू वाजवू लागतो. त्यानंतर तो उरलेल्या तुमच्या फौजांची कत्तल करू लागतो. त्यात हत्ती, घोडे व त्यावरील स्वार होते. त्या मारामुळे उरलेले तुमचे सैन्यसुद्धा पळून जाऊ लागले होते. तुडलेले हात, पाय त्यातून निसटून पडलेले दागिने ह्यांचा नुसता खच झाला होता त्या रणभूमीवर. मृतांबरोबर रथाचे तुटलेले भाग सुद्धा सर्वकडे पडलेले दिसत होते. अभिमन्यू मारत असताना ओरडणाऱ्या राजांचे व त्यांच्या मुलांचे किंचाळणे सर्वत्र ऐकू येत होते. तुमचे सैन्य फार मोठे होते व ते कापरासारखे जळून जात होते. तो इंद्राचा नातू त्या रणांगणात दुपारच्या सूर्यासारखा तळपत होता.

अभिमन्यू वध पर्व भाग एकोणचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग चाळीसावा

धृतराष्ट्र बोलतो संजयाला, "कौतुकास्पद आहे कीं, वैभवात आरामशीर जगलेला पंडुचा नातू युद्धात एवढे शौर्य गाजवत होता. तो युधिष्ठाराच्या सैन्याचा मेरुमणी ठरला होता. इतक्या लहान वयात ह्याची करावी तेवढी तारिफ कमीच पडेल. मला सांग संजया, त्याच्या तोलामोलाचा एकतरी योद्धा पांडवांच्या गटात तुला दिसला कां"?

संजय बोलतो, युधिष्ठीर, भिमसेन, शिखंडी, सत्यकी, नकूल, सहदेव, विराट, द्रुपद, धृष्टकेतू आणि त्यांच्या सैना कौरवांवर चाल करून जातात ज्या मार्गाने अभिमन्यू गेला होता. तो धडाका पाहून तुझ्या सैन्याने माघार घेण्यास सुरूवात केली होती. परंतु, सिंधचा राजा व तुमचे जावई जयद्रथ त्यांना अडवतात. महान धनुर्धारी वृद्धाक्षत्र त्याची दैवी आयुध वापरत पांडवांना अडवू लागला होता.

धृतराष्ट्र बोलतो, "मला वाटते अरे संजया, ते एक मोठेच आव्हान सिंधच्या राजाने आपणहून घेतलेले होते. मला त्याचे कौतुक वाटते. मला सांग त्या माझ्या जावयाने कोणता मोठा पराक्रम केला त्या युद्धात. मला सांग त्याने कोणते तप केले होते व कोणते यज्ञ केले होते ज्यामुळें त्याला पांडवांशी दोन हात करण्याची हिम्मत प्राप्त झाली.

संजय सांगू लागतो, एके काळी जेव्हा पांडव वनात रहात होते तेव्हां तुझ्या जावयाने द्रौपदीची कळ काढली होती. तो तिला पळवू पहात होता. तेव्हां त्याला भिमाने व अर्जुनाने पकडून त्याची निर्भत्सना केली होती. त्यामुळें विलक्षणपणे जयद्रथ संतापला होता व पांडवांचा सूड उगवण्यासाठी तो महादेवाची तपस्या करू लागला होता. मोठे वैराग्यपूर्ण असें तप तो करत राहीला. उपोषणामुळे त्याच्या अंगाच्या काड्या झाल्या होत्या. कठोर तप केल्यामुळे त्याला एकदाचे महादेव प्रसंन्न होतात, विचारतात, त्याला काय पाहिजे? जयद्रथ त्यांच्याकडे एकच वर मांगतो कीं, तो पांडवांच्या मरण्यास कारणीभूत व्हावा. त्याला महादेव वर देतात की, एक अर्जुन सोडून बाकीच्यांना तो मारू शकेल. ते त्याला स्वप्न पडलेले होते. प्रत्यक्ष महादेवाचे दर्शन त्याला झालेले नव्हते. त्यानंतर तो समजतो कीं, त्याच्यावर महादेवाची कृपा आहे व त्या समजूती खाली तो पांडवांना आव्हान देत असतो. त्याच्या उत्तेजनामुळे त्याचे क्षत्रिय युद्धासाठी तयार होतात. अशारितीने तुमच्या जावयाने ते आव्हान स्वीकारलेले होते. तो त्याची फौज घेऊन पांडवांवर चाल करून जातो जेथे युधिष्ठीर होते.

# अभिमन्यू वध पर्व

# भाग एकेचाळीसावा

संजय पुढे सांगतो, अहो राजन, आपण मला विचारत होता, जयद्रथाच्या हिम्मती बाबत, ते सांगतो, नीटपणे ऐका, त्याचा रथ सर्व प्रकारच्या आयुधाने सज्ज होता. त्याच्या ध्वजावर जरीमध्ये काढलेले वराहमुद्रा होती. त्याच्या डोक्यावर पंखे बसवलेले होते जे त्याला वारा घालत असत, ते राजा असल्याचे चिन्ह समजले जात होते सिंध मध्ये. त्याच्या रथावर नक्षीकाम केले होते व त्यात रत्न, माणकं असे मौल्यवान खडे बसवलेले होते. त्याच्याकडे शस्त्र साठा विपूल होता. चक्रव्युहात त्याची नेमणूक होती जेथून अभिमन्यू त्यात शिरला होता. आता सांगतो पुढे काय झाले ते. तो सत्यकीला तीन बाण मारतो. दृष्टद्युम्नाला साठ बाण मारतो. वृकोदराला आठ मारतो. द्रुपदाला पांच व शिखंडीला दहा मारतो. कैकेयाना पांच मारतो. जयद्रथ द्रौपदीच्या पाच मुलांना प्रत्येकी तीन बाण मारतो. युधिष्ठाराला सत्तर बाण मारतो. ते फारच कौतुकास्पद झाले होते. पांडवांच्या सैन्यावर तो बाणांचा वर्षाव करतो व त्यात कित्येक मरतात. युधिष्ठीर त्याचा तिरकमटा मोडून टाकतो. जयद्रथ नवीन धनुष्य घेतो व युधिष्ठीराला दहा बाण मारतो. भिम त्याच्या लोखंडी भारीभाक्कम बाणांने त्याचे धनुष्य आणि घोडे बाद करतो. जयद्रथ आणखीन एक धनुष्य घेऊन भिमाचा ध्वज पाडतो. भिम सत्यकीच्या रथात चढतो. ते पाहून जणू जिंकलो आहोत अशा थाटात तुझे सैनिक आनंद व्यक्त करतात. तो एका हातांने पांडवांना अडवत असतो त्याचे कौतुक होते. मत्स्य, पांचाल, कैकेया, पांडव त्याला हटवण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु, त्याना त्यात यश येत नव्हते. द्रोणांनी तयार केलेले चक्रव्युह तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या सगळयाना जयद्रथ अडवत होता. त्याला ते करता येत होते कारण त्याला महादेवाचा वर प्राप्त झाला आहे असा त्याचा समज होता, त्याबद्दल मी आपल्याला आधी सांगितले आहे.

अभिमन्यू वध पर्व भाग एकेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग बेचाळीसावा

संजय पुढे सांगत असतो, जसे सिंधचा राजा पांडवांचे आक्रमण अडवतो, त्यावेळी जे युद्ध होते त्या दोघा पक्षांत ते भीषण होते. तो अजिंक्य अभिमन्यू कौरवांच्या सैन्याच असा फिरत होता जसे एकादा देवमासा सागरात स्वच्छंदपणे विहार करत असतो. त्याच्या बाणांच्या पावसाने कौरवांचे सैन्य बेजार झाले होते. त्याला तुझ्या सैन्याने चहोबाजूने घेरलेले होते परंतु, त्याला त्याची भिती वाटत नव्हती. ते पाहून अभिमन्यूचा सारथी त्यांचा रथ वेगळया रणक्षेत्रात घेऊन जातो. तो कौरवांचा घेराव कसा तोडतो ते पहाण्यासारखे होते. सगळे आकाशात बसलेले ते पाहून त्याच्या सारथ्याचे कौतुक करतात. अभिमन्यूची आघाडी पाहून चिडलेला महाबली राजा वसतीय, त्याला आव्हान देतो. वसतीय अभिमन्यूला बोलतो जोवर मी आहे तोवर तुला जाऊ देणार नाही. असे तो बोलत असतांना अभिमन्यू त्याच्यावर जोरांने मोठ्या बाणांचा वर्षाव करतो. ते बाण वसतीयाच्या चिलखतातून आरपार जाऊन त्याच्या अगातून बाहेर पडतो. त्याबरोबर वसतीय जमिनीवर कोसळतो, तो मरतो. वसतीय मेला हे कौरवांना समजते. त्यामुळें त्याचे चाहते अनेक क्षत्रिय भयंकर संतापतात. ते अभिमन्यूचा वध करण्याचे ठरवतात. त्यानंतर एका बाजूला अभिमन्यू व दुसऱ्या बाजूला ते क्षत्रिय असे युद्ध सुरू होते. फाल्गुनीचा मुलगा ते आव्हान सहजपणे स्वीकारतो. तो त्या मोठ्या क्षत्रियांचे हात पाय तोडून टाकतो. सगळीकडे त्यांचे अवयव विखूरलेले दिसत होते, तो हत्याकांड फारच भीषण होते. जे एकेकाळी मोठे योद्धे म्हणून नावाजलेले होते ते आता तेथे मरून पडलेले दिसत होते. त्यांच्या बरोबर त्यांचे घोडे, हत्ती, सारथी असें सगळे मरून पडलेले दिसत होते. जेव्हां तो त्याचे धनुष्य घेऊन स्वतः भोवती फिरत बाणांचा वर्षाव करत असें त्यावेळी त्या बाणांच्या झुंडीमुळे तो दिसत नसे.

अभिमन्यू वध पर्व भाग बेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग त्रेचाळीसावा

संजय पुढे सांगत असतो, प्रतिस्पर्ध्यांचे जीव मारत तो अर्जुनचा मुलगा जो स्वतः यम बनला होता त्याची ताकद इंद्रासारखी झाल्याचे वाटत होते. कौरवांची धांदल त्याने उडवली होती त्यामुळें तो विशेष तेजस्वी दिसत होता. तो सत्वश्रवाला पकडतो, ते पाहून तुझे कित्येक योद्धे त्यांची विविध आयुध घेऊन त्याच्यावर चाल करतात. त्यांना अभिमन्यूला ठार मारावयाचे असते. त्यांच्यात चढाओढ लागते पहिला कोण अभिमन्यूला मारण्यासाठी जाणार. ते सगळे एकत्रितपणे त्याच्यावर जातात. ते असे दिसत होते जसे देवमाशांवर अनेक छोट्या माशांनी हल्ला करावा व देवमाशाने त्यांना सहजपणे मारून टाकावे. त्यावेळी मद्रदेशाचा राजपुत्र रुकमराठा आपल्या फौजांना सांगतो, "अरे मर्दानो त्याला भिऊ नका. तो तुमचे कांहीं वाकडे करू शकणार नाही". मी त्याला जीवंत पकडणार आहे. तसे बोलून तो रुकमराठा अभिमन्यूवर चालून जातो. अभिमन्यूला तो दोनही हातांना प्रत्येकी तीन असे बाण मारतो. अभिमन्यू त्याचे दोनही हात छाटून टाकतो, त्याचे डोके असे उडवतो कीं त्याचे डोळे बाहेर येतात. रुकमराठा मरतो. जो त्याला ठार मारण्याची गोष्ट करत होता तोंच मेला होता. ते पाहून सल्याचा पराक्रमी मुलगा ते आव्हान घेण्यासाठी पुढे होतो. त्याचे अनुभवी योद्धे अभिमन्यूला घेरतात. ते पाहून दुर्योधनाला आनंद होतो. ते राजपुत्र अभिमन्यूवर बाणांचा असा वर्षाव करतात कीं त्यात तो दिसेनासा होतो. ते असंख्य बाण त्याला सर्वांगाला टोचत असतात. त्यामुळें तो फार रागावतो. त्यावेळी तो गंधर्व अस्त्र वापरतो. त्यामुळे भ्रम उत्पन्न होतो. ते अस्त्र अर्जुनाने गंधर्व राजा तुंब्रू कडून मिळवलेले होते. त्यांना समजेना अभिमन्यू कोठे आहे. असा त्या भ्रम अस्त्राचा प्रभाव होता. जेथे पहाल तेथे त्यांना अभिमन्यू दिसत होता. त्यामुळे त्यांचा गोंधळ उडत होता. त्या राजपुत्रांचे बाण भलतीकडे जात होते व त्याचा फायदा अभिमन्यूला होत होता. तो त्यांचे शिरच्छेद करत होता. त्या शभर राजपुत्रांना तो यमाच्या घरी पाठवतो. ते पाहून दुर्योधनाला काळजी वाटू लागते कीं ह्याचे आता काय करावयाचे? त्याला अभिमन्यूचा बाण लागतो. तो युद्धातून दूर होतो. अभिमन्यू वध पर्व भाग त्रेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग चव्वेचाळीसावा

धृतराष्ट्र संजयाला बोलतो, तू मला ती एक विरुद्ध अनेक, प्रसंगाची माहिती सांगितलीस ती फारच रोचक आहे. त्या लहान मुलाचे धाडस, त्याची हिम्मत सगळेच कुरु घराण्यासाठी अभिमानाचे आहे. ते आपल्याच लोकांसाठी खर्च झाले त्याचे मला अतीव दुःख होत आहे. त्यात मला विशेष आश्चर्य वाटत नाही कारण चांगुलपणा व पावित्र्य सांभाळणाऱ्यांच्या मध्ये अशी अचंबित करणारी कुवत असते असे समजले जाते. दुर्योधन मार खातो व त्याचे शंभर राजपुत्र मारले जातात त्यानंतर काय होते ते मला सांग. कौरवांच्या तोंडचे पाणी पळाले होते. कंठ सुकले होते. त्यांच्या सर्वांगाला घाम फुटला होता. आता त्यांचा धीर सुटला होता व ते माघार घेण्याचे ठरवतात. त्यांचे जखमी भाऊबंध तेथेच टाकून ते रणभूमी सोडून जाण्याचे ठरवतात. त्यांच्या घोड्याना वेगांने ते रणांगण सोडण्यासाठी घोड्यांना चाबूक मारतात. त्यांचे घोडे वेगांने पळू लागतात. ते दृष्य पाहून द्रोण, त्यांचा मुलगा अश्र्वत्थामा, कृप. कर्ण, दुर्योधन स्वतः. कृतवर्मन, शकूनी अभिमन्यूला कायमचे नष्ट करण्यासाठी त्याच्या कडे जाऊ लागतात. परंतु, ते सगळे परत मार खाऊन येतात. कारण अभिमन्यूचा जोर फार होता. फक्त एकच कौरव लक्ष्मण, जो सुद्धा ऐषारामात वाढलेला असतो तो बेडरपणे अभिमन्यूवर जातो. लक्ष्मण दुर्योधनाचा मुलगा असल्याने त्याला त्याची काळजी वाटू लागते. ते सगळे त्याला सामील होतात व पुन्हा एकदा अभिमन्यूवर ते बाणांचा पाऊस पाडू लागतात. अभिमन्यू त्याना पुरून उरतो. चवताळलेल्या हत्ती सारखा तो झालेला होता. त्याच्यापुढे कोणी टिकत नव्हते. लक्ष्मण गंधर्वांसारखा सुंदर होता. अभिमन्यू लक्ष्मणाचे दोनही हात जखमी करतो. अभिमन्यू त्याला बोलतो आता हे जग चांगले पाहून ठेव कारण तू जास्त काळ येथे नसशिल.

अभिमन्यू एक लांब पल्ल्याचा बाण त्याच्या मानेवर असा मारतो कीं, त्याचे मुंडके तुटून पडते. तो सुंदर चेहरा नामशेष होतो. ते पाहून तुझे सैनिक हळहळ व्यक्त करतात. सगळयांना फार वाईट वाटते. आपल्या प्रिय पुत्राचा अशाप्रकारे मृत्यू होण्याने दुर्योधनाला दुःख व संताप दोनही होतात. त्याला कळत नाही आता ह्याचे काय करायचे. तो मोठ्याने त्याच्या सगळया क्षत्रियांना आवाहन करतो, "ह्याला ठार मारा, आता खेळ खूप झाला". त्यानंतर कृप, कर्ण, अश्र्वत्थामा, वृहद्बल, कृतवर्मन, हृदीकाचा मुलगा असे सहाजण अभिमन्यूला वेढा घालतात व त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतात. अभिमन्यू त्यांच्यावर तितक्याच जोराने वार करू लागतो. जयद्रथ, कलिंग, निशाध, कृथ, त्यांच्या हत्ती दलाच्या मदतीने त्याचा रस्ता अडवतात. त्याची कोंडी

करतात. अभिमन्यू ते हत्तीदल मारून टाकू लागतो. इतर कांही द्रोणांच्या नेतृत्वाखाली त्याच्यावर हल्ला करतात. अभिमन्यू कृथाचे हल्ले यशस्वीपणे उलटवतो. अर्जुनाचा मुलगा त्यांचे प्रत्येकाचे कित्येक योद्धे मारून टाकतो. कृथाचा मुलगा मोठा विद्वान होता तो मारला जातो ते पाहिल्यावर इतर योद्धे तेथून काढता पाय घेतात.

अभिमन्यू वध पर्व भाग चव्वेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग पंचेचाळीसावा

धृतराष्ट्र संजयाला बोलतो, "युद्धातून न हटणारा सुभद्रेचा मुलगा आपल्या व्युहात घुसल्यानंतर त्याच्या कुणाला शोभेल असेंच कर्तृत्व दाखवत होता. आपले वीर काय करत होते"?

संजय सांगू लागतो, आपल्या व्युहात घुसल्या पासूनच तो कौरवांना भारी जात होता. त्याला एकटे पाडण्यात जयद्रथाला थोडे यश आले होते कारण तो इतर पांडवांना त्याला मदत करण्यापासून दूर ठेवत होता. एकट्या अभिमन्यूवर द्रोण स्वतः, हृदीकाचा मुलगा, कृतवर्मन, कर्ण, अश्र्वत्थामा, कृप डाव लावून बसले होते. एवढे करूनही अर्जुनाचा मुलगा त्यांना आटपत नव्हता. तो सगळ्यांना कित्येक बाण वर्मी मारून बधीर करत होता. त्यांची लढण्याची क्षमता तो कमी करत होता त्याच्या विषारी बाणांनी. कोणाला सहा बाण, कोणाला पांच बाण कोणाला वीस बाण असें तो मारत होता त्यांना सतत जखमी करत होता. त्याच्या बाणातील वीष जसे त्यांच्या अंगीत भिनत होते त्यांची लढण्याची क्षमता कमी होत होती. अश्र्वत्थामाला तो वीस बाण मारतो. मोठ्या लांबड्या बाणांने तो घोड्याना जखमी करत होता. तसेंच हत्तीनासुद्धा तशा बाणांने बधीर करत होता. त्याच्या बाणातील वीष लक्ष्याला मारत नव्हते परंतु बधीर करत होते.

अभिमन्यू रथाच्या सारथ्यानासुद्धा तशा बाणाने बधीर करत होता. बधीर झाल्याने त्या योद्ध्यांचे नेम चुकत होते. ते करत असतांना तो वृंदारकाचा वध करतो. अशारितीने तो अर्जुनाचा मुलगा त्याच्या विरोधकांचा पराभव करत असतांना द्रोणांचा मुलगा अश्र्वत्थामा त्याला वीस बाण मारतो. त्यामुळे क्षणभर अभिमन्यू थोडा डगमगतो व पुन्हा स्वताला सावरून ताबडतोब त्याला सत्तर बाण मारतो. त्याला कांहीं वेळासाठी बाद करतो. तरी अश्र्वत्थामा कांहीं झाले नाही असा मैनक पर्वताप्रमाणे रणांगणात उभा होता. अशारितीने ते युद्ध होत होते. कर्ण बाविस बाण मारतो, कृतवर्मन चार मारतो, वृहद्बल आणि कृतवर्मन चार प्रत्येकी मारतात. ते सगळे बाण अभिमन्यू उलटवत असतो त्यामुळे त्याचा इजा होत नसते. कोसलचा राजा अभिमन्यूच्या छातीत बाण मारतो ते उलटवले जातात व त्यावर अभिमन्यू त्याचे घोडे व सारथी बाद करतो. त्याचे घोडे गेल्यामुळे तो कोसलचा राजा तलवार घेऊन खाली उतरतो व अभिमन्यूचे डोके उडवण्याचा प्रयत्न करतो. ते त्याला जमत नाही पण अभिमन्यू त्याच्या छातीत बाण मारून त्याला बाद करतो. तो मरून पडतो. ते पाहून कौरवांसाठी लढणारे दहा हजार राजे त्यांच्या शस्त्रानिशी पळून जातात. जाताना ते दुर्योधनाला शिव्या घालत असतात. कोसलचा राजा वृहद्बल मारल्यानंतर अभिमन्यूचा जोर वाढतो.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग सेहेचाळीसावा

संजय पुढे सांगतो. अभिमन्यू पुन्हा कर्णाला त्याच्या वीषारी बाणाने जखमी करतो. त्यामुळे तो फार रागावतो. कर्ण सुद्धा त्याला बाण मारतो. अभिमन्यूचे सगळे शरीर बाणांने भरलेले होते. त्याच्या बाणाने कर्णसुद्धा त्याच्या रक्ताने भरलेला होता. ते क्षत्रियंना भूषणावह समजले जात होते. दोघेही तशात फार सुंदर दिसत होते. त्यानंतर अभिमन्यू कर्णाचे सहा सल्लागार ठार मारतो जे त्याला युद्धाबाबत सल्ला देत असतं. त्यांचे घोडे मारतो सारथ्यानासुद्धा घायाळ करतो. इतर योद्धे जे त्याच्या भोवती वेढा घालून होते त्यांना बाण मारून घायाळ करत असतो. त्यातमध्ये मगधचा राजा, अश्र्वकेतू, भोज राजा मर्तीकावत व दुःशासनाचा मुलगा होता. दुःशासनाचा मुलगासुद्धा त्याला कांहीं बाण मारतो. त्यावर अभिमन्यू जोराने ओरडून त्याला बोलतो, "तू युद्ध सोडून जा तुझ्या पित्या प्रमाणे. पण जर लढत राहीलास तर माझ्या हातून तुझी सुटका होणार नाही". असें बोलून तो त्याला दहा बाण मारतो. परंतु, त्याच वेळी अश्र्वत्थामा ते बाण मध्येच तोडतो. अभिमन्यू अश्र्वत्थामाला सोडतो व सल्याकडे वळतो. त्यानंतर तो सल्याचे घोडे बाद करतो व त्याचे सारथीसुद्धा मारतो. सल्य दुसरा रथ घेतो, त्यानंतर अभिमन्यू कौरवांचे पांच योद्धे मारतो, त्यांची नांव अशी आहेत, शत्रूंजय, चंद्रकेतू, महराघ, सुवर्णा आणि सूर्यभास. त्यानंतर तो शकूनाला घायाळ करतो. शकूनी दुर्योधनाला बोलतो कीं, "ह्याला एकेकटा कधीच सुद्धा मारू शकणार नाही, त्यासाठी कांहीं कपट केले पाहिजे. सरळ युद्धा पेक्षा वाकडे युद्ध करावे लागेल. त्याच्यावर आपण एकत्रपणे अंगाची लढाई करावयाला पाहिजे बाणाच्या लढाईत हा आपल्याला भारीच जाणार त्याकरतां द्रोणांचा व कृपांचा सल्ला घे". ते विचारतात, "ह्या तरुण योद्ध्यात कांहीं दोष दिसतो का"? कर्ण बोलतो, "त्यात कांहींच दोष दिसत नाही. त्याच्या बाणांमुळे मला फार त्रास होत आहे पण मी त्याचे कौतुक करण्यापासून राहू शकत नाही. त्याची चपळता कमालीची आहे. मला त्याचा हेवा वाटतो. ह्याच्या युद्ध कौशल्यात अजिबात दोष आढळत नाही. त्याच्या आणि त्याच्या पित्यात मला कांहींच फरक दिसत नाही". पुढे तो सांगतो, "त्याच्या बाणामुळे मला फार त्रास होत आहे तरी मी युद्धात उभा आहे कारण ते मला करावे लागत आहे, माझा नाईलाज होत आहे. ते कर्णाचे ऐकून द्रोण स्मित करतात व हळूच त्याला बोलतात, "अभिमन्यू तरूण आहे त्याच्या अंगात जोश भरपूर आहे. त्याचे चिलखत त्याच्या पित्याने स्वर्गातून आणलेले आहे. मी त्याच्या पित्याला युद्धात कसे चिलखत असावे ते शिकवले आहे. ते तुला माहीत नाही म्हणून तू त्रास करत आहेस". पुढे द्रोण अभिमन्यूला कसे मारावयाचे ते सांगतात, तू त्याचे धनुष्य तोड, घोडे मार, त्याचे सारथी मार ते जमले तर पुढचे पाहू. कारण, त्याला बाणाच्या

युद्धात हरवणे देवांनासुद्धा जमणार नाही हे लक्षात घ्या. ते समजल्यावर कर्ण अभिमन्यूचे धनुष्य व कृतवर्मन घोडे मारतो. कृप त्याचे सारथी मारतो, इतर त्याच्यावर सतत बाणांचा वर्षाव करत रहातात. त्यामुळे त्याच्या हालचाली मंद होतात. ते सहा जुने जाणते त्या नवतरुणाच्या मागे जसे लांडगे सिंहाच्या बछड्यामागे लागावेत तसे लागले होते. तो तरूण हार मानत नव्हता. त्याच्या कुळाला हार मानणे माहीत नसावे. ते कूळ लढत रहाणारे होते. आता तो धनुष्य नाही, रथ नाही असा त्यांच्या मध्ये होता व ते त्याच्या भोवती त्यांच्या रथातून वार करत होते.

संजय कळवळून बोलतो, "अहो राजन, ते धर्मयुद्ध होत नव्हते. युद्धनितीच्या विरुद्ध सगळे होत होते". अभिमन्यू आता तलवार घेऊन लढण्यासाठी तयार होता. त्याचा सुदर चेहरा आणखीनच तेजस्वी दिसत होता. एका हातात तलवार व दुसऱ्या हातात ढाल होती. असा तो आकाशात उंच उडी मारतो त्या विद्येला कौशिका म्हणतात ती त्याला येत होती तिचा उपयोग तो करणार होता. आता तो आकाशात गरूडासारखा वाटत होता. दोनही हात पसरून तो खाली येत होता. तो कोणावर उतरेल त्याची भ्रांत त्या सहाजणांना पडली होती कारण, ज्याच्यावर पडेल तो मेलाच म्हणून समजावे. ते द्रोणासकट सगळेजण त्याच्याकडे चिंतातूरपणे पहात होते. द्रोण कर्णाला सांगतात, तू त्याची ढाल त्याच्या हातून पडेल असे शरसंधान कर ते स्वतः अभिमन्यूच्या तलवार धरलेल्या मुठीवर बाण मारतात त्यामुळे तलवारीचे पाते त्याच्या मुठीपासून तुटते. कर्ण ढाल उडवतो. आता अभिमन्यू खरोखरच निःशस्त्र झाला होता. तो जर जमिनीवर पडला तर त्या धक्क्याने मरेल असें ते समजत होते पण तसे होत नाही. अभिमन्यू अलगदपणे जमिनीवर उतरतो. अभिमन्यू उतरल्या बरोबर तेथे पडलेल एक रथाचे चाक उचलतो व ते शस्त्रासारखे गोल फिरवू लागतो ज्यामुळे आम्हाला त्याच्या मामाची आठवण येते जेव्हां तो त्याचे सुदर्शन चक्र फिरवतो. त्याच्यावर मारलेले बाण त्या चाकाच्या गोल फिरण्याने उलटवले जात होते. अभिमन्यूचे डोळे लाला दिसत होते. ते सहाजण त्यांच्या रथाच्या गोल फिरण्याची त्रिज्या लहान करतात व ते त्याला त्यांत बंद करण्याचे ठरवतात. अभिमन्यू फारच भयंकर झालेला दिसतो. त्याची द्रोणांना सुद्धा भिती वाटू लागते कारण त्यांचे मन त्यांना सांगत असते कीं, ते धर्मयुद्ध करत नाहीत. कपट होत आहे व त्याचा जाब त्या सगळयांना धनंजयाला व कृष्णाला द्यावा लागणार आहे ह्याच युद्धात. अभिमन्यू जोरा जोराने गर्जना करत असतो, त्यात आव्हान होते. तो शरण येणाऱ्यां पैकी नव्हता. तो क्षत्रियाचे मरण स्वीकारणारा होता. त्या कपटी सहा जणांच्या मधोमध तो तेजस्वी चमकत होता. त्याचे सगळे अंग रक्ताने भरलेले होते.

अभिमन्यू वध पर्व भाग सेहेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग सत्तेचाळीसावा

संजय पुढे सांगत असतो. तो दुभद्रेचा मुलगा तो अतिरथ, त्या हातातील चाकामुळे दुसरा जनार्दन वाटत होता. त्याचे सुटलेले केस वार्यामुळे उटत तेव्हां ते त्याच्या देखणेपणात भर घालत होते. तो देवांसारखा दिसत होता. लगळे अग रक्ताने भरलेले होते. तरी त्याचा जोश यत्किंचितही कमी झालेला वाटत नव्हता. त्याच्या हातातील गरगरा फिरणारे रथाचे चाक त्या सहा जणांचा चिंतेचा विषय झाला होता. त्या चाकाचे शतशः तुकडे कसे करावयाचे त्याचा ते विचार करत होते. अभिमन्यूला तेथे पडसेसी एक गदा दिसते त्याला वाटते कीं, त्या चाकापेक्षा ती गदा जास्त चांगले शस्त्र ठरेल व त्या विचाराने तो ते चाक टाकतो व ती गदा उचलतो. ती गदा घेऊन तो अश्र्वत्थामावर जातो. अश्र्वत्थामा त्याच्या रथातून उडी मारून खाली उतरतो व लांब पळतो. अभिमन्यू त्याचे घोडे मारतो. अभिमन्यूला सर्वांगाला बाण लागलेले असल्यामुळे तो साळूंकीसारखा दिसत होता. अभिमन्यू शकूनीच्या भावावर कालकेयावर जातो, त्याला व त्याच्या सहा गांधार सैनिकांना कंठस्नान घालतो. त्यानंतर तो दहा रथी मारतो जे ब्रह्मवसतिय वंशाचे होते. त्यानंतर दहा मोठे हत्ती मारतो. असें करत तो दुःशासनाच्या मुलाकडे जातो. त्याचा रथ तोडून टाकतो. ते पाहून दुःशासनाचा मुलगा त्याची गदा घेतो व अभिमन्यूवर जातो. त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. ते असे होते जसे प्राचीन काळी महादेव आणि असुर अंधक लढत होते. त्यांच्या गदांचे गोळे एकमेकांवर आदळत होते. त्यांचा मोठा आवाज होत होता. ते दोघे लढतां लढतां खाली पडतात. त्यातील दुःश्सनाचा मुलगा प्रथम उठतो, अभिमन्यू कदाचित थकला असावा उशीरा उठत असतांना दुःशासनाचा मुलगा त्या अभिमन्यूच्या उघड्या माथ्यावर गदेचा जोरदार वार करतो. त्या आघाताने अभिमन्यू पुन्हा खाली कोसळतो. सुभद्रापुत्र बेशुद्ध होतो. त्या बेशुद्धावस्थेत तो असतांना ते सहा जुने जाणते योद्धे त्या तरूण वीरावर अनेक वार करून त्याला ठार मारतात. जेव्हां तो प्रतिकार करू शकत नव्हता. हे मारणे युद्धनितीच्या विरुद्ध होते. अभिमन्यू यमाकडे गेला होता. द्रोण एक व्रतस्थ ब्राह्मण असून ते हे कृत्य करण्यास परवानगी देतात हे सर्वात जास्त आक्षेपार्ह होते अहो कुरुश्रेष्ठा. संजय सांगतो. ते भित्रे योद्धे अभिमन्यूच्या मृत शरीराकडे आश्र्चर्य करत व एकमेकांकडे पहात उभे होते. त्यांचा एक बलाढ्य शत्रू अखेरीस कपटाने मारला गेला होता. ते धर्मयुद्ध नव्हते. आता त्याच्या भोवती तुमचे योद्धे गोळा झाले होते. सगळीकडे शांतता पसरली होती. जसे एक पर्व संपले होते. ते असे होते जसे भडाग्नी सगळे जाळून झाल्यावर स्वतः सावकाशपणे विझत असतो तसे ते वाटत होते.

सूर्य पश्चिमेकडे क्षितिजावर पोहोचला होता. अभिमन्यू जमिनीवर शांतपणे कायमची निद्रा घेत पडला होता. त्या दिवलाचे युद्ध संपले होते तशी वाद्ये वाजू लागली होती. योद्धे सावकाशपणे आपापल्या ठिकाणी जाऊ लागतात. पांडवांचे आता अभिमन्यूच्या कलवरा भोवती जमू लागतात. त्यात सगळेच होते. युधिष्ठीर, भिम, नकूल, सहदेव त्यांच्या अभिमन्यूकडे शांतपणे पहात असतात. अभिमन्यूच्या चेहऱ्यावर एक मंद स्मित होते तो जिंकला होता ह्याचे ते प्रतीक होते. अभिमन्यूच्या नांवांचा जयजयकार करत होते. आकाशातील प्रेक्षक हळहळ व्यक्त करत होते. त्याचा मृत्यू ही भविष्यातील कौरवांच्या सत्यानाशाची नांदी होती हे सूज्ञ समजत होते. एकही कौरव आता जीवानिशी सुटणार नाही हे सगळे जाणकार समजून चुकतात. अशारितीने अधर्माने त्याचा वध झाला होता हे त्याचे कारण होते. तो युद्धातील मृत्यू नव्हता, तो एक खून होता म्हणून तो गुन्हा झाला होता व त्यात द्रोण, एक ब्राह्मणस सामील होते. त्याकरता कौरवांना अर्जुन शासन करणार होता हे निश्चित. त्या रणभूमीवर अभिमन्यूने मारलेले असंख्य योद्धे मरून पडले होते, आता त्यात तो एक होता. नियतीचा खेळ अजब असतो. त्याशिवाय कित्येक मौल्यवान चीजा तेथे विखुरलेल्या दिसत होत्या, अंधार झपाट्याना सगळे त्याच्या कक्षात घेत होता.

माणसांप्रमाणे हत्ती, घोडे असे सगळे त्यांच्या शस्त्रांनिशी तेथे पडलेले होते.

आता पांडव तेथे पोहोचले होते. ते त्यांच्या शूरवीराला नमस्कार करत होते. त्यांच्या दुःखाला पारावार नव्हता. इतक्या लहानपणी त्यांने केलेले शौर्याचे प्रदर्शन अप्रतिम होते. युधिष्ठीर तेथे येतो, तो त्याच्या योद्ध्याना बोलतो, "हा आपला सितारा माघार न घेता लढत राहिला हा आपल्याला एक आदर्श आहे. त्याच्या शौर्याची आठवण ठेवून आपण सगळे पुढील युद्ध करणार आहोत. न घाबरता लढत राहू व आपल्या शत्रूचा पराभव करू. त्याने आज दहा हजार योद्धे एका हाताने मारून भिष्मांचा पराक्रम ओलांडला आहे त्याचा अभिमान बाळगा. तो एका खऱ्या क्षत्रियाचा मृत्यू घेऊन गेला म्हणून त्याचा अभिमान बाळगून त्याला अभिवादन करू, तो आता अगदी उच्च अशा ठिकाणी गेला आहे. जेथे जाण्याचे स्वप्न आपण सगळे क्षत्रिय पहात असतो. म्हणून तो जिंकला आहे".

अभिमन्यू वध पर्व भाग सत्तेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

# भाग अठ्ठेचाळीसावा

संजय पुढे सांगतो, आमच्या मोठ्या शत्रूचा नाश करून कौरवांचे श्रेष्ठी त्यांच्या तळावर पोहोचतात. ते सगळे त्यांच्याच रक्ताने माखलेले होते. पांडव त्यांच्याकडे एकटक पहात होते. ते युद्ध निराळे होते. मरता मरता आम्ही वाचलो होतो. रात्रीचे प्राणी त्या रणांगणात फिरू लागले होते. त्या रणांगणात शांतता पसरली होती. असंख्य हत्ती, घोडे माणसे तेथे मरून पडलेली होती. त्यांची हत्त्यारे सुद्धा तेथे विखुरलेली होती. मेलेल्या माणसांचे हत्तींचे व घोड्यांचे विविध दागिने तेथे पडलेले होते. दिवसा चमकणारे ते दागिने आता अंधारात नीटपणे दिसत सुद्धा नव्हते. त्या अंधारात मेलेल्या माणसांचे व इतर प्राण्यांचे उघडे डोळे जास्त घाबरवत होते. एषारामात रहाणेरे ते राजे आता त्या धुळीत पडलेले होते वेडेवाकडे. त्यांना कुत्री, कोल्हे व लांडगे ओरबडत होती. ते दृष्य पहातांना अगालर शहारे येत होते. ज्यांच्या दिम्मतीला अनेक सेवक असतं ते तेथे मातात रक्ताच्या चिखलात पडलेले होते. गिधाडं अधूनमधून त्या प्रेतांवर बसून त्यांना खात होती. कांहीं क्षत्रिय कुळांच्या रिवाजानुसार ते भूषणावह समजले जात होते कीं, त्यांचे युद्धात मृत्यू झाले आहेत. गिधाडाने खाणे ह्याला ते स्वर्गात जाण्यासारखे मानत होते. त्याशिवाय नरमांस भक्षक राक्षस व पिशाच्च तेथे फिरू लागली होती. राक्षस मोठ्याने हसत ती मेलेली प्रेते खेचून कठे तरी नेत होती. रक्तमांसांच्या चिखलाचा तेथे तलाव बनला होता. त्यात हत्ती घोडे खडकासारखे वाटत होते. तो चिखल सावकाशपणे जवळच्या नदीकडे सरकत होता. कालांतराने ते सगळे त्या नदीत उतरणार होते व कोठेतरी वाहून जाणार होते. ठिकठिकाणी अग्नीबाणांमुळें रणांगणात आगी लागलेल्या होत्या त्यात रथ व इतर गोष्टी जऴत होत्या. त्याच्या उंच उठणाऱ्या ज्वाळा सगळीकडे दिसत होत्या. त्यामध्ये मेलेल्या प्राण्यांचे व माणसांचे करपणारे मांस त्याची दुर्गंधी पसरलेली होती. जे मेले नव्हते ते योद्धे ते पहात होते. त्यातच महायोद्धा अभिमन्यू आता विसावला होता. त्याचे मौल्यवान दागिने तुटून पडलेले होते.

अभिमन्यू वध पर्व भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग एकोणपन्नासावा

संजय पुढे सांगत असतो, अभिमन्यूच्या वधानंतर सगळे पांडव युधिष्ठीराभोवती जमा होऊन बसलेले असतात. ते त्याच्या मृत्यूने फारच व्यथीत झालेले असतात. अभिमन्यूच्या आठवणीत ते गुंतलेले असतात. युधिष्ठीर बोलतो, "त्याला मी पाठवले ते चक्रव्यूह तोडण्यासाठी म्हणून मीच त्याच्या वधाला जबाबदार आहे. असें तो बोलून सगळा दोष स्वतःवर घेत असतो. त्याने मी दिलेले कार्य उत्तमरित्या पार पाडले परंतु, त्यात तो गेला ह्याचे दुःख मला होत आहे. असें तो बोलत असतो. एका क्षत्रियाला जरी असा मृत्यू भूषणावह असला तरी तो त्यासाठी खूपच लहान होता. त्यांने जीवन भोगलेसुद्धा नव्हते. त्याचे मला फार वाईट वाटते. त्याचा मृत्यू एकापरीने माझ्यामुळे झाला आहे त्यामुळे मला समजत नाही मी त्याच्या पित्याला कसे तोंड दाखवू. अर्जुनाचा तो अतिप्रिय पुत्र होता. त्याच्या बद्दल त्याला किती तरी मोठ्या अपेक्षा असतील, त्याचा माझ्यामुळे चुराडा झाला आहे. तरी ते आपल्याला त्या दोघांना सांगावे लागणार आहे. कृष्णाचासुद्धा तो लाडका होता. मी लोभी झालो होतो कां? मी त्याला तो इतका लहान अननुभवी आहे हे माहीत असतांना ते काम कां दिले? हे त्याचे खाण्यापिण्याचे आयुष्य तेव्हां मी त्याला एकाद्या अनुभवी योद्ध्याचे कार्य कां सांगितले"? तो मला नाही म्हणून शकला असता परंतु, तो तसे न बोलता एका पायावर ते कार्य करण्यासाठी तयार झाला. आज आपण सगळे अभिमन्यू प्रमाणे मातीतच झोपले पाहिजे जसें तो तेथे झोपला आहे. धनंजय दुःख व क्रोध ह्या मिश्र भावात त्याच्या ज्येष्ठ भावाकडे पहात असतो. धनंजय ज्याने देवांना व असुरांना हरवले. त्याच्या मुलाला आपण त्या चक्रव्यूहात संरक्षण देण्यात कमी पडलो हे मान्य केले पाहिजे.

कौरवांच्या गोटात भितीचे वातावरण पसरलेले होते. कारण जेव्हां धनंजयाला व कृष्णाला अभिमन्यूच्या मृत्यूची व तो कसा झाला ते समजेल तेव्हां काय होईल त्याच्या विचाराने सगळे तुमचे लोक चिंता करत होते. कौरवांचा संहार आता निश्चित होणार हे सगळे समजतात. ते आठवतात तो पराक्रमी युवक ना सत्ता, ना सुख, ना विजय अशा अवस्थेत जग सोडून गेला त्याचे त्यांनासुद्धा वाईट वाटते. असें सगळे कौरवसुद्धा बोलून त्यांचे दुःख व्यक्त करत असतात.

अभिमन्यू वध पर्व भाग एकोणपन्नासावा संपला.

# अभिमन्यू वध पर्व

## भाग पन्नासावा

संजय पुढे सांगत असतो, युधिष्ठीर अभिमन्यूच्या मृत्यूने विरह करत असतांना तेथे व्यासमुनी येतात. त्यांचे नेहमी प्रमाणे स्वागत केले जाते. ते त्यांना दिलेल्या आसनावर विराजमान होतात. त्या नंतर राजा युधिष्ठीर त्यांना नम्रपणे विचारतो, युद्धात अनेक समर्थ योद्धे व त्या प्रमाणे माझा पुतण्या मृत्यू पावले आहेत. त्याचा मृत्यू कांहीं दुष्ट उद्देश मनात ठेवून युद्ध करणाऱ्या लोकांच्या कारवाई मुळे झाला आहे. माझा पुतणा व अर्जुनाचा मुलगा वयाने लहान होता, जीवन त्याने अनुभवलेले नव्हते. त्याच्या जीवना बद्दलच्या कल्पना अपरिपक्व होत्या. तो मी आज्ञा दिली म्हणून त्याच्या विरुद्ध असलेल्या जबरदस्त  योद्ध्यांशी प्राणपणाने लढला. तो त्या चक्रव्युहात शिरली परंतू आम्हाला त्यात जाणे जयद्रथाच्या दक्षतेमुळें शक्य झाले नाही. तो वेगांने खूप आत गेला व एकटाच त्यांच्याशी लढत राहिला होता. त्यामुळें आम्ही त्याला संरक्षण देऊ शकत नव्हतो. आपण जाणता कीं, युद्ध शास्त्राच्या नियमानुसार एका बरोबर एकच लढण्याचे नियम असतांना ते अनेक एकत्र येऊन अभिमन्यूशी एकट्याशी लढत होते. ते धर्मयुद्ध होत नव्हते. तरी ते झाले व त्यात तो मारला गेला म्हणजे त्याचा त्या अधर्मयुद्धात खून झाला होता. त्या गोष्टीचे आम्हा सगळयांना फार वाईट वाटत आहे. मला माझे अश्रू आवरत नाहीत कारण मी समजतो कीं त्या मुलाच्या खूनाला मी जबाबदार आहे. त्याची खंत मला होत आहे. माझी मनाची शांती हरपली आहे.

पुढे संजय सांगतो, ते ऐकून व्यासमुनी त्याला बोलतात, अरे युधिष्ठीरा, तू सूज्ञ आहेस, तुझा विविध ज्ञान शाखांचा अभ्यास सुद्धा आहे, असा माणूस अशा प्रकारच्या प्रसंगामुळें हतबल होत नाही, तरी तू झाला आहेस ह्याचे मला नवल वाटते. त्या योद्ध्याने त्याच्या कर्माने अनेक इतरांना मृत्यूच्या दाढेत ढकलले आहे. तो तुम्ही सांगता कीं, लहान आहे परंतु, त्याचे कृत्य मोठ्या माणसासारखेच समजले पाहिजे. मृत्यूचा न्याय सगळयांना सारखाच लागू होतो, तो देव असो, दानव असो अथवा मानव असो किंवा गंधर्व, यक्ष कोणीही असो. त्याला अपवाद नसतो. अरे युधिष्ठीरा, तो बलवान राजे मेल्यानंतर मातीत पडलेले होते त्यांची शुद्ध हरवलेली होती. त्यातील कित्येक हत्तीचे बळ असलेले होते, तर कांहीं वार्यासारखे शक्तीमान असतील. ते सगळे युद्धात मारले गेले आहेत. मला नाही वाटत कोणी एक अशांना युद्धात अशाप्रकारे मारू शकेल. परंतु, ते सगळे दररोज युद्ध करण्यास येत होते एकाच उद्देशाने कीं, ते त्यांच्या शत्रूला ठार मारणार, तरी असे होते कीं, ते मारले जातात व त्यांचा शत्रू त्यांना मारतो. त्यांच्यापेक्षा त्यांच्या शत्रूचा जोर

जास्त होता म्हणून तसे होत असेल. अशारितीने मृत्यू येतो म्हणजे नेमके काय होते? कसे होते? कां होते? मृत्यूमुळें प्राणी कायमचा कां नाहीसा होतो?पुढे त्याचे काय होते?

संजय पुढे सांगतो, व्यास पुढे सांगतात, मी तुला तुझ्या प्रश्नाची उत्तरं असलेली एक प्राचीन कथा सांगतो जी नारदांना मला सांगितली होती. ती राजा अकंपनाची आहे. राजा अकंपन फार प्राचीन काळी राज्य करत होता. त्याच्या मुलाचा मृत्यू असाच एका युद्धात झाला होता व त्यामुळे तो अतिदुःखी झाला होता. तेव्हां त्याला जे नारदाने सांगितले ते मी आता तुला सांगणार आहे. त्या कथेमुळे तुला मृत्यूचे कारण काय ते समजेल. ते समजले कीं, तुझी ह्या दुःखातून सुटका होईल. आता ऐक मी काय सांगतो ते, ही कथा ऐकण्याने माणसाचे आयुष्य वाढते, दुःख नाश होतो, तुझे आरोग्य सुधारेल, तुझे शत्रू नष्ट होतील, ती कथा फार शुभ आहे. ही कथा वेदाचा अभ्यास करण्याप्रमाणे आहे हे लक्षात घे. प्रत्येक राजाने ही कथा दररोज सकाळी ऐकावी अशी आहे. ती ऐकल्याने तुझे दुःख हलके होईल.

त्या अतिप्राचीन काळी एक राजा होता त्याचे नांव होते अकंपन. एकदा युद्धात त्याचे शत्रू त्याला घेरतात, त्याला जवळ जवळ पराभूत करतात असे झाले होते. त्याला एक मुलगा होता त्याचे नांव होते हरी. तो नारायणासारखा तुल्यबळ होता. तो दिसायला खूप सुंदर होता. त्याला सगळी शस्त्रविद्या माहित होती. तो इंद्रासारखा पराक्रमी होता. अनेक शत्रूने वेढलेला असतांना तो त्याच्या बाणांने त्या शत्रूंचा पाडाव करत होता. त्या युद्धात तो मोठा पराक्रम करतो. परंतु, अखेरीस तो शत्रूच्या कारवाईमुळें कामी येतो. त्याच्या मृत्यूनंतर अकंपन क्रियाकर्म विधी, श्राद्ध वगैरे उरकतो. त्यानंतर स्वतःला शुद्ध करतो.

तरी त्याचे पुत्र विरहाचे दुःख कमी होत नाही. त्याच्या त्या न संपणाऱ्या दुःखाची माहिती नारद ऋषी समजतात. ते त्याला भेटावयाला येतात. नारदाना पाहून तो त्याचे दुःख काय ते त्यांना सांगतो. त्याचा पराभव आणि मुलाचा मृत्यू कसा झाला ते तो त्या ऋषीला सांगतो. तो बोलतो कीं, त्याचा हरी दुसरा इंद्र किंवा विष्णू होता. ते त्या अनेकांनी मिळून मारला. असे कां झाले ते मला सांगा म्हणून शेवटी तो नारदांना विचारतो कीं, हा मृत्यू कोण आहे, जो सगळयांना शेवटी हरवत असतो? त्याची शक्ती कोणती? आपण ज्ञानी अहात म्हणून मी आपल्याला विचारत आहे. नारद त्याला सांगू लागतात, त्या कथेच्या वाचनाने माणसाचे पुत्र वियोगाचे दुःख नाहीसे होते.

नारद पुढे सांगतात, अरे बलवान राजा, मी तुला तो इतिहास सांगतो जो फार जुना आहे. जसा मला समजला तसाच मी तुला सांगणार आहे.

ब्रह्मदेव हे विश्व उत्पन्न करतात. त्यात विविध जीव ते उत्पन्न करतात. ते पहातात कीं, उत्पन्न केलेले जीव नष्ट होत नाहीत. म्हणून ते त्या जीवांचा नाश कसा होईल त्याचा विचार करू लागतात. ब्रह्माला ते समजत नाही म्हणून त्यांना राग येतो. त्यातून अग्नी उत्पन्न होतो. आकाशातून अग्नी पृथ्वीवर परतो व सगळे भस्म करू लागतो. त्यामुळे स्वर्ग, आकाश व पृथ्वी सगळे त्या आगीच्या भक्ष स्थानी जाते. त्यात सगळे चराचर भस्म होतात. ब्रह्माने त्याच्या क्रोधाने सगळया जीवाना घाबरवून सोडले होते. ते झाल्यानंतर स्थानू ज्याला शीव किंवा महादेव असे सुद्धा म्हणतात, जो जटाधारी असतो व सगळीकडे भटकत असतो, ब्रह्माला भेटतो. स्थानू ब्रह्माच्या पाया पडतो. कारण त्याला सगळया जीवांचे भले करावयाचे होते. ती वैराग्याची देवता होती, ब्रह्माला बोलते तुझी कोणती इच्छा मी पुर्ण करावी असें वाटते ते सांग. तुझ्या सगळया कामना पूर्ण झाल्या पाहिजेत. असे होईल जे सगळयांच्या हिताचे असेल. मला सांग तुझी काय इच्छा आहे?

अभिमन्यू वध पर्व भाग पन्नासावा संपला.

**- द्रोणपर्व भाग पहिला संपला -**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळया नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे

त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले

आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरलालीत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा

धन्यवाद